# कोडं

कोडं



मधू शिरगांवकर

ईसाहित्यप्रतिष्ठान

सादर करत आहे

# कोडं

## लेखिका : मधू शिरगांवकर

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा!लुटा! लुटून न्या!

## कोडं

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमलाआणि तुम्हाला आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळमत, सूचना, टीका, विरोधीमत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कोडं

## लेखिका :मधूशिरगांवकर

Plot 13, Mangaldham, Pune 411038

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 09822208197

ईमेल -- madhushirgaonkar@gmail.com

मुखपृष्ठ:कनका जोशी, मधू शिरगांवकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते (दंड व तुरुंगवास).

This declaration is as per the Copyright Act 1957read with Sections 43 and 66 of the IT Act 2000.copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity.com

www. esahity. in

esahity@gmail.com

प्रकाशन : जुलै,२०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेची ओळख



सौ मधू शिरगांवकर,

(Mrs. Mrinmayee Shirgaonkar)

वय ५४ वर्षे.

पेशाने फार्मास्युटिकल ट्रेनर आणि कन्सल्टंट.

प्रमाणपत्रधारक योगशिक्षिका : Yog Daily हे फेसबूक पेज चालवते. त्यावर योगविषयक माहिती, त्यातील चुकीचे समज व काही योगासनांची प्रात्यक्षिके असा विडिओ बेस्ड कार्यक्रम करते.

इविद्यालोक या स्वयंसेवी संघटनेची सक्रिय स्वयंसेविका. टीम विजन या दृष्टी आव्हानितांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेसाठी पुस्तकवाचन.

पती, सासू. व आईवडील यांच्यासह गेली २८ वर्षे पुण्यात वास्तव्य. मुले नोकरीनिमित्त बाहेरगावी असतात.

पन्नासाव्या वर्षी लेखनास सुरवात केली. लेखन करतानाचाआनंद सर्वात महत्वाचा आणि वाचकांची दाद ही सगळयात मोठी पावती असं मानते. वाचता वाचताच लेखनाची

सुरवात झाली. जवळपास ५० लघुकथा, पाच लघुकादंबऱ्या, अनेक ललित लेख, व सध्या एका कादंबरीचे लेखन सुरू आहे.

कॉलेजमध्ये असताना केलेला अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन यांचा लेखन करताना नकळत उपयोग होतो. शास्त्रीय संगीत परमेश्वराच्या किंचित का होईना जवळ घेऊन जातं असा विश्वास वाटतो.

- “माझा मराठीचा बोल”दिवाळीअंकात २०१७, २०१८,२०१९, २०२० च्या आवृत्यांमध्ये कथा व लेख प्रकाशित.
- “श्री व सौ” या२०१९ च्या दिवाळीअंकात तीन लघुकथा ‘कथात्रयी’ या सदरात प्रकाशित.
- निनाद या २०२० मध्ये अमेरिकेतून प्रसिद्ध झालेल्या विशेष अंकात लघुकथा प्रकाशित.
- ग्रहसंकेत या मासिकामध्ये श्री रमणमहर्षींवरील लेख प्रकाशित जून २०२०
- प्रतिबिंब ही कादंबरी नुकतीच छापील स्वरूपात मातृभारती प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली.

E mail : madhushirgaonkar@gmail.com

Mobile number: 9822208197

# मनोगत

अनेक वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात एक छोटीशी बातमी वाचली. त्या बातमीने तेव्हा मला अत्यंत अस्वस्थ करून सोडले. ते बीज बहुतेक अनेक वर्ष मनात दबा धरून बसले होते. अलीकडे जेव्हा लेखनाला सुरवात झाली तेव्हा ते बीज अंकुरून त्याची ही कथा झाली. शेवटी, आपल्या अनुभवांच्या. माहितीच्या, ज्या शिदोऱ्या आपण मेंदूत साठवत असतो त्याच लेखनामध्ये डोकावतात यात शंकाच नाही.

माझ्या नेहमीच्या कथांपेक्षा ही कथा वेगळी आहे. एक गुन्हेगारी पार्श्वभूमी याला आहे. आपल्या सर्वसाधारण आयुष्यात अशा व्यक्ती आपण जवळून कधीच पाहत नाही. पण मनुष्यस्वभावाचे अनेक कंगोरे आपण अनुभवत असतोच. त्याला थोडी वास्तविक कल्पनेची झालर लावली तर एक विलक्षण कथा आकार घेते.

फेसबूकवरचा 'माझा मराठीचा बोल' (मामबो) समूहाचे सभासद, हे माझे नेहमीच पहिले वाचक, टीकाकार, समीक्षक असतात. ही कथाही त्याला अपवाद नाही. विशेषतः विवेक दादांनी माझ्या या कथेच्या लेखनप्रवासात सतत साथ देऊन वरील

सर्व भूमिका आंनदाने पार पाडल्या आणि त्यांच्या या मोलाच्या साहाय्याशिवाय कथा इतकी निर्दोष झाली नसती.

माझी मुलगी साधना हिने तिच्याबरोबर केलेल्या वाचनाच्या वेळी तिला आलेल्या काही शंका बोलून दाखवल्या. त्यांच्यावर विचार करताना हे कथानक अधिक परिपूर्ण झाले.

कनका जोशी या माझ्या मानसकन्येने, मी कल्पना बोलून दाखवल्याबरोबर अक्षरश: काही तासांत स्केच काढून दिलं. माझे पती अतुल, साधना, प्रिया साठे, गिरीश गोगटे, पल्लवी गोगटे, डॉक्टर विवेक देशपांडे यासर्वांनी मी तयार केलेल्या अनेक मुखपृष्ठांमधून कथेला अनुरूप असं मुखपृष्ठ निवडताना अत्यंत मोलाचं मत दिलं. पुस्तक तुमच्यासमोर ठेवताना या सर्व गोष्टींमध्ये अनेकांचं सहकार्य लागतं, माझा परिवार आणि मित्रमंडळी हे काम मोठ्या आनंदाने करतात.

तुम्हालाही ही कथा आवडेल अशी आशा आहे.

ईसाहित्य नेहमीच माझं लेखन तुमच्यापर्यंत पोहोचवण्यात कोणतीही कसर ठेवत नाहीत त्याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

_____मधू शिरगांवकर

# अर्पणपत्रिका

**व्यसनाच्या विळख्यात सापडलेल्या**

**त्या सर्व तरुण मुलामुलींना**

**शुभेच्छांसह अर्पण**

**जे त्या विळख्यातून बाहेर पडण्याचा**

**आटोकाट प्रयत्न करत असतील.**


कोडं
कोडं
मधू शिरगांवकर

# १

“अरे, अरे, हळू, आई गं, निमिष, अरे, तो बघ समोर येतोय आपल्या गाडीच्या.” शर्वरी जोरात ओरडली आणि निमिषनं प्रतिक्षिप्त क्रियेने करकचून ब्रेक लावला. हायवेवर सुसाट वेगातील गाडी काहीशी हेलकावलीच आणि टायर घासत त्या व्यक्तीपासून काही इंचांवर येऊन थांबली. एक कचकचीत शिवी हासडून निमिष बेल्ट सोडून बाहेर पडला. काडकन त्या व्यक्तीच्या त्याने थोबाडीत लगावली. पण त्या आघाताने ती व्यक्ती हेलपाटत जवळ जवळ पडलीच खाली. पाहतो तर त्या व्यक्तीच्या अंगभर जखमा, हातपाय सोलवटलेले, कपडे फाटलेले, डोक्यातूनही रक्त किंचित साकळलेलं. ‘दारू पिऊन आडवं आलंय कोणी’ हा मनात आलेला पहिला विचार निमिषच्या मनातून हद्दपार झाला आणि त्याने शर्वरीला प्रथमोपचाराचा डबा घेऊन बाहेर बोलावलं. शर्वरी पटकन बाहेर आली गाडीतून. पाहतात तर ती व्यक्ती जवळ जवळ बेशुध्द पडलेली. कसंबसं दोघांनी उचलून गाडीत घेतलं. निमिषने गाडी स्टार्ट केली. हायवे लगतच असलेलं मल्टीस्पेशॅलिटी हॉस्पिटल आठवलं त्याला. तिथेच जायचं ठरवलं त्याने. शर्वरीने थोडं पाणी पाजलं त्या व्यक्तीला, आणि उशा लावून जेवढं सुखकर

करणं शक्य होतं तेवढं केलं. नकळत ती निरीक्षण करू लागली. डोक्याचं संपूर्ण चकोट, अंगात अत्यंत मलीन, ढगळे पॅंट शर्ट, अत्यंत कृश शरीरयष्टी, हाताच्या तर काड्याच, चेहरा... शर्वरीने चमकून पाहिलं, पांढरट पडलेल्या चेहऱ्यावर एकही केस नाही. मलीन पण पातळ नाजूक त्वचा.

"निमिष..."

"काय गं?"

"अरे ही स्त्री आहे का पुरुष?"

"अगं... काहीही... का ? असं का वाटतंय?"

"अरे दाढी मिशांचा लवलेशही नाही, कातडी पण नाजूक, बाईचीच वाटते." निमिष काही बोलणार तेवढ्यात त्याला हॉस्पिटलची पाटी दिसली. नंतरच्या घटना भराभर घडत गेल्या. हॉस्पिटलने पोलिसांना फोन केला. आश्चर्य म्हणजे दहाव्या मिनिटाला पोलीस व्हॅन आली. पुढचे सोपस्कार होऊन निमिष, शर्वरीच्या सह्या घेऊन, त्या व्यक्तीला उपचारांसाठी आत नेण्यात आले. निमिषने हॉस्पिटलचे ॲडव्हान्स पेमेंट केले. त्या व्यक्तीविषयी काहीच माहिती नव्हती. जबाबदारी या दोघांवरच आली. डॉक्टरांना भेटून, फोन नंबर पत्ता, सर्व देऊन दोघे निघाली. ॲडव्हान्स बरेच पैसे भरले असल्याने आणि पोलिस केसची नोंद

झाल्यामुळे डॉक्टरांनी फारसे आढेवेढे न घेता उद्या परत येण्याच्या आश्वासनावर त्या दोघांना जाऊ दिले. निमिषला दुसऱ्या शहरात काम होतं आणि ते आजच्या आज संपवणं गरजेचही होतं. दोघं निघाले.

चंदनाने हळू हळू डोळे उघडले. प्रथम तिला काही दिसेना. डोळे ताणताणून तिने पाहण्याचा प्रयत्न केला. हळू हळू तिची नजर सरावली. अंधूक प्रकाशात तिला ती असलेल्या खोलीचं छत, भिंती, खिडकी, अर्धी काच लावलेलं दार... 'कुठे आहोत आपण? मग स्वत:कडे लक्ष गेलं. निळा डगला होता अंगात. हातात सुई खुपसलेली, शेजारी स्टॅंडवर सलाईनची बाटली अडकवलेली. हॉस्पिटल.... हॉस्पिटलमध्ये आहोत आपण. फायनली... ' तिने हळू हळू डोळे मिटले. शेजारच्या बेडवर ती व्यक्ती जागीच होती. हॉस्पिटलमध्ये येण्यापूर्वीपासूनच ती जागी होती. तसं कशाला, गेले कित्येक दिवस, महिने.. की वर्ष? जागीच तर होती ती. पूर्ण जागृत! टक लावून ती झोपलेल्या चंदनाकडे पाहत होती. त्या व्यक्तीच्या हातातही तशीच सुई होती, बाटलीला जोडलेली. आता फक्त काही तास, मग इथून जायला हरकत नव्हती. सोय समोरच चक्क झोपली होती.

# २

“स्वर्णा, उठते आहेस ना?”

आईची हाक ऐकून तिने उशी डोक्यावर ओढून घेतली. तिला आज अजिबात कॉलेजला जायची इच्छा नव्हती. कालच ट्रीपहून परत आले होते सगळे आणि ट्रेनमध्येच मास बंक मारायचा ठरला होता. पण आईला कोण समजावणार.. त्रास आहे नुसता.

“स्वर्णू.... अगं उठ ना बाई, मला उशीर होतोय ऑफिसला.”

“तू जा, मी दांडी मारणारे..”

“स्वर्णा... नो वे, ताबडतोब तयार हो. कालपर्यंत मजा मारून झालीय. आता सिरीयसली घ्या जरा लाईफ. फुकटं आयुष्य जन्मभर जगायची सवय नकोय.”

“ममा... आह, प्लीsssssज. गो अवे. मी नाही जाणाराय आज. कोणीच नाही जाणाराय. तू जा गं. झोपू दे मला.”

“सगळं आयतं मिळतंय ना मनात येईल ते, म्हणून सुचताहेत ही थेरं. बापाला रात्री प्यायला मिळाली की पुरे. तुला

गिळायला. मी राबतेय नुसती रात्रंदिवस. एक दिवस सगळं संपवून टाकेन ना, तेव्हा कळेल तुम्हाला सगळ्यांना.”

“ओह गॉड. स्टॉप इट ममा. जाते मी कॉलेजला. तू बंद पड पण. सतत सतत सुनवायचं. जसं उपकार केलेत मला जन्माला घालून. शी!”

“इनफ!” दोन सटासट कानफटात बसल्या स्वर्णाच्या!

त्या व्यक्तीचा हात अनाहूतपणे बेडवर पडल्या पडल्या गालाकडे गेला. आत्ताही गाल चुरचुरतोय असा भास झाला तिला. ती दचकली. इतकी वर्ष हे सगळं खोल मनात गाडून टाकलेलं अचानक असं आठवावं?

“आता मीच असं काही तरी करीन की तू पश्चात्ताप करशील मला जन्माला घातल्याचा,” तिरमिरीत गाल चोळत स्वर्णा मनातल्या मनात आईला हे असं वचन देऊन मोकळी झाली होती तेव्हा.

त्या दिवशी स्वर्णा पहिल्यांदा प्रथमला एकटी भेटायला गेली होती. तो दिवस तिचं पुढचं संपूर्ण आयुष्य बदलवून टाकणार याची तिला मुळीच कल्पना मात्र नव्हती.

स्वर्णा बराच वेळ, ’जुने विचार मनातून काढून टाकून पुढचा विचार करायला हवाय ’ असं मनाला सांगत राहिली.

शेजारच्या बेडवरची मुलगी पूर्ण शुद्धीत येण्यापूर्वी हालचाली करणं गरजेचं होतं. सध्या तरी तिला, ती शेजारच्या बेडवरची मुलगी हाच एक ऑप्शन होता.

त्या दोघां नवरा बायकोंनी कुठल्यातरी सरकारी इस्पितळात आपल्याला नेऊन टाकली असती तर गोष्टी फार सोप्या झाल्या असत्या. का माणसं उगाच इतका चांगुलपणा दाखवतात? मूर्ख कुठचे.

निमिष आणि शर्वरी काम संपवून दुसरे दिवशी हॉस्पिटलमध्ये पोहोचले. डॉक्टरांनी, त्यांनी ॲडमिट केलेली पेशंट, अचानक अत्यवस्थ झाली असल्याचं सांगितलं. तिला आयसीयुमध्ये हलवण्यात आल्याचं सांगण्यात आलं. डॉ. म्हणाले, "तुम्ही हवं तर जा घरी. जे काही करायचं ते आम्ही करूच. तुम्हाला कळवू काही लागलं तर."

पण पोलीस भरपूर दिसत होते. सगळ्यांची फार गडबड चाललेली दिसत होती. चौकशी करता उडत उडत समजलं की एक चंदना नावाची पेशंट पळून गेलीय हॉस्पिटल मधून.

# ३

डिकीत अंग दुमडून बसलेली असताना स्वर्णाच्या गेल्या काही तासातल्या घटना डोळ्यासमोरून तरळल्या. आपलं नशीब फारच जोरात असल्याचं तिच्या लक्षात आलं. रात्री डॉक्टरांची राऊंड संपली, नर्सेस सगळ्यांना औषधं देऊन, सलाईन बॉटल्स चेक करून गेल्या. स्वर्णा हलकेच उठली. सगळ्या सुया काढून तिने स्वत:ला मोकळं करून घेतलं. सर्वप्रथम सर्जिकल ग्लव्ज हातांवर चढवले. तिने हळूच दरवाजाजवळ जाऊन चाहूल घेतली. मग सरळ ती चंदनाच्या बेडजवळ आली. तिने स्वत:च्या औषधाच्या डब्यातून इंजेक्शन्स शोधली. पेनकिलर, झोपेचं इंजेक्शन काढून पटापट चंदनाच्या सलाईन बॉटलमध्ये इंजेक्ट केली. मध्यंतरी काही महिने एका हॉस्पिटलमध्ये केलेली आयाची नोकरी अशी कामी येत होती.

त्यानंतर तिने फटाफट चंदनाची वेणी सोडली, केस घट्ट मागे बांधले. मग ती बाथरुममध्ये गेली. तिने डोक्याला चिकटवलेला टकलाचा विग सावकाश स्पिरीट लावून काढला. मग तिने स्वत:चे केस नीट हातानेच विंचरून घेतले. बाहेर येऊन तिने तो विग चंदनाच्या डोक्यावर चढवला. इथे चिकटवण्याची

सोय नव्हती. पण तिने मानेच्या वर चिकटपट्ट्या लावून, तो फिक्स केला. चंदनाच्या मनगटावरचा आयडेंटिटी टॅग काढून त्याच्या जागी आपल्या मनगटावरचा टॅग अडकवला.

मग चंदनाच्या बॅग मधून तिने एक ड्रेस घेतला आणि पेशंटचा निळा डगला काढून चंदनाचा ड्रेस स्वत:च्या अंगावर चढवला. तिने स्वत:चा बेड अगदी हळू ढकलत चंदनाच्या बेडजवळ आणला. सावकाश तो काटकोनात हलवला. मग चंदनाचा बेड सलाईन सकट ढकलत स्वत:च्या बेडच्या जागी सरकवला. चंदनाच्या जागी स्वत:चा बेड सरकवला. पेशंट हिस्टरी पॅड्स आणि औषधांचे बॉक्स मात्र तसेच ठेवले.

एवढं करूनही हे नाटक फारतर तासभर चालेल हे तिला माहित होतं. चेहरा चंदनाचाच होता. पण तिला हेही माहित होतं की, बेडची जागा, टक्कल, आयडेंटिटी टॅग वगैरे गोष्टींमुळे डॉक्टर, नर्सेस सगळयांचेच मेंदू ठराविक पद्धतीनेच विचार करणार होते. मग तिने चंदनाचं सगळं सामान हातात घेतलं. कानोसा घेत ती बाहेर आली. नर्सेस काऊंटरवर सगळ्याच नर्सेस खुर्चीत बसून पेंगत होत्या. प्रथम ती रुममधून बाहेर पडून विरुद्ध दिशेला गेली, मग तिथून सावकाश चालत नर्सेस कांउंटर समोरून बाहेरच्या दरवाजाजवळ गेली. लिफ्टने खाली पार्किंगमध्ये आली. एक

ड्रायव्हर गाडी काढण्याच्या तयारीत होता. त्याने गाडी स्टार्ट केली होती. शेजारच्या ड्रायव्हर बरोबर गप्पा मारत होता. ती सावकाश बरीच लांबून मागे गेली, खाली बसली आणि हातापायावर चालत त्या गाडीच्या मागे आली. हलकेच गाडीच्या डिकीचं हॅंडल वर करून पाहिलं, तिचं दैव फारच बलवत्तर असावं, डिकी उघडीच होती, तरीही तिने लगेच हालचाल केली नाही, तेवढ्यात तो ड्रायव्हर गाडीतून उतरला, ‘‘चल चा पिऊ, मग निघतो’’, असं म्हणून दोघं बाहेर गेले, मग मात्र तिने त्या गाडीच्या कारची डिकी उघडली. सावकाश आत बसून बंद केली. दहा पंधरा मिनिटात ड्रायव्हर गाडी घेऊन निघाला. स्वर्णा शांत पडून राहिली. अर्ध्या तासाने तो कुठेतरी मध्येच थांबला आणि शिटं भरायला ‘‘पुणे पुणे’’, ओरडू लागला. हे धोक्याचं होतं. तिने डिकी उघडली, चंदनाचं सामान तिथंच ठेवलं डिकीत आणि स्वत: लांब जाऊन अंधारात थांबली. तिला वाटलं तसंच झालं. त्याला शिटं मिळाली, त्यांचं सामान ठेवायला त्याने डिकी उघडली. सामान टाकून बंद केली. ती गाडी पाहता पाहता निघून गेली.

स्वर्णा चालत चालत निघाली. लांबून फूड मॉलची साईन दिसत होती. पण हायवेवरून चालत जाणं धोक्याचं होतं. पोलिसांची गाडी गस्त घालत असायची आणि आपण आयतेच सापडू.

तिने जरा कानोसा घेत चालायला सुरवात केली. शक्यतो अंधारालाच जवळ करत निघाली. गाड्या जरा जवळून येतात असं दिसलं तर ती पटकन खाली बसत असे, जमिनीला चिकटून. तसंही भरधाव जाणाऱ्या गाड्यांच्या ड्रायव्हर्सना ही दिसायची शक्यताच नव्हती. ते रस्ता तरी कुठे धड पाहत होते. नुसती वेगाची नशा होती.

तेवढ्यात एक गाडी सावकाश मागून येताना दिसली तिला. थांबण्याच्या विचारात असल्यागत. ही जमिनीला चिकटली. कार तिच्यापुढे जाऊन जेमतेम दहा फुटांवर थांबली. ड्रायव्हरसीटचा दरवाजा उघडला. माणूस बाहेर आला. त्याने मागचं टायर चेक केलं. मग सगळी आयुधं काढली. स्टेपनी काढायच्या वेळी गाडीतून दुसरी व्यक्ती बाहेर आली. बाई होती. तू आतच बस. मी बघतो. त्याने जरा चिडूनच सांगितलं. हिला तशाही अवस्थेत हसू आलं.

किती फुका विश्वास असतो या बायकांचा आपल्या नवऱ्यांच्या शक्तीवर? आत्ता आले चार दांडगे, करायला लागले काही त्या बाईला, तर काय करणार हा एकटा? अर्थात म्हणूनच बाहेर येऊन उभी राहू नको म्हणतोय म्हणा. स्टेपनी बदलून त्याने टायर आत टाकलं, आयुधंही. जॅक तेवढा खाली ठेवलेला राहिला, त्याने हात धुवायला पाण्याची बाटली मागितली आतल्या बाईला,

तिने दिली, गाडीच्या पुढच्या बाजूला जाऊन हेडलाईटच्या उजेडात तो हात धुवायला लागला. स्वर्णाला हे काही क्षण अत्यंत महत्वाचे होते. क्षणाचाही विचार न करता ती मांजरासारखी दबकत पण वायूवेगाने पुढे सरकली, झटकन एका हाताने जॅक उचलून डिकीत शिरली. हळूच डिकी ओढून खाली केली, पण पूर्ण बंद केली नाही. हात धुवून तो माणूस काहीतरी आठवल्यासारखा मागे आला. स्वर्णाने श्वास रोखून धरला. तो काही सेकंद बुचकळ्यात पडल्यासारखा विचार करत थांबला. मग गाडीखाली वाकून पाहू लागला. त्याच्या श्वासोच्छवासाचा आवाज स्पष्ट स्वर्णाला ऐकू येऊ लागला. भितीने एक थंड लहर तिच्या मणक्यातून सळसळली. तेवढ्यात त्याने डिकीचे हॅंडल धरल्याचा आवाज आला आणि स्वर्णाने आपले डोळे गच्च बंद केले. संपलं सगळं, ही एकच भावना मनात उरली.

## ४

त्या कारवाल्याने डिकीचं हॅंडल हाताने धरलं, जॅकचा स्लॉट हाताने चाचपला, आणि खट्कन दाबून डिकी बंद केली. आणि तो गाडी सुरू करून निघाला. स्वर्णाने सुटकेचा मोठा सुस्कारा सोडला. आज खरंच नशीब तिच्या बाजूने होतं. मगाशी आत शिरल्याबरोबर तिने जॅक स्लॉटमध्ये सरकवला होता ते बरं झालं.

गाडी साधारण तास दीड तासाने थांबली. ती दोघं उतरली. मग शटर ओढल्याचा आवाज आणि कुठलंतरी दार उघडण्याचा आवाज आला. स्वर्णा बराच वेळ तशीच पडून राहिली.

निमिष आणि शर्वरी एकदाचे घरी पोहोचले. घरी परते पर्यंत रात्र उलटून गेली होती. गाडी गॅरेजमध्ये लावून दोघं आत आली. काल निघाल्यापासून परतेपर्यंत घडलेल्या घटनांनी दोघेही दमले तर होतेच पण त्यापेक्षा प्रचंड अस्वस्थ झाले होते.

बराच वेळाने कानोसा घेत स्वर्णा कमीत कमी आवाज करत डिकीतून बाहेर आली. आंबलेलं अंग आधी आळोखे

पिळोखे देत मोकळं केलं. मग ती परत कानोसा घेऊ लागली. पाळलेले कुत्रे जनरली रात्री मोकळे असतात सोडलेले. तिला जपून हालचाली कराव्या लागणार होत्या. तिने आपले बांधलेले केस सोडले आणि झटकून परत बांधले. मग गॅरेजमध्ये फिरून तिने सगळा अंदाज घेतला. गॅरेजचं शटर बाहेरून बंद होतं पक्कं. पण गॅरेजमधून घरात जायला दरवाजा होता. तो उघडाच होता. ती सावकाश चालत दरवाजाजवळ आली. घरात सामसूम होती. ती दबक्या पावलांनी घरात शिरली. मधल्या पॅसेजमध्ये कपडे वाळत होते. वा! ही तर सोय छान झाली. मग ती दबक्या पावलांनी स्वैपाकघरात शिरली. हलकेच फ्रीज उघडून पाहू लागली. एक अर्ध खाऊन ठेवलेलं ग्रील्ड सॅंडविच होतं. तिनं ते उचललं. दुधाचं भांडं सरळ तोंडाला लावून जमेल तेवढं दूध पिऊन घेतलं. मग ते सॅंडविच, एक सफरचंद, असं घेऊन ती दबक्या पावलांनी गॅरेज जवळच्या पॅसेजमध्ये आली. बेशुद्धीच्या नाटकामुळे गेल्या छत्तीस तासांत तिच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. अधाशासारखं तिनं सगळं संपवलं. तिने वाळत घातलेल्या कपड्यांमधून एक पंजाबी ड्रेस घेतला. दुसरा पण घ्यावा असा मोह बाजूला सारला.

दबक्या पावलांनी ती परत घरात आली. बाथरुममध्ये जाऊन तिने तिथलाच एक टॉवेल घेऊन ओल्या टॉवेलने अंग स्वच्छ पुसून काढलं. पाण्याच्या धारांखाली सचैल स्नान करण्याचा अनावर मोह तिने कसाबसा आवरला. मग तिने तो पंजाबी ड्रेस घातला. चंदनाच्या ड्रेसचं बोचकं बांधून घेतलं. बाहेर येऊन तिने सावकाश हॉलमध्ये येत बारीक नजरेने निरीक्षण सुरू केलं. एक मोबाईल फोन तिथेच टीपॉयवर होता. तिने हातही लावला नाही. अर्थात ग्लव्ज होतेच हातांवर. आज तिचं लक फारच जोरावर असावं. एक मोठी लेडीज पर्स पण तिथेच होती. सावकाश उघडून तिने कॅश पाहिली. तीन हजार होते, सगळ्या शंभराच्या नोटा. पटपट तिने त्या एका त्या पर्समधल्याच रुमालात बांधून सलवारला कनवटीसारख्या बांधून वरून ओढणी बांधून घेतली. पर्समध्ये दोन अंगठ्या होत्या. पण त्या घेणं फार रिस्की, हे पुर्वानुभवाने तिला माहित होतं. पण या सध्याच्या परिस्थितीत फार कामी येऊ शकणार होत्या. त्याही तिने बोटात घालून पाहिल्या. तिच्या अंगठ्यात बसल्या त्या. आजकाल क्रेडीट डेबीट कार्डचा पण फारसा उपयोग होत नव्हता. उलट माग सापडण्याची भीतीच जास्त. त्यांना तिने तसेच राहू दिले पर्समध्ये. मग ती सावकाश चालत दरवाजाजवळ

आली. हलकेच लॅच उघडून बाहेर वाकून पाहिलं. पाळीव कुत्रा नाही हे लक्षात आलंच होतं. असता तर आतल्या हालचाली ऐकून त्याने परिसर डोक्यावर घेतला असता जोरजोरात भुंकून.

बाहेर एक मोठा स्ट्रीट लाईट मात्र भरपूर प्रकाश देत होता. बंगल्याच्या आवारातही मंद दिवे होतेच. आता कपडे मळवून चालणार नव्हतं. मग तिने सावकाश नजर टाकली बाहेर. चप्पल स्टॅंडमधून एक जुनीशी, मागच्या बाजूला ठेवलेली चप्पल काढून घेतली. बाहेर येऊन प्रथम दरवाजा ओढून घेतला. मग प्रकाश झोताच्या शक्यतो बाहेर राहात तिने गेटकडे चालायला सुरवात केली. साधारण पाच वाजत आले असावेत. एवढ्यात उजाडेल. तत्पुर्वी या वस्तीपासून दूर जायला हवं.

चटचट पाय उचलत ती मुख्य रस्त्याला लागली. समोरच मोठा बस डेपो दिसत होता. ती एका बसमध्ये जाऊन बसली. बसल्या जागी आता मात्र तिला झोपेनं घेरलं.

एव्हाना चंदना पळाली नसून ती दुसरी पेशंट पळाली आहे हे लक्षात आल्यानं पोलीस तपासाला एक वेगळी दिशा मिळाली. पहाटेच डॉक्टरांनी फोन करून निमिषला ही बातमी सांगितली. पोलिसांचाही फोन आला. दोघं अर्धवट झोपेत असतानाच हे फोन आले. दोघांची झोप खाडकन उडाली. हे

काय नसतं लचांड आपण मागे लावून घेतलं असं वाटलं दोघानांही. कारण पोलीस म्हणाले, आम्हाला अजून काही प्रश्न विचारायचे आहेत. आमची टीम येईल तुम्हाला भेटायला. पण आता काही इलाज नव्हता. दोघं चहा घ्यायला खाली आली तेव्हा फ्रीजमध्ये ठेवलेलं अर्ध सॅंडविच दिसलं नाही. शर्वरीने निमिषला विचारलं तेव्हा, अगं नक्की लक्षात आहे का तुझ्या, आपण संपवलं असेल काल असं तो म्हणाला. पण शर्वरीला नक्की आठवत होतं ठेवल्याचं. पण बाकीच्या इतक्या गोष्टी डोक्यात होत्या की तिनेही फार डोक्याला ताण दिला नाही.

स्वर्णाची बस तासाभराने निघाली. तिने शेवटच्या स्टॉपचं तिकिट काढलं. जवळ जवळ तासाभराने शेवटचा स्टॉप आला. सकाळच्या वेळी फारशी गर्दी नव्हती बसमध्ये. स्वर्णाने तीन चार सावध डुलक्या काढल्या. उतरून ती जराशी बऱ्या हॉटेलमध्ये आली. यावेळी फक्त ब्रेड बटर आणि चहा मिळाला, पण तो ही तिला अमृताहून गोड लागला. पोटात चहा गेल्यावर तिचं डोकं काम करायला लागलं. आता तिने जरा आसपास फिरून पाहायचं ठरवलं. जवळच एक स्वस्तातलं लॉजिंग दिसलं. एकट्या बाईने रुम मागितली की सगळे संशयाने पाहणार हे तिला माहित होतं. ती आत शिरली. तिने रुमची चौकशी केली.

काऊंटरवरचा माणूस संशयाने पाहू लागला. तिने ‘एक फोन करता येईल का?’ असं विचारलं. त्याने फोन सरकवला समोर. मग तिने एक नंबर फिरवला, “हॅलो, अहो मी बोलतेय. पोचले पुण्याला, पण वाटेत सगळं सामान चोरीला गेलय, त्याबरोबर इथल्या फ्लॅटच्या किल्ल्याही. आता त्या नव्या करून घेण्यात फार वेळ जाईल. नशीबाने पैसे जवळ ठेवले होते पर्समधून काढून, आता इथल्या एका हॉटेलमध्ये रुम घेतेय, काम झालं की निघेन. अं, होहो, नाव काय हो दादा हॉटेलचं? नंबर?,” मग त्याने दिलेल्या कार्डवरून तिने डिटेल्स दिले फोनवरून.”पैसे ना? हो जपून वापरते. कार्डही पर्सबरोबर गेलं. ते ब्लॉक करा प्लीज. पैसे अजून लागले तर बघू काय करायचं ते.”रुम नंबर?” तिने प्रश्नार्थक नजरेने काऊंटरवरच्या माणसाकडे पाहिलं. एव्हाना त्याचा संशय दूर होऊन त्याची जागा सहानुभूतीने घेतली होती. त्याने रुमनंबर सांगितला. तिने तो फोनवर सांगितला. मग एक दिवसाचे पैसे, फोनचे पैसे, असं सगळं देऊन ती रुममध्ये आली. आता काही काळ विश्रांती घेणं अत्यंत गरजेचं होतं. पण सध्यातरी उद्या सकाळपर्यंत तिला इथे राहण्यात धोका वाटत नव्हता. रुमच्या सर्व कड्या लावून, पंखा फुल स्पीडवर ठेवून ती

बेडवर आडवी झाली. काही मिनिटातच झोपेने तिला पूर्णपणे घेरले.

प्रथमला, ड्रग्जच्या अंमलातून जेव्हा शुद्ध आली तेव्हा तो एका घाणेरड्या पत्र्याच्या शेडमध्ये फक्त त्याच्या अंडरवियरमध्ये पडलेला होता.”कुत्री... साली!” त्याचा संताप अनावर झाला. आता त्याला आयुष्यात एकच ध्येय उरलं. ‘स्वर्णा नावाच्या नागिणीला ठेचायचं!’ तो उठून बाहेर आला.

आई एकटीच तिच्या खोलीत बसली होती. स्वर्णाला नाहीशी होऊन आज बरोबर पाच वर्ष उलटून गेली होती. ‘का आपण हात टाकला तरूण पोरीवर?’ याचा पश्चात्ताप करत तिने गेली पाच वर्ष स्वत:ला दोष देण्यात घालवली होती. ‘कुठे असेल, काय करत असेल? अर्धवट शिक्षण, अर्धवट वय. जिवंत तरी असेल ना?’ आईचा जीव एकदम घशात आला या विचारासरशी.

पोलीस चौकीच्या वाऱ्या करून ती थकली होती. मध्यंतरी दोन वेळा पोलिसांनी ॲक्सीडेंटची एक आणि

आत्महत्येची एक, अशा दोन डेडबॉडीज पहायला बोलावून झालं होतं. हा स्वर्णाचा मृतदेह नाही हे कळताना आनंद तर वाटला, पण कुठेतरी मनात, असता तर कायमचा निकाल तरी लागला असता असाही विचार मनाला चाटून गेला होता, आणि त्या विचाराची बोच अजूनही तिला लागून राहिली होती.

स्वर्णाचे वडिल सकाळपासूनच दारूच्या नशेत राहू लागले होते. व्यसन तर आधीपासूनच होतं, पण आता ते पराकोटीला गेलं होतं. घरातल्या वस्तू विकण्यापर्यंत मजल गेली होती.

पोलीस हॉटेल लॉबीत आले. त्यांनी एक स्केच काऊंटरवरच्या माणसाला दाखवलं. त्याने ते नीट निरखून पाहिलं आणि त्याने होकारार्थी मान हलवली. पोलीस सबइंन्स्पेक्टर, लेडी कॉन्स्टेबल, आणि अजून एक हवालदार यांना घेऊन तो माणूस स्वर्णाच्या रुमच्या दिशेने निघाला. जिना चढून सगळे वर आले. रुमसमोर पोझिशनमध्ये सर्वजण उभे राहिले आणि त्या माणसाने दरवाजावर थाप मारली.

# ५

स्वर्णा दचकून उठली. ते पोलीस, ती लेडी कॉन्स्टेबल, तो हवालदार... स्वप्न होतं बहुतेक. आत्तापर्यंत अनेकदा सत्यात उतरलेलं. पण ती दारावरची थाप... 'ओह, दार खरंच वाजवतय कोणी तरी... बाप रे.... ' तिची पाचावर धारण बसली. खोलीतून बाहेर पडण्याचा दुसरा कोणताच मार्ग दिसत नव्हता. 'आता?'

मग हळू हळू ती दाराजवळ गेली... कानोसा घेऊ लागली. 'जुन्या लॉजचा दरवाजा, कोणी तोडायचा ठरवला तर कितीसा वेळ लागेल?' तिच्या अंगावर सर्कन काटा आला. 'पोलीस असतील की आणि कोण?' त्या काऊंटरवरच्या माणसाला माहितच आहे आपण एकटे आहोत. एक एक विचारासरशी स्वर्णाचं अवसान गळत गेलं. जुन्या दरवाजाला कीहोल पण नव्हतं. तिने बाथरुममध्ये जाऊन पाहिलं. खिडकी नव्हतीच. व्हेन्टीलेटर एवढा लहान की मांजरीचं पिलू जाऊ शकेल फक्त. दारावरच्या थापांचा जोर आणि त्याबरोबर स्वर्णाच्या हृदयाचे ठोके वाढतच चालले होते.

शेवटी तिला दरवाजावरचा व्हेन्टीलेटर दिसला. तिने खुर्ची ओढून दाराजवळ आणली.''म्यॅडम, खाने का ऑर्डर है क्या कुछ? दस बजे किचन बंद होगा.'' 'ओह, बॉय आहे वाटतं.' तिने तरीही खुर्चीवर चढून वरच्या व्हेंटीलेटर मधून बाहेर डोकावून पाहिलं. एकटा पोऱ्याच होता.

प्रचंड हायसं वाटलं तिला. मग दरदरून घाम सुटलेला जाणवला. ती चक्क बारा तास झोपली होती. तिला आता इथे राहण्याची धास्ती वाटू लागली. पण रात्र इथेच काढावी लागणार होती. मग तिने सरळ थाळी मागवली. पुन्हा कधी पोटभर खायला मिळेल देव जाणे. पोऱ्या जेवण देऊन, पैसे घेऊन गेला. उद्या सकाळी तिला इथून निघायलाच हवं होतं.

त्या रात्री सगळी शिटं पोहोचवल्यावर शेवटच्या माणसाच्या सामानाबरोबर त्या ड्रायव्हरने चंदनाचं सामान जेव्हा काढून दिलं, तेव्हा तो माणूस म्हणाला हे नाही माझं. ड्रायव्हरला वाटलं, आधीच्या शीटांपैकी राह्यलं वाटतं कुणाचं, आता मालकाला कळलं तर नोकरी जायची, त्यापेक्षा नकोच ते, असं ठरवून त्याने ते सामान तिथेच सोडलं. दुसऱ्या दिवशी रस्ता झाडणाऱ्या माणसाने बेवारशी बॅग म्हणून पोलिसांत कळवलं.

बेवारशी बॅगेत फारसं काही संशय घेण्याजोगं सामान न मिळाल्यामुळे त्यावर फारसा विचार झाला नाही.

रात्रीपर्यंत प्रथम तिथेच थांबला. मग रात्री त्याने शेजारच्या टपरी वाल्याकडे जाऊन गयावया केली. टपरी वाल्याने त्याला चहा पाव खायला दिला. एक जुनी लुंगी, जूना टी शर्ट दिला. त्या बदल्यात त्याला त्या रात्रीची सगळी भांडी घासायला लावली. प्रत्येक घासण्याच्या जोराबरोबर त्याची स्वर्णाचा बदला घेण्याची भावना अधिकाधिक पक्की होत गेली.

स्वर्णाची एकतर झोप पूर्ण झाली होती. शिवाय मनात परत पकडले जाण्याची धास्ती होतीच. तिला आता कसंही करून आईचं घर गाठायचं होतं. कालच ती जाऊ शकली असती पण मनात प्रचंड भिती होती. आई थारा देईलच याची शाश्वती वाटत नव्हती. शिवाय शेवटचा एक ड्रगचा डोस मिळेल तर तिला हवा होता. एकदा आईने घरात घेतले की मग काहीच मिळणार नव्हते. पण आता सतत पोलिसांबरोबर लपाछपी खेळून, ती कंटाळली होती. आईकडे गेल्यावरही पोलीस माग काढत येणार हे तिला माहीतच होतं. पण त्याआधीच आपणच वकिल बघून पोलिसांना शरण जावं आणि मग पुढे पैसे चारून, वकील करून कमीत कमी शिक्षा कशी होईल हे पहावं असा तिचा विचार

होता. यात प्रथमला बळीचा बकरा केला की बरेच गुन्हे त्याच्यावर ढकलून माफीचा साक्षीदार होता आलं तर पाहावं हाही विचार बळावत होता.

रात्रं चढत गेली. स्वर्णाला एक एक गोष्ट आत्ता कालपरवा घडल्याप्रमाणे डोळयांसमोर दिसू लागली.

प्रथम, रंजनाचा कझीन. यांच्या पेक्षा चांगला सहा वर्षांनी मोठा. रंजुचा प्रथमदा. एकदा रंजूकडे गेल्यावर भेटला. बाकी सगळ्या मित्र मैत्रीणींना तो जरा वियर्ड वाटला. दाढी वाढवलेला, अंगात जीन्सवर कुर्ता घालणारा, इंजिनिअर असूनही नोकरी न करता काही वेगळ्याच विषयांचा अभ्यास करणारा, पोटापाण्यासाठी कंम्प्युटर दुरुस्तीची, सॉफ्टवेअरची कामं करणारा, डोळ्यात एक वेगळीच चमक असणारा. पहिल्याच भेटीत तो आणि स्वर्णाच एकमेकांशी खूप बोलले. म्हणजे खरंतर तो बोलला आणि स्वर्णा भारावून जाऊन ऐकत राहिली. किती निरनिराळ्या विषयांवर बोलत होता तो. मिनिमॅलिझम, हठयोग, तंत्रविद्या, भूतप्रेत, संमोहन विद्या, इतर मानवांना आपल्या कह्यात आणण्याची विद्या, इतर देशांमधील या विषयांवर होणारा अभ्यास, असे कित्येक नवनवीन विषय. किड्यामकोड्यांसारखं जन्माला यायचं, पठडीतलं शिक्षण, नोकरी, लग्न, मुलं, हे चक्रच

त्याला अमान्य होतं. त्याला काहीतरी असामान्य करायचं होतं. हे विषय अभ्यासायचे होते. मृत्युवर कायमचा विजय मिळवण्याचा विचार त्याच्या बोलण्यात वारंवार येत होता. भारतामध्ये, तसंच इतर पौर्वात्य देशात, त्यावर पूर्वी प्रचंड काम झालेलं आहे पण ते पुरेसं पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू दिलं नाही. ती पाळमुळं खणून शास्त्रोक्त पद्धतीने प्रयोग करून, खात्रीलायकरित्या मृत्यूवर विजय मिळवण्याचा शाश्वत मार्ग तो शोधून काढण्याच्या प्रयत्नात असल्याचं त्याने तिला सांगितलं तेव्हा तो तिला सिनेमातल्या सुपर हीरो पेक्षाही भारी वाटला होता.

स्वर्णा, कनिष्ठ मध्यमवर्गीय घरात वाढलेली मुलगी. वडलांच्या दारूच्या व्यसनापायी घरादारावर उद्विग्नतेचं सावट कायमचं पसरलेलं. आई नोकरी करून कसातरी घराचा भार सांभाळत होती. नकळत सततची चिडचिडी आईच तिच्या वाट्याला आलेली होती. वडील म्हणजे केवळ अप्पलपोट्या माणूस. आपल्या गरजा कशा भागतील ही एकच आणि एवढीच काळजी असलेला. दारू पिऊन यायचा तेव्हा एक प्रकारची धास्तावलेली भावना स्वर्णाला घेरून असायची लहानपणी. क्वचित आईवर आणि हिच्यावरही हात टाकायला कमी केलं

नव्हतं त्याने. आई शक्यतो त्याच्या सर्व गरजा पूर्ण करायची आणि मारहाणीपर्यंत वेळ येऊ द्यायची नाही. पण ती एकटी बाई कुठे कुठे पुरी पडणार. बऱ्याचदा स्वर्णाचा एखादा खूप दिवसांचा हट्ट पुरा करता यावा म्हणून, आईने काही पैसे बाजूला काढून ठेवावेत, आणि ऐन वेळी या माणसाने ते पैसे लंपास करावेत. मग आईला दोन्हीकडून त्रास व्हायचा. पैसे माझ्यापासून लपवून ठेवलेस म्हणून नवरा संतापून हात टाकायचा आणि तू खोटंच बोलतेस नेहमी, असं म्हणून स्वर्णा आकांडतांडव करायची. पोर लहान, तिची काय चूक असे वाटून आई, कशीतरी समजूत घालण्याचा प्रयत्न करायची.

शाळा कॉलेजमध्ये, बरोबरीच्या मित्र मैत्रिणींकडे असणाऱ्या छान छान वस्तू, कपडे, यांचा नेहमी हेवा वाटत राही स्वर्णाला. तिला ते सगळं आणि अजून बरच काही हवं असायचं, आणि ते मिळायची सुतराम शक्यता नसायची. मग आपल्याला ते आवडतंच नाही, असं ती स्वतःला आणि बाकीच्यांनाही काहीशा फटकळपणे सांगत राही. अर्थातच, शाळा कॉलेजमध्ये ती एक तुसडी, आणि सर्वांना नकोशी वाटणारी मुलगीच राहिली. रंजना मात्र स्वर्णाची अगदी जवळची मैत्रीण. ती तिला तिच्या सगळ्या वस्तू वापरायला द्यायची. तिला घरी बोलावून, जेवू

खाऊ घालायची. रंजनाचं अगदी मनापासून प्रेम होतं स्वर्णावर. स्वर्णाचं स्वतःखेरीज बहुधा कोणावरही प्रेम नव्हतं. त्याबाबतीत ती तिच्या वडलांवर गेली असावी.

अर्थातच स्वर्णाचा बराच वेळ रंजनाकडेच जायचा. तिची आईही, मुलगी चांगल्या वातावरणात राहते म्हणून आडकाठी करत नसे.

रंजनाच्या घरचं खेळीमेळीचं, प्रेमाचं वातावरण स्वर्णाला नेहमीच काहीसं खोटंच वाटायचं. असं कोणी कोणावर प्रेम करत नाही. प्रत्येकजण फक्त स्वतःवर प्रेम करतो असा तिचा ठाम समज होता.

प्रथमची भेट झाल्यावर आणि त्याच्याकडून या काहीशा गूढ, अद्भुत विषयांबद्दल ऐकल्यावर तिला तिचा मार्गच सापडल्यासारखं वाटलं. ‘मृत्यूवर जय, सगळया जगावर राज्य’ हा विचारच तिच्या आतापर्यंतच्या कुढत जगलेल्या आयुष्यावर उतारा आहे असं तिला वाटणं अगदी स्वाभाविक होतं.

ती अधिकच वरचेवर रंजूकडे कधी सहज, कधी अभ्यासाच्या निमित्त्याने जाऊ लागली. प्रथम बरोबर अधिक वेळ बोलणं होऊ लागलं. त्याने काही या विषयांवरची प्राथमिक पुस्तकंही तिला वाचायला दिली. तिनेही ती अधाशासारखी

वाचून काढली. हा असा विचार करणारा एकटा प्रथमच नाही तर हा एक वेगळा, मानव असून, अमानवी शक्ती प्राप्त करण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांचा पंथच आहे हे तिच्या, या वाचनाने लक्षात येऊ लागलं. तिच्या डोक्यात सतत हल्ली तेच विचार घोळत. रात्र रात्र जागून ती हे वाचत बसे आणि मग प्रथम बरोबर जाऊन त्यावर कधी चर्चा करते असं तिला होऊन जाई. तिचं तिच्या क्रमिक शिक्षणातलं लक्ष कमी कमी होऊ लागलं. एक दिवस तो म्हणाला, “माझ्यासारखे काही समविचारी मंडळी महिन्यात एकदा एकत्र भेटून महिनाभरात आपण काय वाचलं, काय प्रयोग केले, काय प्रगती केली, पुढे काय करायचं अशी चर्चा करतो. तुला यायचंय का आमच्या मिटींगला?” स्वर्णाला एकदम फार भारी वाटलं. आपल्याला अशा मिटींगला बोलावण्याइतपत आपली कुवत आहे याचा तिला प्रचंड अभिमान वाटला. तो पुढे म्हणाला, “पण या मिटींग्ज अत्यंत गुप्त असतात. त्यात नव्या व्यक्तीला आणायला परवानगी लागते. ती सहजा सहजी मिळत नाही. पण मला तुझ्यात तो स्पार्क दिसतो. तुझी तयारी असेल तर मी परवानगीसाठी प्रयत्न करेन.”

स्वर्णाने क्षणाचाही विलंब न करता हामी भरली.”नक्की विचार करून सांग. कारण यात प्रवेश स्वखुशीने करायचा

असतो, पण एकदा का केला की मग मागचे दोर पूर्ण कापून टाकायचे असतात. आपण नाही कापले तर इतर या मार्गातले लोक ते कापून टाकतात.

सर्वसाधारण लोकांना जोपर्यंत आपण काय करतोय हे कळत नसतं तोपर्यंत ठीकच असतं, पण जरा जरी भनक लागली तर अत्यंत क्रुरतेने ते आपल्याला संपवण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाऊ शकतात. सध्या आम्ही जे मिळवण्याच्या प्रयत्नात आहोत त्याचा फायदा पुढे जाऊन सर्वांना मिळू शकेल, पण सध्या लोक या सगळ्याकडे अघोरी विद्या या नजरेनेच पाहता त. तू नीट विचार कर. उद्या मला सांग."

"प्रथम, मला मुळीच विचार करायचा नाही. मी तयार आहे."

"ठीक आहे. ही नियमावली आहे या समूहात समाविष्ट होण्यासाठी. ती नीट वाच. उद्या मान्य असेल सगळं, तर या नियमावलीवर सही, आणि एन्ट्री फी पाच हजार रुपये घेऊन ये."

"पाच हजार?"

"हो."

स्वर्णाच्या डोक्यात त्या दिवशी फक्त ते पाच हजार कसे मिळवायचे एवढंच घोळत होतं. स्वर्णा त्या रात्री घरी आली ते हे सगळे विचार घेऊनच. तिचं हे असं हरवलेपण तिच्या आईच्या लक्षात आलं होतं. पोरगी प्रेमात बिमात पडली की काय, असा विचारही मनात येत होता. पण प्रेमात पडलेली मुलगी जरा जास्त नटू लागते, सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसते. हळूच मनाशीच हसते. इथे तर यातलं काहीच लक्षण नव्हतं. ही तर सतत पुस्तकात डोकं खुपसून बसते. कधी बाहेरही फारशी जात नाही मित्र मैत्रिणींबरोबर. येऊन जाऊन कॉलेज आणि रंजू! अभ्यासाचेच असतील विचार बहुतेक. तिने स्वर्णूच्या आवडीची भाजी केली त्यारात्री. मग रंजूचा फोन आला. बराच वेळ स्वर्णा फोनवर नाही, नको गं, नाही जमणार, वगैरे बोलत होती. शेवटी फोन बंद केला तिने, तेव्हा आईनं विचारलं, "कोणाचा गं फोन?" "काही नाही गं, रंजूचा फोन."

"काय म्हणत होती?"

"काही नाही गं." स्वर्णाला आता इरिटेट व्हायला लागलं होतं.

"काही नाही कसं? कशाला एवढं नाही नाही म्हणत होतीस?" आणि स्वर्णाला एकदम एक कल्पना सुचली. मग ती

आणखी जरा आढेवेढे घेऊन आईला म्हणाली, “अगं, ट्रीप काढताहेत वर्गाची. गोव्याला. पण खर्च फार आहे. जाऊ देना आई. आपल्यासारख्यांची कामं नव्हेत.”

“किती आहे खर्च?”

“दहा हजार रुपये.”

“काय? अरे बाप रे?”

“म्हणूनच नव्हते सांगत. जाऊ दे, दे सोडून.” मग ती खोलीत निघून गेली. आई रात्री बॅंकेची पासबुकं घेऊन बसली. दुसरे दिवशी स्वर्णा आईला म्हणाली, “आई मी ट्यूशन्स घ्याव्या म्हणते.”

“नको गं बाळा, तू तुझ्या अभ्यासावर कॉन्संट्रेट कर.”

“ते सांभाळून करीन.”

“बरं बघू नंतर. हे बघ, मी तुझ्यासाठी सोन्याचे कानातले करावेत म्हणून पैसे साठवत होते. पण कॉलेजची ट्रीपही तुला अनुभवायला मिळावी असं मला वाटतंय. ती मजा काही निराळीच. आता तू ठरव. तुला कानातले हवेत की ट्रीप?”

स्वर्णा काही क्षण तशीच बसून राहिली स्तब्ध. हे असं सहजासहजी काम होईल अशी तिची अपेक्षाच नव्हती. मग मात्र

उठली आणि आईच्या गळ्यातच पडली. ती आईला म्हणाली, “उद्या निम्मे पैसे भरायचेत. पाच हजार “ठीक आहे. चेक देते, कॉलेजला जाताना घे काढून.”

स्वर्णाला तिथल्या तिथे एक मस्त गिरकी घ्यावीशी वाटली. पण तिने स्वत:ला आवरलं. दुसरे दिवशी सहीचा कागद, आणि पैसे घेऊन ती प्रथमला भेटली रंजूच्या घरी. हळूच तिने तो न वाचताच सही केलेला कागद आणि पैसे प्रथमच्या हातात ठेवले. प्रथमचे डोळे चमकले. तो म्हणाला “या महिन्याच्या शेवटच्या शनिवारी भेटायचं ठरलंय. तेव्हा मी हे सर्वांच्या समोर मांडेन. जर हो म्हणाले तर पुढच्या भेटीला येता येईल तुला. नाही म्हणाले तर पैसे परत करेन तुझे.”

“हो, पण तू शब्द टाकशील ना.”

“हो ते तर नक्कीच. मला तुझ्याबद्दल पूर्ण विश्वास वाटतो. चरम मला खूप महत्व देतो. तोच मुख्य निर्णय घेणार, पण सगळ्यांना विचारून.”

“चरम?”

“हं, हे त्यांचं गुप्त नाव. प्रत्येकाला वेगळी ओळख दिली जाते. मला नाही, कारण मी त्यांच्यातला आणि बाकीच्या

जगातला मुख्य दुवा आहे. तुलाही मिळेल, प्रवेश मिळाला तर. बाकीच्या सामान्य दुनियेत राहूनच असामान्य कार्य करतोय आम्ही त्यामुळे गुप्तता फार फार महत्वाची.''

''हं!''

''चल, मी निघतो. आता या महिन्याच्या शेवटच्या शनिवारची वाट पाहू. तुझं भवितव्य तेव्हाच ठरेल.''

''हो. मी प्रचंड आतुरतेने वाट पाहीन त्या दिवसाची प्रथम!''

''मी पण!''

स्वर्णा रोज कॅलेंडरवरचा एक एक दिवस काटू लागली.

# ६

एक दिवस आई म्हणाली, “स्वर्णू, तुमची ट्रीप केव्हा गं?” स्वर्णा दचकलीच.”अं, अगं तारखा ठरताहेत अजून. पण ठरेल लवकरच.”

‘बाप रे. ट्रीपचं काहीतरी करायला हवं. बरीच मंडळी जाणार तर आहेत. पण केव्हा? उद्या काढू पत्ता. ’ नेमकी रंजू दुसरे दिवशी म्हणाली तिला, “काय यार तू नाही येत. मजा नाही येणार ट्रीपला.”

मग तिने सांगितलं पैशाचं कारण.

“रंजू तुला माहितच आहे ना घरची परिस्थिती. बाबा सतत तारेत. आई करून करून किती करणार.”

“हो गं! ए माझा पॉकेटमनी आणि भाऊबीज मिळून चार हजार निघतील. अजून कोणी देतय का बघुया का एक हजार? आईलाच विचार नाहीतर, तेवढे देईल कदाचित. चल ना यार.”

“अगं, आईला मी तुझ्याकडून पैसे घेतले असं कळलं ना, तर मारेलच मला.”

“मग नकोच ना सांगूस. पैशाचा विषयच नाही बोलत मी. तशीही मी कुठे येते तुझ्याकडे एवढी, तुच तर येतेस माझ्या नावाखाली प्रथमदाला भेटायला.”

“चल काहीतरीच!”

“हं, मॅडम, आम्हाला काय दिसत नाही काय? ए पण सिरीयसली, काय बोलता तुम्ही एवढे? आम्हाला जाम बोअर वाटतो बरंका तो.”

“तसं काही नाही गं रंजू. मला त्याचं वेगवेगळ्या विषयांवर बोलणं आवडतं, बाकी काही नाही.”

“मग ठीकय. कारण तो काही हजबंड मटिरीयल नाही बरंका.”

“छे गं, काहीतरीच. लग्नाचा कोण विचार करतय.”

“बरं बाबा, राहिलं. ए पण तू येते आहेस बरंका नक्की ट्रीपला. मी उद्याच आणते पैसे, तू भरून टाक.”

स्वर्णाने रंजूला एक घट्ट मिठी मारली. दुसरे दिवशी स्वर्णा ट्रीप ऑरगनायझर्स मुलांकडे पैसे घेऊन गेली. ‘एक हजार कमी आहेत, चालेल का?’ म्हणाली. स्वर्णाच्या घरची परिस्थिती चांगली नाही हे तसं माहीतच होतं सगळ्यांना. त्यांनी तिला

कन्सेशन दिलं. अर्थात आता त्या बोरींग लोकांबरोबर ट्रीपला जावं लागणार होतं. पण त्याला इलाज नव्हता. मग तिचं दिवस मोजणं आणि एक एक दिवस काटणं सुरूच राहिलं.

एक दिवस आईला ताप होता अंगात. ती म्हणाली "स्वर्णू, आज जरा कुकर लाव बाई. मला अगदी उठवेना गं." नेमकं आज तिला रंजूकडे जायचं होतं. प्रथमला भेटायला. आज शेवटचा शनिवार होता. आज मिटींग होणार. तिला प्रथमला तिची शिफारस करण्याविषयी परत बजावायचं होतं.

"आधी नाही का गं सांगायचंस? उद्या परीक्षा आहे. मला रंजूकडे जायचंय. वाट पाहत असेल ती."

"हो गं जा तू, फक्त कुकर लाव तेवढा. बाकीचं मी बसत उठत करून ठेवलंय. पण आता अगदी उठवेना गं."

"आई, मी आल्यावर लावेन. आत्ता नको कटकट करूस. प्लीज."

आई पाहतच राहिली. 'परवा आपल्या गळ्यात पडणारी हीच का मुलगी' असं वाटून गेलं तिला. 'पक्की बापावर गेलीय. नुसता अप्पलपोटेपणा. संस्कारांना काही अर्थ नाहीच का?'

आजारपणानं शरीर मऊ झालेलं, आता मनही विद्ध झालं. डोळे पाझरू लागले मग.

स्वर्णाला फक्त प्रथम दिसत होता. दुसरा कसलाच विचार नव्हता तिच्या मनात. ती पोचली तेव्हा तो नुकताच गेल्याचं कळलं. चिडचिड झाली मग तिची. रंजू म्हणाली चल जेऊया. मग तिने तिथेच जेवण केलं. मग मात्र थांबली नाही. तिला काही सुचत नव्हतं. आली घरी परत. तोपर्यंत आईने कुकर लावला होता. बाबा जेवत होते. त्यांचं झाल्यावर आई म्हणाली,

"ये गं, जेऊन घे."

"झालय माझं रंजूकडे." एवढंच बोलून ती खोलीत निघून गेली. आईनं घासभर भात खाऊन सगळं आवरून ठेवलं आणि ती परत जाऊन बेडवर पडली. नंतरचे दिवस हे असंच होत राहिलं. आईचं काहीच स्वर्णा ऐकून घेत नव्हती. जणू आता तिचा या घराशी काही संबंधच उरला नव्हता. तिला फक्त त्या गटात सामिल होण्याची घाई झाली होती.

जवळपास दहा दिवसांनी तिला रंजूने सांगितले की प्रथमदा परत आलाय. तो विचारत होता तुझ्याबद्दल. ओह. ती कॉलेज मधून सरळ रंजूकडे गेली. मग प्रथमने, रंजू किचनमध्ये कॉफी करायला गेल्यावर तिला मिटींगला येण्याची परवानगी

मिळाल्याचं सांगितलं. स्वर्णाने एक उंच उडी मारून आनंद व्यक्त केला.

प्रथम म्हणाला “नियम वाचलेस ना सगळे? कोणत्याही प्रकारे आपल्या भावभावनांचं प्रदर्शन न करणे हा पहिला नियम.”

स्वर्णा एकदम गंभीर झाली. प्रथम मनातल्या मनात हसला पण चेहऱ्यावरची रेघही त्याने हलू दिली नाही. स्वर्णा त्या दिवशी हवेतच घरी परतली. ट्रीप चार दिवसांवर येऊन ठेपली होती. तिने आईला बाकीचे पाच हजार मागितले. आईने फारसं काहीच न बोलता चेक लिहून दिला. इतर वेळी कदाचित स्वर्णाला आईचा अबोला लक्षात आला असता, पण सध्या तिची मन:स्थिती नव्हतीच हे काही पाहण्याची. प्रथमने तिला बरीच पुस्तकं दिली होती वाचायला. तिला ती सगळी पुस्तकं पुढच्या मिटींगच्या आत वाचून संपवायची होती. मध्ये चार दिवस ट्रीपमध्ये वाया जाणार होते. पण इलाज नव्हता. तिने दरवाजा बंद करून घेतला. पुस्तकं काढली बाहेर. त्यातून नियमांचा कागद पडला बाहेर. बिना सहीचा. सहीवाला त्या लोकांनी ठेवून घेतला होता. नियम वाचू लागली ती.

१ मृत्युंजय समूहात सामील होणासाठी मी आपला, जन्माने मिळालेला धर्म, लिंग, नाव, इत्यादी आपली जुनी ओळख सांगणाऱ्या गोष्टींचा मनातून त्याग करत आहे. सर्वसामान्यांना वाटणाऱ्या प्रेम, ममता, राग, लोभ, या आणि अशा सर्व भावभावनांचा मी त्याग करत आहे. आता द्वेष एका मृत्यूचाच. आमचा हा एकमेव शत्रू लवकरात लवकर शरण आणण्यात यश याविषयीच फक्त प्रेम!

२ शरीर, आपण स्त्री पुरूष, अथवा तृतिय पुरुषी असल्याचे सांगते, त्याकडे मनाने संपूर्ण दुर्लक्ष करून आपण सर्व केवळ मृत्युंजय मिळवणारे साधक आहोत या भावनेपासून मी कधीही ढळणार नाही.

३ आता हा समूहच आपले आप्तेष्ट, इतर नाती मी मनाने अव्हेरली आहेत.

४ संपूर्ण ब्रह्मचर्य या साधनेत आवश्यक आहे आणि कोणत्याही स्थितीमध्ये या पासून तनमन ढळू न देणे अत्यंत जरूरीचे आहे. मी ते आपले सर्वप्रथम कर्तव्य मानेन.

५ स्त्री असो वा पुरुष, आपला देह हा समूहाचा आहे, समूहाचे प्राथमिक उद्दीष्ट मृत्युवर जय मिळवणे आणि त्यायोगे सर्वोच्च मानवसमूह बनणे हा आहे, त्या अनुषंगाने कोणत्याही

प्रयोगास आपल्या शरीराचा वापर करावा लागला तर त्यास आपले सौभाग्य समजणे हे माझे कर्तव्य आहे.

स्वर्णाचं मन अभिमानाने फुलून आलं. आपण आता सर्वसामान्य न राहता खास बनणार आहोत ही भावना तिच्या मनात उभारू लागली. तिने पहिले पुस्तक वाचायला घेतले. रात्र सरली तरी ते बाड ती वाचतच होती. तिने आपल्या कपाटाचा एक कप्पा रिकामा केला होता. त्यात तिने ही पुस्तकं ठेवली. मग व्यवस्थित कपड्यांच्या घड्या एकावर एक रचून पुढे ठेवल्या. चुकून आईने कपाट उघडलेच तर हा कप्पा ती मुळीच उचकटणार नाही. मग रात्रीच्या शेवटच्या प्रहरी ती झोपेच्या अधीन झाली. हठयोगावरचं ते पुस्तक अत्यंत रंजक पद्धतीने लिहीण्यात आलं होतं. झोपेतही तिचा मेंदू यावरच विचार करत राहिला. त्याअनुषंगाने तिला अनेक चित्र विचित्र स्वप्ने पडत राहिली.

आता हे रोजचच झालं. पहाटेपर्यंत निरनिराळ्या पुस्तकांचा फडशा पाडावा. पहाटे केव्हातरी निद्रेच्या अधीन व्हावे.

मग ट्रीपचा दिवस उजाडला. तिला वाटलं नव्हतं, पण तिने खूप मजा केली. बीचवर दिवसभर हुंदडणं, मस्त खाणं पिणं,

समुद्रात डुंबणं, रात्री गाणी, डान्स, क्रुज, दिवस कसे गेले कळलंच नाही.

वेगळ्या दुनियेत प्रवेश करण्यापुर्वी हा बदल तिला छान वाटला. पाचव्या दिवशी रात्री सगळे परतले.

दुसरे दिवशी सकाळी आई उठवायला आली, उगाच कटकट करायला लागली. आपण आजपर्यंत काय काय केलं ते सांगू लागली. वैतागून आपण म्हणालो काहीतरी आणि वाजवली तिने सरळ कानाखाली.

संतापाने आग आग झाली तिची. ‘तुला खरंच पश्चात्ताप होईल अशी वागूनच दाखवेन आता’ असं वचनच दिलं तिने आईला मनातल्या मनात. घराशी असणारा दुवा अजूनच खिळखिळा झाला.

त्या दिवशी ती प्रथमला पहिल्यांदा बाहेर एकटी भेटली. त्याने मित्राची बाईक आणली होती. दोघे बरेच लांब हायवेच्या एका लहानशा हॉटेलमध्ये बसले. स्वर्णाने काय वाचलं, काय शंका आल्या सगळं सांगितलं. प्रथम, तिचा आवाका पाहून चाट पडला.

त्यांच्या समूहात निरनिराळ्या विद्यांचा अभ्यास करणारे निरनिराळे लोक होते. चरमच्या सांगण्यावरून त्याने स्वर्णाला सर्व विषयांवरची पुस्तके दिली होती. तिला कोणत्या प्रकारात जास्त आवड, गती वाटते ते पाहून त्या प्रयोगांमध्ये तिला सामिल करून घ्यावे असा त्यांचा मानस होता. स्वर्णाशी बोलल्यावर त्याच्या लक्षात आलं की तिला सर्वच विषयात रस आहे आणि गतीही. त्याला स्वतःलाही सर्वच विषयांत रस होता. आणि इतर देशातील या विषयीचे समज, गैरसमज या गोष्टींवर तो इतरांना माहिती पुरवण्याचे काम करी.

तसंच मंत्र विद्येतील निरनिराळ्या मंत्रोच्चारातून निर्माण होणाऱ्या लहरी, आणि त्यांच्या परिणामांची शहानिशा आणि अभ्यास हा त्याचाच विषय होता. पण स्वर्णाला यातले तेव्हा काहीच माहीत असण्याची गरज नव्हती. तिला चरमच काय तो विषय देईल असा त्याने विचार केला.

मग त्याने तिला अजून एक सांगितले जे ऐकून मात्र ती काहीशी विचारात पडली. स्वर्णा," घसा खाकरत तो म्हणाला, "लवकरच आपल्याला समूहाला भेटायचे आहे. सध्या तरी काही दिवस आपण याच शहरात राहून आपला अभ्यास सुरू ठेवणार आहोत. पण नंतर कदाचित आपण हे शहर सोडून जाऊ.

तेव्हा तुला तुझ्या घरी काहीतरी सांगावं लागेल. मनाची तयारी करून ठेव. आपण एकदा गाव सोडलं की निदान तीन महिने परत येणार नाही. एवढे दिवस तुला घरचे कसे सोडणार हा विचार कर."

"अच्छा! बरं झालं आधी सांगितलंस. मी तशी कल्पना देऊन आईच्या मनाची तयारी करून ठेवेन." मग अजून काही विषयांवर बोलणं झालं. अचानक स्वर्णा म्हणाली "किती जण आहेत समूहात ? प्रथम जरा अस्वस्थ झाला.

"तू प्रत्यक्ष भेटशीलच सगळ्यांना."

"हं, हो, म्हणजे अजून कोणी स्त्री?"

"नाही. तूच पहिली."

"अच्छा."

"बरं चल निघुया. तुला घरी पोचायला उशीर नको. जितकं लो प्रोफाईल राहशील तेवढं चांगलं. कोणाच्याही डोळ्यावर येईल असं काही नाही करायचं आपण."

"हं, हो." स्वर्णा जरा भेदरली होतीच, नाही म्हटलं तरी हे सगळं इतकं नवीन होतं, वाचनात आलेल्या बऱ्याच गोष्टींचं आकलन तिला झालं असलं तरी न समजलेल्या गोष्टी तिला

भेडसावत होत्या. मुख्य म्हणजे, भेटीचं दडपण होतं. शिवाय आईची कशी समजूत घालायची? खरंच तीन महिने बाहेरगावी जायला लागलं तर, असे अनेक प्रश्न तिच्या मनात पिंगा घालू लागले.

याच विचारात ती घरी पोचली. नेहमीपेक्षा तिला उशीरच झाला.''अगं कुठे गेली होतीस इतका वेळ?''

''रंजूकडे... जाणार होते, पण तेवढ्यात कॉलेजचा एक ग्रुप भेटला. मग त्यांच्याबरोबर बाहेर गेले. लांब गेलो होतो त्यामुळे सगळे निघाल्याशिवाय निघता येईना.''

''हं!'' आई काहीशी विचारात पडलेली दिसली.''रंजू का नाही आली मग?''

''आली हो.... नव्हती, कारण तिचा फोनच लागला नाही.''

''हं. इथे येऊन गेली ती.''

''अं, हो का? काय म्हणाली?''

''काही नाही, ट्रीपच्या गमती सांगत बसली.''

''ओह!''

''स्वर्णा, इथे बस माझ्याजवळ. हे बघ बाळा, तुझ्या वयाच्या मुलीवर मी हात नको होता उगारायला. सॉरी, मला माफ

कर बेटा. पण तुझी अलिकडे फार काळजी वाटते बाळा मला. तुझं ना जेवणात लक्ष असतं, ना बोलण्यात. रात्र रात्र जागून काय एवढा अभ्यास करतेस तुझं तुलाच ठाऊक. कारण सेमिस्टरला मार्क्स काही फारसे चांगले नाहीत मिळालेले.

हे बघ तुझ्या वयातल्या मुलींना नटायची खूप हौस असते. छान दिसावं, सगळ्यांबरोबर बाहेर जावं, मजा करावी असं तुला वाटणं आणि तू तसं वागणं यात काहीच चूक नाही. मी माझ्या परीने प्रयत्नही करते तुझी हौस मौज भागवण्याचा. पण एक गोष्ट लक्षात ठेव बाळा. स्वत:ची संवेदनशीलता तू हरवू देऊ नकोस. दुसरं, स्वत:च्या शीलाला जप. गरीबाला त्याचाच आधार असतो. जपून वाग आणि आनंद घे जीवनाचा.''

स्वर्णाला कीव आली समोर बसलेल्या बाईची. फार फार परकी वाटली तिला ती. काहीच तर जुळत नाही. आई म्हणावं तरी कसं. ती परक्या नजरेने पाहत बसून राहिली. तिचा अलिप्तपणा म्हणजे न उतरलेला राग आहे अशी समजूत झाली आईची. मग तिने तो विषय वाढवला नाही. एकदा डोक्यावरून हात फिरवून म्हणाली, ''जा, कपडे बदलून ये, मग जेऊया.'' स्वर्णा पडत्या फळाची आज्ञा घेऊन खोलीत शिरली.

आता तिला फक्त वेध लागले होते ते खास भेटीचे. आई जे काही मगाशी बोलत होती त्यात तिला काडीमात्र इंटरेस्ट वाटत नव्हता. ना नटण्यात, ना कोणी चांगलं म्हणण्यात, ना मुलांमध्ये. म्हणजे आपण नक्कीच काही वेगळे आहोत. खूणच पटली तिला. आता मगाच्या साऱ्या शंका कुशंका नाहीशा झाल्या. आईचं समजावणं असं विरूद्ध दिशेने घेऊन गेलं तिला.

आता ती आईशी सपशेल खोटं बोलायला मनाने तयार झाली. वेळ येईल तेव्हा सुचेलच काय सांगायचं. मग तिने मिळालेली सर्व पुस्तकं वाचून संपवण्याचा सपाटा लावला. सगळेच विषय तिला प्रचंड इंटरेस्टींग वाटत होते. त्यातले अनेक बारकावे तिला जाणून घ्यायचे होते.

'वर्चस्व... मानवजातीवर वर्चस्व... ' सगळयात मोठी नशा होती यात... कोणालाही गिळंकृत करण्याची ताकद होती या नशेत. स्वर्णा तर बच्चीच होती.

आजपर्यंत परिस्थितीने तिला दया माया फारशी दाखवली नव्हतीच. आईच्या मनाची ना तिला जाणीव होती ना फिकीर. ती पूर्णपणे या नशेच्या आहारी न जाती तरच नवल.

पाहता पाहता भेटीचा दिवस जवळ येऊ लागला. स्वर्णाला काही सुचत नव्हतं. 'आपण कसं वागायचं, बोलायचं,

कपडे कोणते घालावेत?' ती हजार वेळा ठरवत होती आणि तो विचार निकालात काढत होती. मग तिने प्रथमला विचारायचं ठरवलं. परत वाटलं नकोच. परवा कोण कोण आहेत समूहात असं विचारल्यावर एकदम सावध झाला. लगेच जाऊया परत म्हणाला. टाळले त्याने सगळे प्रश्न. मग तिला वाटलं कपड्यावर काय आहे? आपण नेहमीची जीन्स टॉप घालून जाऊ. महत्वाचं आहे आपल्याला किती इंटरेस्ट आहे या विषयात, किती ठाम आहोत आपण हे त्यांच्यापर्यंत पोहचणं. मग तिने आपल्याला आलेल्या शंका, पटलेलं न पटलेलं, असं बरंच काही लिहून काढलं. शेवटी एकदाचा तो दिवस उजाडला. आदल्या रात्री स्वर्णाला एक मिनिटही झोप लागली नाही. दुसरे दिवशी पहाटेसच ती उठली. आंघोळ वगैरे उरकून तयार झाली. आई उठली तेव्हा स्वर्णा चहाचा कप घेऊन खिडकीशी बसलेली तिला दिसली.

"का गं? लवकर उठलीस?"

"हो. आज दोन ठिकाणी ट्यूशन्स घ्यायला जायचय."

"अगं? कुठे? काहीच बोलली नाहीस?"

"बोलायचं काय आई, पहिली ते पाचवीच्या मुलांना शिकवायला चाललेय. काही मोठा पराक्रम नाही."

“अगं पण कोण लोक आहेत? घरी कोण असणाराय?”

“आया असणाऱ आहेत पोरांच्या आणि अर्थात पोरं. रंजूच्या भावाच्या ओळखीने मिळाल्यात.”

“बरं बरं. सांभाळून कर काय ते. तुझा स्वत:चा अभ्यास मागे पडू देऊ नकोस म्हणजे झालं.”

“हो गं!”

मग स्वर्णा खोलीत निघून गेली. बरोबर ८ वाजता बाहेर पडली. यायला उशीर होईल असं सांगून गेली. स्वर्णा हल्ली प्रथमला बाहेरच भेटत होती. आजही त्यांचं बाहेरच भेटायचं ठरलं होतं. पण ती आधी रंजूकडे गेली. उगाच तिच्याकडून एक पुस्तक घेतलं, मग सहजच सांगावं तसं म्हणाली की प्रथमने तिला काही ट्यूशन्स मिळवून दिल्यात, आजपासून सुरू करतेय. रंजूला आश्चर्यच वाटलं. प्रथमदाच्या कुठे एवढ्या ओळखी? पण स्वर्णू म्हणतेय तर असेलही. मग तिथून ती प्रथमला भेटायला ठरलेल्या ठिकाणी गेली.

## ७

ते दोघे बसने एका ठिकाणी पोहोचले. परत दुसऱ्या बसने भेटीच्या ठिकाणी. मग मात्र ते चालत निघाले. वस्ती हळूहळू विरळ होत गेली. मग पार निर्मनुष्य रस्ता लागला. उन्हं डोक्यावर आलेली. बरीच पायपीट झाल्यावर प्रथम अचानक कच्चा रस्ता सोडून एका माळरानात शिरला. समोर एक टेकाड दिसत होतं. टेकाडाला वळसा घालून दोघं जरा पुढे आली आणि प्रचंड दुर्गंधी त्यांच्या घ्राणेंद्रियांपर्यंत पोहोचली. स्वर्णाने नाकाला रुमाल लावला तरी पार जीभेवर त्या दुर्गंधीची चव आल्यागत तिला झालं. काही कळण्यापूर्वीच तिला भडभडून उलटी झाली. प्रथम शांतपणे तिच्याकडे पाहत होता. मग त्याने पाण्याची बाटली पुढे केली. तिने कसंबसं पाणी तोंडावर मारलं.

"तुला कसं काहीच होत नाही?"

तो काहीच बोलला नाही. ते पुढे चालत राहिले. दुर्गंधी कमी झाली. पुढे गेल्यावर जरा चढ लागला. चढावर चढल्यावर आसपासचा परिसर चौफेर दिसू लागला. मगाशी ज्या ठिकाणी दुर्गंधी पसरली होती तिथे जवळच एका खड्ड्यात काहीतरी

कुजलेलं दिसत होतं. गिधाडं हवेत भिरभिरत होती. त्यातलं एखादं खाली झेपावलं की इतका वेळ त्या ठिकाणी ताव मारणारे कावळे क्षणात भेदरून वर उडत. गिधाडं लचका तोडून बाजूला झाली की कावळे परत खाली झेपावत. जरा आणखी वर गेल्यावर तिने खाली वाकून पाहिलं तेव्हा त्या खालच्या खोलगट भागात अनेक प्राण्यांचे मृतदेह पडलेले, काही कुजलेले, अर्धवट लचके तोडलेले तिला दिसले. पुन्हा एकदा आपल्याला उलटी होणार असं वाटलं तिला. पण झाली नाही. पोटात मात्र प्रचंड मळमळून आलं.

“जारण मारण विद्येचा सराव करताना आपल्या समूहात ल्या कर्दम या मांत्रिकाने केलेल्या प्रयोगात मृत्यू पावलेले हे प्राणी आहेत.”

स्वर्णा क्षणभर थांबलीच. प्रथम नक्की काय म्हणतोय हे लक्षात आल्यावर तिच्या अंगात कापरं भरल्यासारखं झालं. कालपर्यंत पुस्तकात वाचलेल्या गोष्टी ज्या सुरस वाटत होत्या, त्यातली एक साधीशी गोष्ट समोर प्रत्यक्षात पाहिल्यावर तिची झालेली अवस्था पाहून प्रथमला आपली निवड चुकली की काय असा संशय मनात आला. त्याने तिला थांबायला सांगितले. तो

बराच वेळ तिथेच थांबला. पुढे जावे की परत फिरावे असा संभ्रम त्याच्या मनी उद्भवला.

स्वर्णा त्याच्याजवळ गेली.''माझी अवस्था बघून मी निभावू शकेन का नाही असा संशय आहे का? म्हणत असलास तर अशीच खाली जाऊन त्या खड्ड्यातला एक मृतदेह उचलून आणते.'' असं म्हणून तिने आलेल्या दिशेने चालायला सुरवात केली. प्रथमने तिला थांबवले. मग त्याने खूण केल्यावर ते दोघे पुढच्या दिशेने चालत निघाले.

पुढे बराच वेळ चालल्यावर परत एक टेकडीवजा उंचवटा आला. इथे मात्र प्रथम त्यावर चढला नाही. त्याने त्या टेकडीच्या कडेने त्याला वळसा घालायला सुरवात केली. पाठोपाठ स्वर्णा.

वळसा घालता घालता स्वर्णाला जाणवलं की आपण खाली खाली उतरतोय. मग उतरत उतरत ते एका घळीत येऊन पोहोचले. थोडक्यात ती टेकडी एखाद्या शंखासारखी होती. एका बाजूने जास्त उंच, दुसऱ्या बाजूने कमी उंच, मध्ये कपारी. त्या कपारीतून आत पाहिलं तर चक्क खाली सपाट जागा. आश्चर्य वाटावं असंच सगळं. बाहेरून कल्पनाही येत नव्हती की इथे

आत एवढी मोठी गुहा असेल. गुहाच म्हणावं का? स्वर्णाला प्रश्नच पडला.

तिथून खालची गुहा दिसत असली तरी तिथे पोहोचणं सोपं नव्हतं. कपारीतून अगदी एक एक पाऊल पुढे टाकत, डोकं सांभाळत, अंगाची जुडी करत ते कसेबसे खाली उतरत गेले. पाय सटकायची भिती होतीच, पण अंगही सोलवटून निघत होतं कडेच्या अणकुचीदार कपारींमुळे.

शेवटी एकदाचे दोघे आत उतरले. फार कमाल जागा वाटली ती स्वर्णाला. खालून वर पाहिलं तर खडकाचं छत दिसत होतं. पण कडेकडेने संपूर्ण खडक कातरून काढल्यासारखा. वरच्या बाजूच्या कपारींच्या फटीतून कुठे आकाश दिसत होतं, तर काही भागातून हिरव्या गार उंच झाडांनी तो भाग झाकला गेला होता. हवा आत येत होती. निसर्गाचा हा अविष्कार पाहून स्वर्णा अचंबित होऊन स्तब्ध झाली. पण काही क्षणात ती भानावर आली. आपण इथे कशासाठी आलोय याचं भान आलं तिला आणि ती इकडे तिकडे अधिकच कुतुहलाने पाहू लागली. त्या सपाट जागेवरही कपारींचे खांबासारखे भाग खालपर्यंत येऊन जमिनीला जोडले गेले होते. त्यामुळे मोकळया जागेतही लहान लहान गुहांचा भास होत होता. स्वर्णा काही म्हणणार

तेवढ्यात मागून तिच्या डोक्यावर काहीतरी आपटलं आणि तिला अंधारी आली. ती खाली कोसळता कोसळता तिला कोणीतरी सावरलं.

"कर्दम... !"

कोणीतरी जरबेच्या आवाजात ओरडलं. त्या आवाजाच्या मालकानेच तिला सावरून धरलं होतं. त्याने सावकाश तिला खाली झोपवलं. तोंडावर पाण्याचा हबका मारला. हळू हळू स्वर्णाला शुद्ध आली. तिने डोळे उघडले तेव्हा दोन तेजस्वी डोळे तिच्याकडे रोखून पाहत होते. ती जरा सावध झाली. सावरून उठण्याचा प्रयत्न करू लागली. तेजस्वी डोळयांच्या त्या तरुणाने तिच्या खांद्यावर दाब देऊन थोडावेळ तसेच पडून राहण्याविषयी सुचवलं. तिचे डोळे परत मिटले. काही वेळाने मात्र ती संपूर्ण शुद्धीवर आली. हळू हळू उठून बसली. जे घडलं ते इतकं अनपेक्षीत होतं की ती प्रचंड भांबावून आणि धास्तावून गेली. प्रथमच्या चेहऱ्यावर राग स्पष्ट दिसत होता. तो लांब जाऊन बसला होता.

कर्दम, ज्याने तिच्या डोक्यावर हातातल्या चिमट्याने प्रहार केला तो अजूनही तिरस्कृत नजरेने तिच्याकडे पाहत होता. बाकीच्या दोघातला एक संतापाने पाहत होता तर दुसरा थंडपणे.

तो तेजस्वी डोळयांचा तरूण मात्र अत्यंत काळजीने तिच्याकडे पाहत होता.

“काही त्रास होतोय का?” शेवटी त्याने विचारले.

“नाही”,ती अत्यंत अस्फुट शब्दात म्हणाली. मग तो उठला. मधोमध एक मोठा दगड होता त्यावर जाऊन बसला. सगळे नकळत त्याच्या भोवती पोहोचले. स्वर्णाही उठून हळू हळू त्याच्या समोर जाऊन उभी राहिली. त्या तेजस्वी डोळयांनी जणू इतका वेळ तिच्यावर नजरबंदी केली होती. आता ती डोळयांच्या कोपऱ्यातून बाकीच्या गोष्टी निरखू लागली. त्याचा रंग स्वच्छ गुलाबी गोरा होता. उंची भरपूर. हात तर अजानुबाहू आहेत की काय असं वाटायला लावणारे. बोटं लांबसडक. पेहराव अत्यंत साधा. सुरवार कुडता. गळयात रुद्राक्ष माळा. आणि त्याचे डोळे म्हणजे मुर्तीमंत प्रेम! जगातला सगळा द्वेष, राग, तिरस्कार यां दोन प्रेममय डोळयांत बुडून कायमचे नष्ट व्हावेत!

“मी चरम! या समूहाचा चालक. या समुहाची सुरवात जरी मी केली असली तरी प्रत्येकाच्या मताला इथे महत्व आहे.” तो शांत स्वरात बोलू लागला.”हा कर्दम! ज्याने तुझ्या डोक्यावर प्रहार केला. त्याविषयी आपण नंतर बोलू.” कर्दम आणि

प्रथमच्या चेहऱ्यावरचे संतापजनक भाव शांतपणे निरखत चरम म्हणाला.''कर्दम मारण तंत्राचा अभ्यासक.''

'कर्दम हा आदीमानव...!' हो स्वर्णाला तो आदीमानवच वाटला. हातभर लांब दाढी, तेवढ्याच केसांच्या जटा, डोळे लालबुंद, अवाढव्य शरीर, कमरेला फक्त लुंगी गुंडाळलेली, गळयात कवड्या, रुद्राक्ष, बारीक हाडांच्या माळा. अंगावर भरपूर केस, त्यातले निम्मे पिकलेले. रंग करपल्यासारखा काळा. हातात चिमटा. कमरेला कटदोऱ्यात अनेक पिशव्या अडकवलेल्या. त्यात बुक्का, गुलाल, राख, अशा अनेक वस्तू. एकंदर पाहताक्षणी भय वाटावं असा कर्दम!!

कर्दम उर्फ मारत्याच्या मामाने त्याला ही विद्या शिकवली. लांब विदर्भातल्या एका खेड्यात त्याचा जन्म झाला होता. जन्मानंतर काहीच दिवसात आई गेली. बापाने दुसरी सोयरीक केली. मामाने बहिणीची आठवण म्हणून याला ठेवून घेतला आपल्याकडे. मामाचा रोजगारच मांत्रिकाचा होता. खेड्यापाड्यात काही झालं की मांत्रिकाकडे जायची माणसं. दवापाण्याची काही सोयच नव्हती. मामा त्यांना उपाय सांगायचा. लोकांची श्रद्धा होती याच्यावर. मामा ब्रह्मचारी होता. बऱ्याचदा स्मशानांत सापडायचा.

"मारत्या, जशी करनी उतरवता येती तशी करता पन येती.'' मामा म्हणाला एकदा कर्दमला.''पन आपन त्या नादाला लागू न्हाई. करनी उतरवनं पुन्याचं काम. करनी करनं पाप.'' कर्दम मन लावून ऐकायचा. मामाने लहानपणीच त्याला या शास्त्राची शिकवण द्यायला सुरवात केली होती.''एक आपली माय सोडली तर दुसऱ्या बाईचा संपर्क येऊ दिऊ न्हाई. आपली समदी शक्ती गमावून बसतो आपन. हितं समशानात बाया फकस्त मुर्दा येत्यात. त्यांची काय भ्या न्हाय. पण जिंदा बाईचा संपर्क लय वाईट. तुला यात काय तरी करायचं आसल तर एव्हडं ध्येनात ठिव. एकांद्या बाईवरची करणी काडायची आसल तर तिला तोंडावर पदूर घ्याया सांगावा. कांबळ्यांन समदं आंग झाकाया सांगावं आनी मंग करनी काडायचं काम करावं.''

मामाकडची विद्या शिकून संपली तसा कर्दम मामाच्या सांगण्यावरून लांब तिकडे नागपुराच्या पलीकडे गेला. मामाच्या ओळखीचा एक मांत्रिक जारण मारणं विद्येत पारंगत होता. प्राण्यांना मारून, लिंबू सुया वापरून, काळ्या बाहुल्या करून त्याला सुया टोचून असे बरेच मारण विद्येचे प्रकार त्याला अवगत होते.

त्याने कर्दमला त्यातले काही शिकवले. पण यातले कोणतेही वापरण्यापूर्वी मामाची परवानगी घे असं सांगून त्याने त्याला त्या विद्या वापरण्यापासून परावृत्त केले. शिवाय या विद्या उगाच निरपराध लोकांवर वापरायच्या नाहीत. वगैरेही उपदेश दिला.

कर्दम परत आला. मामा त्याच वर्षी आजारपणात गेला. जाताना “मारत्या, आता तूच माझी गादी चालव” म्हणाला. पण कर्दमचे मन त्या लहान गावात रमेना. त्याला अजून काहीतरी मोठं करावं असं वाटू लागलं. तो शहरात आला.

त्याचा तो अती प्रचंड देह, विचित्र वेष, दाढी, जटा वगैरे पाहून सहसा कोणी त्याच्याशी बोलायलाही तयार होईना. तशातच त्याला हठी भेटला. मूळ नाव रामदास. गोटीबंद शरीर, वर्ण उजळ, उंची बेताची, काष्ट्याचं गुडघ्यापर्यंत नेसलेले धोतर, डोक्याचा गोटा आणि शेंडी, नजर काहीशी धुंद. ज्या धर्मशाळेत मारत्या उतरला होता तिथेच हाही राहत होता. पहाटेपासूनच याची हठयोगसाधना सुरू होई. सकाळी चार घरी माधुकरी मागून येई. त्यानंतर जे मिळेल ते शिजवून खायचं. दुपारनंतर परत क्रिया, मुद्रा, आसने, धारणा वगैरे सुरूच राही. ध्यानधारणेच्या आधी अफूची गोळी लावायचा.

कर्दमला रामदासची विद्या ग्रहण करण्याची पद्धत फार आवडली. त्याच्यासारखीच चिकाटी, स्त्रियांचा तिरस्कार, सर्व काही जुळणारं वाटलं त्याला. दोघांची गट्टी जुळली. धर्मशाळेत राहणाऱ्याना हे दोघेही विचित्र वाटत. त्यामुळे दोघे सतत एकमेकांबरोबरच राहू लागले. घनिष्ट मैत्री जमली दोघांची. दोघे मिळून मग एकदा काशीला जायला निघाले.

वाटेत एका धर्मशाळेत फकिरा भेटला. पार पंजाबातील एका टोकाच्या खेडेगावातून आलेला. त्याची पटावरची विद्या हा एक वेगळाच विषय होता. फकिरा जन्माने मुस्लिम, पण एका हिंदू साधूने लहानाचा मोठा केला. साधूबाबा धूनीमधून लोकांना काही प्रसाद, अंगारा वगैरे काढून द्यायचा. त्याने त्यांचे छोटेमोठे आजार बरे व्हायचे. लोकं हळू हळू मानू लागली त्याला. तशात एकदा एक लहान मूल सापडलं. रस्त्याच्या कडेला बसून रडत होतं. याने घरी आणलं. गळ्यात ताईत, दंडात गंडा होता. त्यावरून हा मुस्लिम असावा असा कयास बांधला. त्याला थोडी रोटी आणि वर थोडी अफू चारल्यावर ते पोर गाढ झोपून गेलं. साधुबोवाला मग याला वाढवणं फार जाड गेलं नाही. नाव ठेवलं रहीम. हळू हळू रहीम मोठा होत होता. साधूबाबाकडून आणि

त्याच्या बरोबर हिंडताना इतर साधुफकिरांकडून रहीम निरनिराळ्या गोष्टी शिकत गेला.

पटावरची विद्या ही त्यातलीच एक. पण मग त्याचीच गोडी लागली. ते मंत्र, त्या आकृत्या, ती यंत्र सगळंच याला फार आकृष्ट करत गेलं. हळू हळू तो पारंगत होत गेला. मुळात डोक्याचा अत्यंत शांत आणि हुशार रहीम मग याच मार्गाला लागला. जन्मल्यापासूनची पायाला लागलेली भिंगरी साधूबाबाच्या निधनानंतर अधिकच वेगाने फिरू लागली. पार हिमालयापासून खाली दक्षिणेतल्या टोकापर्यंतच्या सर्व ठिकाणी रहीम फिरून आला. तिथल्या या मार्गातील लोकांना आपसूक भेटू लागला. आपली विद्या त्यांना आणि त्यांची आपण शिकत राहिला. आता नाव मिळालं फकिरा.

चरमचं खरं नाव होतं चारुहास. अत्यंत कुशाग्र बुद्धीमत्तेचा हा तरुण आपले अमेरिकेतील उच्चशिक्षण अर्धवट सोडून भारतात परतला जेव्हा वडलांचा अचानक मृत्यू उद्भवला. या मृत्यूचा त्याच्यावर फार परिणाम झाला आणि त्याला या सततच्या मृत्यूच्या सावटात जगणे अस्वस्थ करू लागले. काही करून मृत्यूवर विजय मिळवता आला पाहिजे या तळमळीने

त्याला याविषयातील प्रत्येक शास्त्राचा अभ्यास त्याला तंत्रविद्येचा मार्ग दाखवू लागला.

मग या विषयातील तज्ञाच्या शोधात तो भारतभर फिरला. पण तंत्रविद्या जाणणारे मुळात फार कमी लोक, त्यातून जे खरंच जाणकार होते त्यांनी याला परावृत्त करण्याचीच तयारी चालवली. मग उरले हे अशिक्षित पण पूर्ण विश्वासाने प्रयत्न करणारे, काहीसे जगापासून तुटलेले, जगाने नाकारलेले, आणि म्हणूनच जगावर राज्य करण्याची मनीषा बाळगणारे. यांना पैशाचा लोभ नव्हता, लोभ होता तो सत्तेचा, आणि चारुहासच्या बरोबर राहिल्यास ती मिळेल असा पक्का विश्वास त्यांना वाटत होता.

"हा हठी! हठयोगात पारंगत. अनेक सिद्धी प्राप्त आहेत त्याला." रामदासची ओळख करून देत चारुहास म्हणाला.

हठीची नजर काहीशी भिवयांमध्ये गुंतलेली. काहीशी धुंदी नजरेत. पण चेहरा अत्यंत अस्वस्थ!! 'काय चाललंय या माणसाच्या डोक्यात?' स्वर्णाला प्रश्न पडला. पण कर्दमपेक्षा हा माणूस तिला जास्त भरवशाचा वाटला.

"हा फकिरा!" लांब रंगीत लुंगी, वर काळा कुडता. मेंदीने रंगवलेले केस आणि छातीवर रुळणारी दाढी. डोळ्यात

सुरम्याची रेघ. डोक्यावर गोल टोपी. भिवया कोरीव, सुरमा घातलेल्या डोळयांना उठाव देणाऱ्या. हातात चिलिम. तरुणपणात देखणा असावा. स्वर्णा एकेकाला पारखत होती.''हा वशीकरण विद्या उत्तम जाणतो.''

चरम सोडता बाकीच्या सर्वांना पाहून स्वर्णाचा भयंकर मोठा भ्रमनिरास झाला होता. ही अडाणी माणसं या समूहात असतील अशी तिने स्वप्नातही कल्पना केली नव्हती. त्याच वेळी चरम हा इतका देखणा तरुण असेल आणि पहिल्या नजरेतच आपण असे त्याच्याकडे मंत्रमुग्ध होऊन ओढले जाऊ अशी ही कल्पना तिने केली नव्हती. तिच्या सगळयाच कल्पानांना सुरुंग लागला होता आणि तरीही या समूहात आपल्याला स्थान मिळायलाच हवं याविषयी ती कित्येक पटीने ठाम झाली.

''प्रथमला तू ओळखतेसच.'' त्याला कोडवर्ड नाही. तो बाहेरच्या जगातला आमचा दुवा. या सर्वांना हे माहित होतं की नवीन सदस्य येणार आहे. पण ती एक स्त्री आहे हे नव्हतं माहित त्यांना. म्हणून जरा चकित झाले. ब्रह्मचर्याबाबत फार कडक नियम आहेत कर्दम आणि हठीचे.'' स्वर्णा केवळ ऐकत होती. पाहत होती. पण या वाक्यासरशी ती सावध झाली. प्रथमने

दिलेल्या पुस्तकांमध्ये जरी ब्रह्मचर्य फार महत्वाचं मानलं गेलं असलं, तरी तिने तिच्या बाजूने जो रिसर्च केला त्यामध्ये ब्रह्मचर्याची व्याख्या, त्याचं तंत्रविद्येतलं स्थान, सनातन आणि तांत्रिक यांच्यातील यावरून झालेले वाद हे सगळं तिला आठवलं. नेहमीप्रमाणे ती पट्कन बोलणार होती. पण मग कर्दमचा मगाचा प्रहार तिला आठवला आणि गप्पं बसायचंच ठरवलं तिने. पुढे चरम म्हणाला, “आता तुझा या समूहात प्रवेश होऊन तुला गुप्त ओळख दिली जाईल. तो विधी आपण लवकरच करू. पण तत्पुर्वी आपल्या पैकी कोणाला काही शंका असेल, सूचना करायची असेल तर त्याने ती जरूर मांडावी.”

“एका बाईमान्साला आपल्यात आनून तुमी चूक करताय. आतापर्यंत जे काही आपन करत आलोय त्यात बाईमान्साला स्थान नाही. उलट तो आपल्या कामात एक मोठा धोंडा हाय. मला माझ्या साधनेत बायामानसांचं दर्शनहीनगं. हठीलाही. आज आमच्या तीन महिन्याच्या साधनेचा शेवटचा आठवडा सुरू होत आसताना हीचं दर्शन झालं. सगळी तीन महिन्याची मेहनत वाया गेली.” कर्दम तावातावाने तावातावाने बोलू लागला.

हठी म्हणाला, “आम्हाला आधी कल्पना दिली असती तर मी सपशेल नकार दिला असता.”

फकिरा मात्र काहीच बोलला नाही. तो तीक्ष्ण नजरेने चरमकडे आणि स्वर्णाकडे पाहत होता. विश्वाचे वेध घेणारे डोळे, त्यांना कसल्या काळ्या सावल्या दिसत होत्या की तो प्रचंड विषण्ण नजरेने त्या दोघांकडे आलटून पालटून पाहत होता?

प्रथम म्हणाला, “काहीही असलं तरी कर्दमचं वागणं अत्यंत घृणास्पद होतं. एका स्त्रीवर हल्ला?”

कर्दम त्यावर अधिकच भडकला. सरळ स्वर्णाच्या समोर जाऊन उभा राहिला आणि दरडावून म्हणाला, “ए पोरी, ताबडतोब निगून जायाचं हितून. केलीस ही जागा भ्रष्ट. आता परत समदी शुददी करावी लागल. पन ध्येनात ठीव, परत कधी फिरकू नगं हितं. दिसलीस तर जित्ती नाही राहायचीस, सांगून ठेवतो.”

चरम आणि प्रथम दोघेही जागेवरून उठून स्वर्णाच्या दिशेने सरसावले.

“अहंकार...तंत्रविद्येचा सर्वात मोठा शत्रू अहंकार! ह्याला दूर केलं नाहीत तर तंत्रविद्येत प्रगती अशक्य!” स्वर्णा

कर्दमच्या समोर ताठ मानेने न घाबरता उभी राहून बोलू लागली.”श्री शिव पहिले तांत्रिक! स्वत: सांगून ठेवलय त्यांनी. पार्वती, जिला तांत्रिक, आद्यभैरवी मानतात, भैरवी म्हणजे तांत्रिक स्त्री किंवा साधिका. हे दोघे पती पत्नी. तंत्र विद्येचा नियम एकच, कोणालाही विनाकारण त्रास देण्यासाठी, ही विद्या जो वापरतो त्याचा ऱ्हास निश्चित. स्वर्णा ठामपणे बोलत होती. मी प्राथमिक सर्व माहिती मिळवली आहे. मेहनतीने अभ्यास करून मिळवली आहे. मला आता प्रत्यक्ष साधना करायची आहे. आणि ती मी करेनच. तुम्ही सामावून घेतलत तर ठीकच नाहीतर माझी मी करेन. मला कोणीही थांबवू शकत नाही. तुम्ही मला सामावून घेतलत तर फायदाच आहे. स्त्रीच्या, विशेषत: कुमारी स्त्रीच्या शरीरातील चुंबकिय तत्व सर्व शक्तींचा समतोल राखण्यास मदत करतात. तंत्रविद्या वैदिक काळापासून अस्तित्वात आहे. आणि अनेक स्त्रियां या विद्येत पारंगत असल्याचे दाखले आहेत. त्यातल्या काही कुमारिका होत्या तर काही विवाहित. स्वर्णा अत्यंत त्वेशाने बोलत होती. चरम अत्यंत कौतुकाने तर बाकीचे सारे आश्चर्याने तिच्याकडे पाहत होते. प्रथमलाही तिने परत एकदा चकित करून सोडले. कर्दम नकळत

दोन पावलं मागे सरकला. ही मुलगी एवढा अभ्यास करून आली असेल अशी मुळीच त्याने कल्पना केली नव्हती.

स्वर्णा पुढे म्हणाली "तुम्ही सर्व जण आपापल्या क्षेत्रात ज्ञानी आहात. माझी परीक्षा घेऊ शकता. पास झाले तर सामावून घ्या नाही तर मी परत वळूनही पाहणार नाही या जागेकडे."

"कर्दम, हे तुझं वागणं अत्यंत अशोभनीय होतं. मागे हो." चरमने शांत पण ठाम स्वरात जरब दिली. त्याला राहून राहून स्वर्णाच्या धारिष्ट्याचं कौतुक वाटत होतं.

प्रथम आल्यापासून फारसं बोलला नव्हता. तो म्हणाला "हिची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे, निदान आज तरी. यानंतर समूह जो निर्णय घेईल त्याप्रमाणे ही समूहाचा हिस्सा बनेल की नाही हे ठरेल, त्यानंतरची संपूर्ण जबाबदारी तिची स्वत:ची असेल. पण जोपर्यंत ही समूहाचा हिस्सा बनत नाही तोवर तिला कोणतीही इजा होता कामा नये."

चरम म्हणाला, "प्रथम, तू शांत हो. कर्दमला, ही बाहेरच्या जगातून आलेली आगंतुक स्त्री वाटली सुरवातीला, कारण त्याला ती एकटीच दिसली. तू नाही दिसलास." कर्दमने नकळत मान हलवली.

“आता असं नाही होणार. संध्याकाळ होत आलीय. तुम्ही निघा. आपण पुढच्या शनिवारी इथेच भेटू पण लवकर, सकाळी नऊला पोहोचा. हिचा स्विकार विधी आणि गुप्तनाम विधी दोन्ही करू. त्यानंतरच ही तंत्रविद्येची साधना करण्यास सज्ज होईल.” स्वर्णाने सर्वांकडे नजर फिरवली. सर्वांच्या चेहऱ्यावर अजूनही अनिश्चितता होती. पण विरोध मावळल्यासारखा दिसत होता. फकिरा मात्र प्रचंड अस्वस्थ होता. चरमने एक कटाक्ष तिच्या दिशेने टाकला आणि मग प्रथमला खूण केली. प्रथमने स्वर्णाला खूण केली.

दोघं निघाले. फकिरा, वर कपारीत बसला होता जाऊन. जसजसे दोघे जवळ येऊ लागले तो अधिकच अस्वस्थ होत चालला. दोघं तो बसला होता त्या जागेकडून पुढे गेले तेवढ्यात तो कडेने उडी मारून “अल्लख निरंजन!” असा उद्घोष करत दोघांच्या सामोरा येऊन ठाकला.

“बिनवहिवाट ये बांट वो छोरी
पैर न फिसले, राह अघोरी
ज्ञानी बंदे, गिर जावे है
तू चल राह संभाल! ओ छोरी, तू चल राह संभाल!”

बस, एवढंच त्याच्या खास पद्धतीने गाऊन, एकदा तीव्र नजरेने दोघांकडे पाहून, तो आला तसाच पटापट खाली घळीत दिसेनासा झाला.

मगाशी कर्दम अगदी समोर येऊन धमकावत होता तेव्हा वाटली त्याहून कित्येक पट जास्त भिती फकिराच्या या गाण्याने वाटली तिला. प्रथमही हडबडलाच जरा. हिला इथे आणून चूकच केली की काय असं वाटून गेलं त्याला. या सगळ्याचा अम्मल इतका जास्त होता की पायी आणि पुढच्या बसप्रवासात दोघे एक चकार शब्द बोलले नाहीत एकमेकांशी. आपापल्या विचारात दंग होते ते.

जे घडलं ते स्वर्णाच्या दृष्टीने इतकं विलक्षण होतं, घाबरवणारं तर होतच पण तितकंच स्वत:कडे खेचणारं असं काहीतरी होतं त्या जागेत, त्या घटनेत, चरममध्ये... तिचा विचार परत परत चरमपर्यंत येऊन थांबत होता. तिने पहिल्यांदा डोळे उघडल्याबरोबर पाहिलेल्या त्या डोळ्यांमध्ये, त्या नजरेत असं काय होतं की राहून राहून ती नजर तिला आठवत होती?

आत्ताही त्या आठवणीने जणू एक वीज सळसळली तिच्या संपूर्ण शरीरातून. ती शहारलीच एकदम. शेजारी बसलेला प्रथम पाहू लागला. काही नाही अशी मानेनेच खूण करून तिने

परत आपले डोळे मिटून घेतले ते बस थांबेपर्यंत उघडलेच नाहीत.

प्रथमला गेले काही दिवस स्वर्णाचे विचार सतावत होते आणि तो प्रयत्नाने त्यांना मनावेगळे करत होता. पण आज चरम आणि स्वर्णामध्ये झालेले अबोल आदान प्रदान त्याच्या नजरेतून सुटले नव्हते. एकाच वेळी तो प्रचंड अस्वस्थही झाला होता आणि काहीतरी हातातून निसटून चालल्याची भावना त्याला त्रास देत होती.

चरम आपल्या आसनावर बसला ध्यानाला, पण आज काही केल्या ध्यान होईना. मंत्रोच्चारण करावं तर तेही चुकू लागलं. शेवटी सगळं बाजूला ठेवून तो चटईवर आडवा झाला. उघड्या डोळ्यांसमोर मुर्छा येऊन पडलेली, घाबरलेली, आत्मविश्वासाने बोलणारी, अशी अनेक स्वर्णाची रुपे तरळू लागली. वयाने कच्ची असली तरी वाचन आणि समज दांडगी आहे या मुलीची.

आजपर्यंत हे साथीदार केवळ आपलं बोलणं ऐकून घेणारे आणि त्याबरहुकुम वागणारे. त्यांच्या साधनेत पारंगत, पण चर्चा वगैरे करण्यात मुळीच रुची नसणारे. प्रथमचं वाचन उत्तम,

पण स्वर्णासारखी समज त्याच्याकडेही नाहीच. आता समूह पूर्ण होईल आपला. चरमच्या चेहऱ्यावर एक हलकं स्मित पसरलं.

"अल्लख निरंजन! अल्लख निरंजन!" फकिरा अस्वस्थ फेऱ्या मारत होता.

घरी पोहोचेपर्यंत बराच उशीर झाला. आई खिडकीतच उभी होती. स्वर्णा दिसल्या दिसल्या ती दार उघडायला आली. 'ओह गॉड,' स्वर्णा खाडकन वास्तवात आली. 'आई हजार प्रश्न विचारेल आता. काय सांगून बाहेर पडलो होतो आपण?' "आलीस का बाळा? बराच उशीर झाला गं. कशा झाल्या ट्यूशन्स?"

"अं, ( ओह, ट्यूशन्स ) अगं, पालकांना आधी माझा इंटरव्ह्यू घ्यायचा होता. परत दोन्ही ठिकाणं दोन टोकाला. महिनाभर शिकवा मग फी ठरवू म्हणाले. मी हो म्हटलय. कारण शिकवणं पटलं तर फी मजबूत देतील." धादांत खोटं लिलया बोलून गेली ती. तिचं तिलाच जाम कौतुक वाटलं.

"बरं. चल हातपाय धुवून जेवायला ये बरं."

"हो हो." पहिल्यांदाच स्वर्णाला पोटात भुकेने खड्डा पडल्याची जाणीव झाली. त्या दिवशी ती भरपूर जेवली. आईला

कणव वाटली पोरीची.''स्वर्णू, झेपलं तरच कर हे सगळं. जीवाच्या आकांताने काही नकोय करायला. तुझं शिक्षण पूर्ण कर. माझी नोकरी आहे अगं अजून काही वर्ष. निभावेल सगळं.''

क्षणभरंच स्वर्णाला अपराधी वाटलं. पण क्षणभरंच. मग ती तडक खोलीत गेली. दार लावून वाचत बसली. पुढचे सहा दिवस तिने सगळी पुस्तकं, आणि आंतरजाल पिंजून काढलं.

नेहमीची माहिती बाजूला ठेवून वेगळी, दाखले असलेली माहिती ती शोधून शोधून वाचू लागली. कॉलेज लायब्ररीमध्ये आंतरजालावर मिळालेली उपयुक्त माहिती तिने प्रथमने दिलेल्या पेन ड्राईव्हवर सेव्ह करून ठेवली. न जाणो कधी उपयोगी पडेल.

# ८

लॉजच्या दारावरच्या थापेने स्वर्णा दचकून भानावर आली. विचार करता करता कित्येक वर्ष मागे गेलो आपण या जाणीवेने तिला घाबरवून टाकलं. एक बारीकशी चूक, जराशी लपरवाही, आणि तिचा सगळा खेळ खलास व्हायला वेळ नसता लागला. मध्यरात्र झाली होती.

'बाप रे, आता कोण दार वाजवतय?'

"रम्या, ये रम्या, ल्येका दार उगड की. कवादरं... कवादरनं वा.. जवून अं... दार..."

बाहेर कोणीतरी दारू पिऊन बरळत होता आणि दार वाजवत होता. 'आता काय करावं? हा तमाशा करत राहिला तर अख्खं लॉज जमा होईल. दहा माणसं पाहतील आपल्याला. दरवाजा उघडावा तर हा दारुडा काय करेल कोण जाणे. घुसला आत तर पंचाईत. छे! नशीबच बेकार ! रुममध्ये फोनही नाही, रिसेप्शनला फोन करावा तर. बंडल फडतूस लॉज हे. ' मग ती गप्प पडून राहिली. काही वेळाने शेजारची रुम उघडल्याचा आवाज आला.

“ए, गप बस की. का उगा गलका करून ऱ्हायला? जमत न्हाय तर पितो कशाला? चल आत गुमान. झोप नासवलीस xxxx!!” बराच वेळ धडपडल्याचा, बरळल्याचा आवाज येत राहिला. मग सगळं शांत झालं.

निमिष, शर्वरी, पोलीसांची वाट पाहत होते. घरातून चोरी झाली हे नक्की होतं. पण चोरीला फार काही गेलं नव्हतं. सगळंच गोंधळात टाकणारं होतं. पोलीस आल्यावर ते ही विचारात पडले. एक ड्रेस, पर्समधले थोडे पैसे, दोन अंगठ्या एवढंच चोरीला गेलं होतं. चोराने अर्धवट खाऊन ठेवलेलं सॅंडविच खाल्लं होतं. चप्पल चोरीला गेल्याचं शर्वरीला कळलंही नव्हतं. पण तिला काहीतरी विचित्र वाटत होतं. काय ते नव्हतं सांगता येत. पोलिसांनी हातांचे ठसे मिळतात का पाहिले. नाही मिळाले. बाकी काही मागमूसही नव्हता. तरीही अंगठ्यांचे फोटो होते. त्यावरून माग लागला असता. पंजाबी ड्रेस चोरीला गेल्याने चोर, बाई असू शकते असं पोलीस म्हणाले. मग त्यांनी आदल्या दिवशीचा वृतांत विचारला निमिषला परत एकदा. तो सांगत असताना अचानक निमिषला आपण जॅक ठेवायला विसरलो असं वाटलं, म्हणून गाडीचं चाक बदलून, हात धुतल्यावर आपण

कसे परत मागे डिकीकडे आलो, पण जॅक त्याच्या स्लॉटमध्ये फिट होता वगैरे परत आठवलं. ते त्याने पोलिसांना सांगितलं.

"हं!" इन्स्पेक्टरचं विचारचक्र सुरू झालं "ठीक आहे, पंचनामा झालाय, काही पत्ता लागला की कळवतो, सावध राहा," असं सांगून हे लोकल पोलीस परत निघाले तेवढ्यात हायवे पोलीसांची जीप दारात येऊन थांबली. दोन्ही इन्स्पेक्टर्सचं काही बोलणं झालं आणि परत सगळेच आत आले.

लोकल इन्स्पेक्टर वैतागूनच आत आला."तुम्ही जंटलमन माणसं आम्हाला काय येडे समजता काय? त्या पळून गेलेल्या पोरीचं कोण सांगणार?" निमिष गप्प बसला. त्याने जाणून बुजूनच ते सांगितलं नव्हतं मगाशी. उगाच नाही ते लचांड कशाला म्हणून. मग हाय वे पोलीस प्रश्न विचारू लागले." ती कशी आडवी आली? काय बोलली? कसला वास? वेगळं काही? दिसायला कशी? काही खूण?"

"तिच्या कानाखाली एक तांबूस खूण होती. जन्मखुणेसारखी." शर्वरी पटकन म्हणाली. लोकल पोलिसाचे कान टवकारले."कोणत्या कानाखाली?" "अं," मग तिने आठवून पाहिलं. आपण तिच्या डाव्या बाजूला होतो. मग

अचानक तिने मान टाकली माझ्या बाजूला, तेव्हा पलिकडच्या म्हणजे “तिच्या उजव्या कानाच्या खाली ती खूण होती.”

तो म्हणाला “खुणेच्या आकाराचं चित्र काढून दाखवू शकाल?”

“अं हो, म्हणजे साधारण.”

त्याने पॅड पेन दिले. तिने साधारण आकार दाखवला काढून.”रंग मात्र अगदी तांबूस, तिच्या गोऱ्या मानेवर कडेला कानाची पाळी संपल्याबरोबर,” शर्वरीने सांगितलं.

मग अजून बरेच प्रश्न विचारले गेले.”नक्की तुमची आधीची ओळख नव्हती ना? तुम्ही पोलीसांपासून काही लपवत नाही ना? तुमचाच हात यामध्ये कशावरून नाही?”

शर्वरी भडकलीच. मग म्हणाली “हे असं होतं ना साहेब म्हणून कोणी मदत करत नाही रस्त्यावर.”

तो इन्स्पेक्टर काही बोलला नाही. सगळे गेले बाहेर मग. एक वयस्करसा लोकल पोलीस हवालदार समजुतीने बोलला, “मॅडम, आमालाही दिसतय या केस मदे तुमी चांगुलपनानं मदत करायला गेलात आनि नसतं लचांड लागलय मागं. पन सायबांची काय चूकी न्हाय. पोर्सीजर आसती, तसं इचरावंच

लागतं. गुन्हंगार सापडत न्हाई तवंर सगळ्यांवरच शंका घेतो आमी पोलीस. धागंदोरं सापडतात कायतरी. आता इचारलं म्हनून ते जनमखुनेचं आलं का न्हाई समूर बगा बरं. चला येतू.''

निमिष आणि शर्वरी मग बराच वेळ तसेच बसून राहिले. शर्वरीच्या कपाळावरची रेषा तडतडत होती. 'ती परत भेटली तर कपाळमोक्ष करीनच तिचा. ' ती तिरमिरीत विचार करत बसली. निमिष म्हणाला, ''अर्धा दिवस तर गेलाच. पण जातो आता ऑफिसला. काहीतरी काम होईल. तू सगळे दरवाजे नीट लावून घे. गॅरेजकडचा तर कायमचा बंद करूया आपण मला वाटतं.''

त्याने शर्वरीच्या डोक्यावर थोपटलं.''जरा विश्रांती घे आणि. ते हायवेवरचं प्रकरण डोक्यातून काढून टाक. आपण आपल्याला जे योग्य वाटलं ते केलं. आता ते कुपात्री दान ठरलं पण तेवढंच महत्व त्याला.

घरात चोर शिरणं मात्र जास्त काळजीचं वाटतं मला. पोलिसांच्या मते हायवेवर आपण थांबलो तेव्हाच कोणीतरी डिकीत लपलं असेल. तसंही असू शकतं. कारण मला जॅक डिकीत फिट करून डिकी बंद केल्याचं अजिबात आठवत नाही. पण नंतर जाऊन पाहिलं तेव्हा जॅक स्लॉटमध्ये होता. असू दे जे असेल ते. तू जास्त विचार नको करत बसू.''

निमिष तयार होऊन कामासाठी निघून गेला. शर्वरी परत परत तपासत राहिली घरात, आणि काय गेलय का? पण तसं काही दिसलं नाही तिला. बाथरुममध्ये ही काही सापडलं नाही. मग तिनेही विचार मनातून काढून टाकायचं ठरवलं. तिच्या चोरीला गेलेल्या ड्रेसचं वर्णन तिने पोलिसांना दिलच होतं.

---

स्वर्णाला रात्रभर अर्धवट झोप, अर्धवट जाग असं होत राहिलं. पहाटे मात्र ती उठलीच. सगळं आवरून बसली. ९ वाजता चेकआऊट होता. ती बरोबर ९ वाजता बाहेर पडली. सर्वप्रथम कपड्याचं दुकान गाठलं. एक जीन्स आणि टॉप घेतला विकत. जवळचं एक सुलभ गाठलं. ड्रेस बदलला. चोरीचा ड्रेस कागदात गुंडाळला. बाहेर पडली. जवळच्या कचराकुंडीत कागदात गुंडाळलेला ड्रेस फेकून दिला. मग एक ब्युटी पार्लर गाठलं. स्टेपकट केला. फ्लिक्स पार डोळ्यांवर येतील अशा. थोडं स्वस्तातलं मेकअप किट खरेदी केलं.

एका जरा बऱ्याशा हॉटेलच्या वॉशरूममध्ये शिरली. सकाळची वेळ. कोणी नव्हतं तिथे. मेकअपने डोळे बारीक केले. ओठ रुंद. नाक जरा अजून बारीक आणि टोकदार केलं. डार्क

रंगाचं लिपस्टीक लावलं. बाहेर पडली तेव्हा ती एक वेगळीच मॉड युवती होती. नाही. अजून काही गोष्टी राहिल्या होत्या.

ती जवळच्या मॉलमध्ये शिरली. तिने अर्धा चेहरा झाकेल असा गॉगल, एक झीरो नंबरचा चष्मा, दोन्ही स्वस्तातले खरेदी केले. मग तिथल्याच सोन्याचांदीच्या दुकानात शिरली. एक पातळ बॅंड खरेदी केला आणि मग जवळच्या रींग दाखवल्या. त्याची किम्मत दुकानदार बरीच कमी सांगतोय हे लक्षात आल्यावर जरा घासाघीस करून दुकानदाराला फायद्यात पडणारा सौदा ठरवला. नवी रींग आणि पैसे घेऊन ती सरळ चप्पलच्या दुकानात शिरली. एक हाय हील चप्पल आणि एक पर्स खरेदी करून चोरीच्या चपला तिथल्याच कचऱ्याच्या डब्यात टाकून ती पुढे निघाली.

आता ती एक कॉर्पोरेट ऑफिसमध्ये काम करणारी, मॉड युवती म्हणून सहज खपली असती. जवळ जवळ नव्वद तासांपासून किंवा त्याहूनही अधिक काळ ड्रग्ज वाचून तिने काढले होते. आता त्याचा परिणाम चांगलाच जाणवू लागला होता. मंद थरथर हातापायांमध्ये जाणवत होती. थोड्याच वेळात ती तीव्र होणार, बाकीचे त्रास ही सुरू होणार याची तिला चांगलीच कल्पना होती. ड्रग्ज मिळण्याचे अड्डे या शहरात

माहीत नव्हते पण त्याची माहिती कुठे मिळेल ते चांगलच माहीत होतं.

तिने रीक्षा पकडली आणि सरळ कॉलेजेस जिथे सर्वात जास्त त्या रस्त्यावर घ्यायला सांगितली. मग उतरून सावकाश तिथल्या पान सिग्रेटच्या ठेल्यांच्या गल्लीतून एक सावकाश चक्कर मारली. या टोकापासून त्या टोकापर्यंत. तिला माहीत होतं इथे, जिथे तिला हवा तसा माल असेल तिथला माणूस आपल्या ग्राहकाला बरोबर ओळखणार. तो नजरेने टिपतच असेल सावज. फक्त पुरेसा वेळ तिला त्या गल्लीत घालवायला हवा. बस.

तिने डोळ्यांवरचा गॉगल काढला, चष्मा चढवला, आणि ती सावकाश त्या गल्लीतून परत फिरली. मग कोणाला तरी शोधत असल्याप्रमाणे प्रत्येक खोक्यापुढून जाऊ लागली. कटींग चहा, सिग्रेट, यांचा, दुचाकींवर बसून मुलंमुली अत्यंत गहन विषयांवर चर्चा करत आस्वाद घेत होती.

जरा निराळी गर्दी एका स्टॉलवर होती. इथे फारसं काही न बोलता देवाण घेवाण सुरू होती. पण सिग्रेट्सचीच. त्याच्या शेजारचा स्टॉल मात्र ओसच पडला होता. मालक पेपरात डोकं खुपसून होता. हाच तिला हवा असणारा स्टॉल. तिने अटकळ बांधली. मग ती सरळ वळून चहाच्या स्टॉलवर गेली. तिची गरज

पुरवणारा तिला गाठणार होता. इथे सगळंच जपून करावं लागतं. तिला अनुभवाने माहीत होतं. पोलीस नजर ठेवून असणारच साध्या वेशात. त्यांचे हप्ते बांधलेले पण ते साध्या चरसींकडे, ड्रगींकडे दुर्लक्ष करण्यासाठी. गुन्हेगाराला पकडायचा तर कसलीच दयामाया नाही. आणि ती तर सध्या हीटलीस्टवर असणार, तिला माहीत होतं.

तीने कटींग चहा आणि उंची इंम्पोर्टेड सिग्रेट मागितली. ती अर्थातच त्या स्टॉलवाल्याकडे नव्हती. हा ही एक परवलीचा शब्दच होता. चहावाला आणि स्पेशल रिकाम्या स्टॉलवाल्याची नेत्रपल्लवी झालीच. स्वर्णाने चहावाल्याला सहेतुक स्माईल दिलं.''फिर दुसरा कुछ मिलेगा?'' चहावाल्याने चेहऱ्यावरची रेषही न हलवता सावकाश म्हणाला सामने की होटेल में कॉफी पिओ मॅडम.

चला सोय तर झाली. ती समोरच्या कॉफी शॉपमध्ये कॉफी मागवून बसली. तिची कॉफीची ऑर्डर आली तोपर्यंत एक साधारण उंचीचा, बारीकसा माणूस हॉटेलमध्ये शिरला. कोणत्याही मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह कडे असावी तशी बॅग होती त्याच्या हातात. वय साधारण चाळीस.

गळ्यातला नेकटाय घाईने सैल करत बॉसला करावं तसं मान हलवून अभिवादन करत तो तिच्या समोरच्या खुर्चीत बसला. कोणालाही पाहताना डेली फिल्ड मिटींग सुरू असावी असंच वाटलं असतं. मग त्याने सरळ ब्रॅंड कोणता असा प्रश्न विचारला.

“K2? मसाला?”

“हं!”

“दोन हजार.” देवाण घेवाण झाली. अर्थातच तिने कागदात गुंडाळून त्याने लिफाफ्यात. तो मान लववून उठला. निघाला. बाहेर पडला आणि बघेबघेपर्यंत गर्दीत दिसेनासा झाला. ‘व्हेरी टिपिकल. ’ ती मनात म्हणाली. चला सोय तर झाली. तिला धीर निघेना. पण पोटभर जेवणं गरजेचंच होतं. पण आता तिथे थांबणंही धोक्याचं होतं. पोलिसाची नजर असणारच. आपण निरुपद्रवी ग्राहक आहोत हा आभास कायम ठेवून इथून निघायला हवं. ती सरळ चालत बसस्टॉपवर आली. आलेल्या बसमध्ये चढली. पुढच्या स्टॉपचं तिकिट मागितलं. पुढच्याच स्टॉपवर उतरून उलट्या दिशेनं येणाऱ्या बसमध्ये चढली. आता एखादं बरंसं हॉटेल गाठावं. की झालं. मनात म्हणाली.

तो माणूस बॅग उचलून निघाला,गर्दीतून नागमोडी चालत त्याने रस्ता क्रॉस केला. पलिकडच्या गल्लीतून तो हमरस्त्यावर पोचला. तिथल्या एका हॉटेलमध्ये प्रथम कॉफी पित बसला होता. त्याने मान लववून अभिवादन केले. मग म्हणाला, सावज जाळ्यात गावलं.

प्रथमने एक लिफाफा गच्च नोटांनी भरलेला त्या माणसाला दिला.

# ९

प्रथमला ड्रगचा हाय डोस देऊन स्वर्णा त्याचेच कपडे चोरून तेच घालून बाहेर हायवेवर आली होती. काहीच वेळात तिला शर्वरी आणि निमिषची गाडी येताना दिसली होती आणि ती झेलपटण्याचं नाटक करून त्यांच्या गाडीसमोर आली होती. शर्वरी आणि निमिषने चांगुलपणाने तिला हॉस्पिटलमध्ये नेली.

प्रथम त्या रात्री चहावाल्याच्या कृपेने मार्गी लागला. चहावाल्याने त्याला लुंगी, जूना टी शर्ट, चहा पाव तर दिलाच. वर काम पण करवून घेतलं भांडी घासण्याचं. ती घासता घासताच त्याने अजून काही बरं काम मिळेल का विचारलं. चहावाल्याने त्याला पुण्याला एक पॅकेट पोहोचवलस तर बरे पैसे मिळतील असं सांगितलं. प्रथम लगेच तयार झाला. पॅकेट हातात आल्याबरोबर ती ड्रग्ज आहेत हे त्याच्या लक्षात आलं. तो पॅकेट घेऊन चहावाल्याकडून गाडीभाडं, चहापाण्याला पैसे घेऊन पुण्यात पोहोचला.

आता त्याला स्वर्णा आयतीच सापडणार होती. पुण्यात किंवा आणि कुठे. ड्रग डीलर्सचं जाळं सर्वत्र असतं आणि नवा

पंछी आला ही खबर पोहोचतेच सर्वदूर. त्यामुळे स्वर्णा सापडणार हे नक्की होतं. कधी हे नसतं सांगता आलं. पण प्रथमची ईच्छाशक्ती जबरदस्त असावी. कारण तीनच दिवसात ती त्याला सापडली.

पुण्यात पोहोचताक्षणी पेपरमध्ये त्याने एक हायवेवरच्या हॉस्पिटल मधून पेशंट नाहीशी झाल्याची बातमी वाचली आणि तो सावध झाला. त्याने पुण्यातल्या सर्वसाधारण लॉजवर चौकशी करायला सुरवात केली.

एका लॉजवरच्या पोऱ्याकडून एक बाई दिवसभर खोलीतून बाहेरच नाही आलेली, मग रात्री जेवण विचारायला गेल्यावर आधी वरच्या व्हेन्टीलेटर मधूनच वाकून पाहिलं, मग दाराच्या फटीतून ताट आत सरकवायला सांगितलं आणि पैसेही तसेच दिले असं बरेच पैसे दिल्यावर त्याने सांगितलं.

प्रथम भल्या पहाटेपासून लॉज बाहेर पाळतीवर राहिला. बरोबर नऊ वाजता स्वर्णा बाहेर पडल्याबरोबर तो स्वर्णा मागोमाग कपड्याचं दुकान, ब्युटीपार्लर, मॉल, सगळीकडे तिची बदलती रुपं पाहत फिरला. आता तिला ड्रग्ज ची आत्यंतिक गरज असणार हे त्याला माहित होतं.

तिची रीक्षा जेव्हा त्याच्या माहितीतल्या अड्ड्यावर पोहोचली तेव्हा त्याने फोन करून हिला मी देणार डोस, माझं ‘सावज’ असं सांगितलं. काय द्यायचं ते ही सांगितलं. डिलीव्हरीवाला सरळ त्याने सांगितलेला माल घेऊन स्वर्णा, ज्या कॉफी शॉपमध्ये बसली होती तिथे पोहोचला. प्रथमचा आत्मा बऱ्याच कालावधीनंतर शांत झाला. आता फक्त काही तास आणि...

त्याला स्वर्णाची कीवही येत होती आणि एकीकडे सूड घेतल्याचा आनंदही होता.

---

त्याला आठवली ती स्वर्णा, तिच्या समूहामधला प्रवेश विधी आणि नवनामकरणविधीसाठी काळा सलवार कुडता घालून आलेली. तिचा गोरा रंग उठून दिसत होता त्या काळ्या ड्रेसमध्ये. प्रथमला आयुष्यात पहिल्यांदाच अचानक आकर्षण किती जबरदस्त ओढ निर्माण करतं याचा प्रत्यय आला होता.

सुरवातीला स्वर्णा म्हणजे केवळ एक समूहाच्या पुढील कार्यभागासाठी आवश्यक व्यक्ती होती. पण अलीकडे अचानक

त्याच्या मनात वेगळ्याच भावना पिंगा घालू लागल्या होत्या. आपल्या ध्येयापासून आपल्याला हे दूर नेणारे विचार आहेत असा बुद्धी वारंवार ओरडून सांगत असूनही त्याची नजर तिच्याकडे आपसूक वळत होती.

पहिल्या समूहभेटीच्या पुढच्या शनिवारी त्याच रस्त्याने ते दोघे यावेळेस जरा लवकरच निघाले होते. प्रथमला, स्वर्णा आपली फ्राईंड असण्याचा अभिमान वाटत होता. ती मात्र जरा वेगळीच वाटत, वागत होती. मागच्या समूहभेटीपूर्वीपर्यंत प्रथमला तिच्यात आपल्यावर अवलंबून असणारी, अल्लड पण अत्यंत तल्लख मुलगी दिसत होती. पण समूह भेटीनंतर परतताना तिची संपूर्ण देहबोलीच बदलल्यासारखी त्याला वाटत होती. प्रचंड आत्मविश्वासाचा संचार जणू तिच्यात झाला होता. कर्दमने इतके जवळ जाऊन धमकावल्यावरही ती किंचितही विचलित झाली नाही. तिने प्रथमकडे मदतीसाठी एक नजरही टाकली नाही, हे कुठेतरी त्याच्या मनात सलत होतंच. आणि कदाचित म्हणूनच तिच्याविषयीचं आकर्षण कितीतरी पटीने जास्त वाढलं होतं.

आज जाताना तिला काही खास सूचना करायच्या असं त्याने ठरवलं होतं. बसमधून उतरल्यावर हमरस्ता सोडून जेव्हा ते

आडरस्त्याला लागले तेव्हा प्रथम तिला म्हणाला, "आजपासून तू या समूहाचा हिस्सा बनत असलीस तरी चरम वगळता इतर कोणालाही हे अजून पचनी पडलेलं नाही. कर्दम आणि हठी तर संपूर्ण विरोधात आहेतच पण फकिराही काही आनंदलेला नाहीच तुझ्या येण्याने. तेव्हा तू जरा जपून राहा. सतत माझ्याबरोबर थांब. चरम जे सांगेल तेवढंच ऐक. स्वत:चं ज्ञान सांगायला जाऊ नकोस."

तिने प्रथम कडे मान वळवून पाहिले. त्याच्या मनात काय चालू आहे याचा बरोबर अंदाज आला असावा अशी गूढ हसली ती. पण मग लगेच म्हणाली,"हो, मी आज गप्पच बसेन. तू मला सांगशील तसं करेन." प्रथमला छान वाटलं होतं मग.

ते पोचले तेव्हा सगळे तयारीतच होते. चरमचा चेहरा हिला पाहून फुलला. हिचाही. एक वेगळाच बंध निर्माण झाला होता दोघांच्यात. सगळ्यानाच हे वेगळं समिकरण जाणवत होतं. प्रथमच्या हे लक्षात आल्यावर मगाचा तात्पुरता उत्साह परत मावळला त्याचा.

मग चरमने तिला एका आसनावर बसवले. आपण समोर बसला. बाकी सगळे भोवती बसले. फकिराने एक काळ्या रंगाचा बेरजेच्या चिह्नाच्या आकाराचा कपडा मध्ये मांडला.

त्यावर चारी टोकांवर आणि मध्ये पणत्या ठेवल्या. खडूने काही आकार काढले. लाल रंगाची कण्हेरीची फुलं पणत्यांच्या बाजूला ठेवली. बुक्का, गुलाल त्यावर शिंपला. सर्वांना डोळे मिटून बसायला सांगण्यात आलं. मग फकिरा त्याच्या खास आवाजात निरनिराळे मंत्र म्हणू लागला.

स्वर्णाने ते वाचले असले तरी ऐकताना ते निराळेच भासले तिला. फकिरा, ते बरोबर म्हणतोय की नाही अशी शंकाही तिच्या मनात आली. पण मग तिने मन एकाग्र करण्याचा प्रयत्न केला. काही क्षणात तिला चरम आपल्या अगदी जवळ उभा आहे आणि आपल्याला कवेत घेत आहे असं दृष्य दिसलं. तिचे डोळे खाडकन उघडले. त्याच क्षणी चरमचे डोळेही उघडले. दोघांची नजरानजर झाली आणि एकमेकांत गुंतून गेली. फकिरा लक्षात येऊनही मंत्र म्हणत राहिला. मध्येच थांबणे प्रचंड घातक ठरले असते. काही क्षण असेच गेले आणि चरम भानावर आला. त्याने आपली नजर वळवली. डोळे मिटले. स्वर्णाला सगळीकडे अंधारून आल्यासारखं वाटलं. हा विधी पार पडल्यावर फकिराने प्रथम स्वर्णाच्या आणि नंतर इतरांच्या कपाळावर बुक्का लावला. त्यानंतर फकिरा म्हणाला “अब ये नया सदस्य हमारे

समूह की प्रगती का मार्ग बनने योग्य है। इसका तांत्रिक नाम भैरवी तय हुवा! अल्लख निरजंन!”

“भैरवी भैरवी भैरवी!”

सर्वांनी प्रचंड मोठ्या आवाजात या नावाचा त्रिवार जयघोष केला. स्वर्णा दचकलीच एकदम. भैरवी, तांत्रिक साधिका! फार भारी वाटलं मग तिला. मग हठीने कडुलिंबाचा रस करवंट्यांमधून दिला सर्वांना. सर्वांनी गटगट पिऊन टाकला. स्वर्णाला मात्र महतप्रयासाने घशाशी येणारी उलटी थांबवण्यात यश आलं. हे सर्व झाल्यावर हठी, कर्दम, आणि फकिरा आपापल्या गुंफांमध्ये साधना करण्यास निघून गेले.

चरम, प्रथम आणि स्वर्णा उर्फ भैरवी उरले. प्रथमने चरमला नव्याने होऊ घातलेल्या ऑकल्ट सोसायटीच्या वॉशिंग्टन स्टेटमध्ये होणाऱ्या कॉन्फरन्सची माहिती दिली. भारतातून जाणाऱ्या तांत्रिकांची माहिती दिली. चरम त्यातल्या दोघांना भेटला होता. आपला समूह पाच वर्षांने होणाऱ्या कॅनडामधील कॉन्फरन्समध्ये नक्की सहभागी होईल असा विश्वास त्याने व्यक्त केला. मग भैरवीला त्याने तिला कोणती विद्या सर्वात जास्त आवडली असं विचारलं. तिने सगळ्याच असं ताबडतोब उत्तर दिलं. चरम हसला.

तू प्रथम हठविद्येने सुरवात करावीस. हठी तुला शिकवेल एक एक आसन, मुद्रा, कुंभक सर्वच. आज सुरवात कर. आठवडाभर सराव कर. पुढच्या शनिवारी भेटू.

स्वर्णाचा चेहरा काळवंडला.''मला वाटलं होतं आधी तुमच्याशी बोलावं, नक्की कसा मार्ग घ्यायचा ते ठरवावं आणि मग एका विशिष्ठ विद्येची साधना सुरू करावी.''

''हो ते ही होईल. पण प्राथमिक तयारी होणं गरजेचं आहे.'' अचानक चरम नजर न मिळवता बोलू लागल्याचं तिच्या लक्षात आलं. तिच्या लक्षात आलेलं चरमच्या लक्षात आलं, त्याने एका स्थीर नजरेने तिची नजर तोलून धरली. मगाशी विधींच्या वेळी जाणवलेली उब, चमक काहीच नव्हतं आता. ती एका त्रयस्थाची नजर होती. काहीतरी हरवून गेल्याची भावना तिच्या मनी उद्भवली. आणि हरवलेलं परत मिळवायचंच ही इर्ष्याही!

ती हठीच्या गुंफेकडे चालत निघाली. प्रथम आणि चरम तिथेच बोलत बसले.

ती जेव्हा हठीच्या गुंफेत पोहोचली तेव्हा तो धोतर कसून अर्धमच्छिंद्रासन लावून बसला होता. पाठीच्या कण्याला संपूर्ण पीळ, एक पाय दुमडलेला तर दुसरा त्याच्या पलिकडे ठेवलेला.

नजर नासीकाग्र. हातांचा शरीराभोवती विळखा, ती पाहत राहिली. काहीच वेळात त्याला तिची चाहूल लागली. त्याने आसन सोडलं.

"तू इथे काय करतेस? बाग वाटली काय उंडारायला?" तो खेकसला. स्वर्णाचा पारा पार डोक्याच्या मध्यावर गेला, तिने कसंबसं सावरलं स्वत:ला."चरमनी हठयोगापासून सुरवात करायला सांगितलय. तुमच्याकडून शिकायचंय."

"तुला?" थुंकावं तसा शब्द आला बाहेर.

"हो," ती थंडपणे म्हणाली.

हठी हसला मग."बर्रर!! चला मग गुंफा झाडून काढा. मग शेणानं सारवून घ्या जमीन. वाळली की करू शिकवायला सुरवात."

"काय? मी?"

"मग काय मी?"

घुश्शात तिने झावळ्यांचा झाडू घेतला. दोन तासांनी सगळं झाल्यावर तिची कंबर मोडून आली पार. शेणाच्या वासाने तर डोकं पार भणभणायला लागलं तिचं. एवढं करून तो हठी

कुठे गायब झाला होता देवच जाणे. कसंबसं तिने स्वत:ला स्वच्छ केलं. तोपर्यंत प्रथम आला.

“झालं का?”

“कुठे काय? मला गुंफा झाडायला लावली. सारवायला लावली. स्वत: गायब.”

प्रथमचं लक्ष गेलं तिच्याकडे. केस विस्कटलेले. कपडे मळलेले. अंगाला शेणाचा वास. प्रथमला गम्मत वाटली.

“पण आता आपल्याला निघायला हवं.”

“काय? मग मी शिकणार कशी?”

“पुढच्या वेळी.”

“अरे, अशानं मी शिकणारच नाही कधी.”

“शिकशील, शिकशील बरं. चल आता.”

“अरे काय आहे हे? सगळी मेहनत वाया गेली ना?”

“वाया नाही बरं. गुरूसेवा घडली.” हठी हसत हसत म्हणाला. स्वर्णा पाय आपटत निघून गेली. प्रथम आणि हठी जोरजोरात हसले.

स्वर्णा गेली ती थेट चरम कडे. डोळ्यातून संतापाने घळाघळा अश्रू ओघळत होते. चरमने सगळं ऐकून घेतलं. खांद्यावर थोपटलं. मी बोलेन हठीशी, तो सौम्यपणे

म्हणाला.''डोळे पूस. शांत हो. या विद्या शिकवण्यापुर्वी गुरू एक तरी परीक्षा घेतोच. आता दोन आठवड्यांनी भेटू. तू वाचन सुरू ठेव.''

चरममध्ये अचानक झालेला बदल स्वर्णाला खटकत होता.''माझं चुकतय का काही?''

``भैरवी, असं का विचारतेस?''

``तुम्ही एकदम परक्यासारखे वागू लागलात अचानक माझ्याशी. विधी सुरू असताना...आणि मग एकदम बदललात तुम्ही. का?''

चरम एकदम अस्वस्थ झाला. तो काही बोलणार तेवढ्यात प्रथम आला.

``चला निघूया. शेवटची बस गेल्यावर अडकून पडू.''

``जाऊ दे बस. मला जायचंच नाहीय घरी.'' चरमकडे पाहत स्वर्णा म्हणाली. प्रथम मग जरा कडकपणे म्हणाला, ``भैरवी, नियम विसरू नकोस. तुला बाहेरच्या जगात बिनबोभाट वावरायचय. विसरू नकोस. अल्लडपणा पुरे. स्वर्णा मग एकदम गंभीर झाली.''चल, निघुया'' म्हणाली. चरमला एकदम खरंच यांची बस चुकावी अशी ईच्छा झाली.

त्या रात्री स्वर्णाच्या डोळ्याला डोळा लागला नाही. चरमच्याही. दुसरे दिवशीपासून स्वर्णाने हठयोगाचं पुस्तक वाचून, चित्र पाहून, बरीच आसनं शिकायला सुरवात केली. जे कळत नव्हतं ते विडीओ पाहून कळतय का पाहिलं. ते ही जेव्हा कळलं नाही तेव्हा त्याची नोंद केली. मग आंतरजाल त्यासाठी पिंजून काढला. रोज दोन दोन तीन तीन तास ती सर्व आसनं आत्मसात करण्याचा सराव करू लागली. पहाट, मध्यरात्र, दिवस, तिला कोणतीच वेळ वर्ज्य नव्हती. तरूण लवचिक शरीर होतं. बऱ्यापैकी अंतीम स्थिती जमू लागल्या तिला आसनांच्या. मग तिने रोज एकदा सर्व आसनांचा अभ्यास करावा आणि मग अर्धमच्छिंद्रासन ग्रहण करून त्यात जास्तीत जास्त वेळ स्थीर राहण्याचा प्रयास करावा. दोन आठवडे तिने कसून सराव केला.

पुढच्या भेटीत गेल्याबरोबर तिने सर्वांसमक्ष अर्धमच्छिंद्रासन ग्रहण केलं आणि ती तशीच स्थिरता ग्रहण करून सर्वांचे बोलणे ऐकू लागली. फकिरा, प्रथम आणि कर्दमही अवाक होऊन तिच्याकडे पाहत राहिले. हठीच्या कपाळावरची शीर ताडताड उडायला लागली. चरम मनोमन स्वर्णावर खुश झाला पण तेवढाच अस्वस्थ ही. ती हे सर्व का करत होती हे न

कळण्या इतका तो निर्बुद्ध नव्हता. मग तो हठीला म्हणाला, "क्यों गुरराज? कैसा है नया चेला?"

"बहोत खूब! बहोत खूब! चलो भैरवी, अब आगे का अभ्यास करें."

अहंकार माणसाला रसातळाला नेतोच म्हणतात ते अगदीच खरं. गुंफेत आल्यावर हठीने अफुची गोळी गोडसर मधात बुडवून स्वर्णाच्या हातावर ठेवली. म्हणाला टाक तोंडात. हठयोगींना याची दीक्षा सर्वप्रथम घ्यावी लागते. पुढे सिद्धी प्राप्त झाल्या की त्याबरोबर प्रेतभूत यांच्याशी, प्राणी पक्षांशी, कधी कधी निर्जीव गोष्टींबरोबरही संवाद साधावा लागतो. अशा वेळेस हिची साथ असेल तर भय वाटत नाही.

काही विचार न करता स्वर्णाने ती गोळी तोंडात टाकली. कडसर गोड चव जीभेवर चरचरली. दाढेत लावून ठेवायची, पण स्वर्णाने चक्क खाऊन टाकली. काही वेळातच असर दिसून आला.

हठी आसन लावून बसला, फकिरा आणि कर्दम बाहेरच गेलेले. प्रथम त्याच्या गुंफेत ध्यानाला बसलेला. तेवढ्यात स्वर्णा उठून चरमच्या गुंफेत आली. तो काही वाचत होता. तिची चाल त्याला किंचित निराळी वाटली. जवळ आल्यावर डोळेही. तो पटकन उठला. स्वर्णा पुढे आली आणि एकदम धडपडली. चरमने

सावरली तर एकदम बिलगलीच त्याला. चरमने मोठ्या निकराने तिला दूर करण्याचा प्रयत्न केला. पण अफुच्या गोळीने सर्व संकोच दूर भिरकाऊन लावला. ती अधिक अधिक चरमला बिलगत गेली. तो जितका दूर करण्याचा प्रयत्न करत होता तितक्याच त्वेषाने ती त्याला बिलगत होती. अचानक प्रथम तिथे आला. हठी, फकिरा, कर्दमही आले. चरम शांतपणे प्रथमला म्हणाला, “सावर हिला!”

स्वर्णाची नशा खाडकन उतरली. प्रथमने हात लावण्यापुर्वीच ती कोपऱ्यात जाऊन उभी राहिली. हठीचा काटा काढायचा मनोमन विडा उचलला तिने. चरमकडे टाकलेला एक जळजळीत कटाक्ष तिच्या मनातले भाव त्याच्यापर्यंत पोहोचवायला पुरेसा होता. अचानक कर्दम तारस्वरात बोलू लागला.

“सांगत होतो बाईमानूस नको आपल्यात. ऐकलं नाही. भोगा आता. केलेली सगळी मेहनत वाया घालवणार ही अवदसा!”

“प्रथम, घेऊन जा हिला आत्ता. थंड पाणी ओत डोक्यावर. असर कमी झाला की घेऊन जा घरी तिच्या.” चरम काहीशा रूक्ष आवाजात बोलला.

स्वर्णा अविश्वासाने ऐकत राहिली. मग तारस्वरात ओरडली.”माझी चूक नाही यात काहीच. हठीकडे बोट दाखवून

म्हणाली याने दिलं काही तरी खायला. हठयोगाची पहिली दीक्षा म्हणून. माझी चूक नाहीय.”

चरमने प्रथमला खूण केली. प्रथमने हाताला धरून तिला न्यायला सुरवात केली. तिने हात हिसडून टाकला त्याचा. अपमान, न उतरलेली धुंदी, या पराकोटीच्या भावनांमधून बाहेर येणं शक्य नव्हतं. प्रथमने बळानेच मग ओढत नेलं तिला. एका दगडी हौदात पाणी होतं त्यात डोकं बुडवून काढलं दोन चारदा. मग मात्र नशा बराच कमी झाला.

ती जरा वेळ तिथेच आडवी झाली. बहुधा तिला झोपही लागली. जाग आली तेव्हा कसंबसं धावत पळत बस मिळण्यापुरताच अवधी उरला होता. प्रथम काहीच बोलला नाही. पण चेहऱ्यावर नाराजी, घृणा स्पष्ट दिसत होती. निघताना बाकी कोणाचीच भेट झाली नाही.

घराजवळ पोहोचेपर्यंत तिचा धीर सुटला.”परत केव्हा?” तिने विचारलं.

“निरोप आल्यावर,.... आला तर.”

“म्हणजे काय? मला काढून टाकताय का समूहातून?”

“तुझा आजचा कारनामा पाहता मी परत कधी तोंडही नसतं पाहिलं तुझं. पण आता तुझा विधीवत प्रवेश झालाय

समूहात. चरम जो निर्णय घेईल तसं होईल. मला काही सांगता नाही यायचं. जा तू घरी.''

ती प्रचंड भडकली.''मी जाईन परत शनिवारीच.''

“वेडेपणा करू नकोस.''

“प्रथम, पुढच्या शनिवारी मी जाणार, मला सामावून घेण्यासाठी जे करावा लागेल ते मी करणार, मी हार मानणार नाही. मी हार मानणार नाही. तू नाही नेलंस या वेळेस तर मी एकटी जाईन.''

प्रथम चक्राऊन पाहतच राहिला.''बरं, जाऊ आपण. नेहमीच्या वेळेला.'' तो दुसरं काही न सुचून म्हणाला. स्वर्णिमाबद्दल वाटणारं आकर्षण त्याला अस्वस्थ करत होतं. तिच्यापासून दूर जाणं त्याला क्लेशदायक वाटत होतं. चरमबरोबरची तिची आजची सलगी त्याला फार अस्वस्थ करून गेली होती.

# १०

पुढच्या भेटीच्या आदल्या दिवशी, नेमकी ती लपवलेली पुस्तकं, आईला दिसली. त्यातल्या काही पुस्तकांमध्ये नग्न स्त्री पुरुषांची चित्र, काही मजकूरही होता. तो पाहिल्यावर आईने पुस्तकं जाळून टाकली. स्वर्णाला काठीने मारलं. अंगावर काळेनीळे वळ उठले. तरी तोंडातून हुं की चू केलं नाही तिने. आईने परत परत विचारूनही कोणाचंच नाव निघालं नाही तिच्या तोंडून. शेवटी आई हतबल झाली. हात जोडून म्हणाली, “सोड हे नाद सगळे बाळा. रसातळाला नेतील गं. एक अब्रूचं काय ते धन कमावलं मी आयुष्यात, तेही उधळून टाकू नकोस.” परत ‘मी, मी, मी,’ स्वर्णाने कानांवर हात ठेवले. सहन होईना तिला हे सगळंच. ‘माझं वचन पूर्ण करतेय आई!’ ती मनोमन म्हणाली.

शनिवारी ती घरातून बाहेर पडली पहाटेसच, चार कपडे, थोडे पैसे, पेन ड्राईव्ह, फोन वगैरे जुजबी सामान घेऊन. घरी कॉटवर, उशांवर पांघरुण घालून ठेवलं. आई फक्त एकदा डोकावून गेली. आत येण्याचं धाडस झालं नाही तिच्याकडून.

प्रथम आणि ती पोहोचली तेव्हा सगळे तयारच होते. हिला पाहून सगळेच दचकले. प्रथम म्हणाला “ही ऐकेचना, हटूनच बसली, एकटीच जाईन म्हणाली मग आणायला लागलं.”

चरमचा चेहरा पाहता पाहता दगडी झाला. स्वर्णा म्हणाली, “ते मी रागाच्या भरात बोलले.”

चरम म्हणाला “आता इथून निघायची वेळ आली. पण... भैरवीला नेणं घातक ठरू शकतं, आपल्या दृष्टीने.”

कर्दम एकदम पुढे आला.”कशाला हवीय जागा सोडायला? हिलाच संपवतो. माझा पहिला मानव बळी!”

स्वर्णाच्या शरीरातून थंड वीज सळसळली. आज कोणी आपल्याला वाचवू शकणार नाही आणि वाचवायला येणारही नाही याची खात्रीच पटली तिला.
मग ती म्हणाली, “मी सगळे दोर कापून आलेय. तिने ओढणी बाजूला करून पाठीवरचे काळे नीळे डाग दाखवले आईला पुस्तकं सापडली. तिने ती जाळली आणि मला...”

चरमच्याही नकळत तो पुढे आला. हात अलगद तिच्या पाठीवरच्या वळांवर ठेवला. स्वर्णाच्या पाठीवरच्या वेदना

क्षणात संपून एका वेगळयाच वेदनेने तिच्या तनीमनी जन्म घेतला.

आता आश्चर्यचकित होण्याची पाळी बाकिच्च्यांची होती. प्रथम आणि कर्दम एकदमच पुढे सरसावले. चरमने त्याना हातानेच थांबवले.''कर्दम, ही वेळ नव्हे वादाची. आता एव्हाना हिच्या घरी समजलं असेल तर पोलिस केसही झाली असेल, पोलिस मागावर असतील. आपण पहिल्यांदा हे शहर सोडू. गोवा गाठू. पण वेगवेगळे. गोव्यातलं ठिकाण माहीत आहेच सर्वांना. स्वर्णा माझ्यासोबत राहील.'' प्रथमने काही बोलायला तोंड उघडलं. चरमने थांबवलं त्याला नजरेनेच

मग सगळे एकेकटे बाहेर पडले. प्रथम प्रचंड अस्वस्थ होत बाहेर पडला. त्याला हे अजिबात आवडलं नव्हतं की चरमने स्वर्णाला त्याच्याबरोबर न पाठवता आपल्याबरोबर राहण्यास सांगितले होते. पण चरमला विरोध करण्याची हिम्मत त्याच्यात नव्हती. शिवाय पोलिसांचे नसते लचांड आपण स्वर्णाला इथे आणल्यामुळेच मागे लागले या विचाराने त्याला अपराधीही वाटत होते. तो ही काहीच न बोलता बाहेर पडला.

शेवटी चरम आणि स्वर्णा उरले. चरमने एकदाच तिच्याकडे पाहिलं. स्वर्णाची नजर झुकली खाली. ती म्हणाली,

“मागच्या वेळेस जे घडलं ते परत कधीही घडणार नाही. वचन देते मी. मी अफूला स्पर्शही करणार नाही. या विद्येत पारंगत होणं हे माझंही ध्येय आहेच. तुम्ही मला एक चान्स परत दिलाय त्याचं मी सोनं करेन.”

तो म्हणाला “निघायला हवं.” तिने मान हलवली. मग तो म्हणाला, “आपणही एकत्र आहोत असा संशयही कोणाला येता कामा नये. मी पुढे असेन. तू मागोमाग ये. मी चढेन त्या बसमध्ये चढ. पणजीचं तिकिट काढ. तिथे उतरल्यावर मी सांगेन काय करायचं.” तिने मान हलवली. मग तो झटक्यात निघाला. ती पाठोपाठ चालू लागली.

फकिराने दीर्घ नि:श्वास सोडला. निसर्ग किती मोठा वशीकरण तज्ञ आहे हे पाहून त्याने एकदा आकाशाकडे हात केले. दोघांच्याही मागून तो बाहेर पडला.

गोव्यात पोहोचेपर्यंत रात्र झाली. पोहोचल्यावर स्वर्णाच्या कार्ड बदललेल्या फोनवर एक फोन आला.” मॅडम मै बाहर खडा हूँ स्टॅंड के. आप गेटसे सिधे बाहर आओ. गाडी का नंबर मेसेज किया है.” तिने समोर, आसपास, पाहिलं. चरम कुठेच नव्हता. मग ती माणसांच्या समुद्रातून वाट काढत बाहेर आली.

मेसेजमधली गाडी उभीच होती. ती किचिंत अनिश्चिततेने गाडीकडे गेली. आत कोणीच नव्हतं. काय करावं?

“मॅडम? बैठो ना अंदर.”ती बसली. त्याने गाडी सुरूच केली.

“पता मालूम है?”

“हां जी” ड्रायव्हर उत्तरेचा असावा.

मग ती बसली अंग चोरून साशंकतेने. टॅक्सी पुढे पुढे जात राहिली. तासाभराने टॅक्सी एका सूनसान जागी थांबली.”यहां उतरकर जाओ सामने की छोटी गली से. सामने बंगला दिखेगा.”

ती उतरली. ड्रायव्हर लगेच वळून निघून गेला. मग ती त्या छोट्या अरूंद लाल मातीच्या रस्त्यावरून बंगल्याच्या आवारात शिरली. लाल कौलारू बंगला. गेटपासूनही बराच आत.

सभोवताली बरीच झाडं, झुडपं, अंधारात नुसती हलताना दिसत होती. समोर मोठा दरवाजा आणि त्याबाहेर एक मिणमिणता दिवा. पण आत्ता तो मोठाच आधार वाटला तिला. भराभर चालत मुख्य दरवाजाजवळ गेली. दरवाजा बंद होता आतून. म्हणजे आत असावं कोणीतरी.

दरवाजाच्या दोन्ही बाजूला दोन खिडक्या होत्या मोठाल्या. बंगला खाली भर घालून उंचावर बांधला होता. जमिनीपासून खिडक्याही बऱ्याच उंचावर होत्या. खिडकी जवळ जाऊन आत काही दिसतं का पाहू लागली. आत अगदी मिणमिणते दिवे होते. खिडकीच्या तावदानांवर बरीच धूळ होती. आतलं काही धड दिसत नव्हतं. धूळ घशात जाऊन ठसका लागला स्वर्णाला.

आवाजाने सावध होऊन कोणीतरी खिडकीजवळ आले. हठी दिसला तिला. मग कर्दमही. प्रथम, चरम किंवा फकिरा कोणीच दिसेनात. ही दोघंच असताना आत जाण्याची हिम्मत होईना तिची. पण बाहेर असं थांबणंही धोकादायक. मग मनाचा हिय्या करून तिने खिडकीवर काठीने टकटक केलं. हिला पाहिल्यावर अंगार फुलले दोघांच्याही डोळ्यात. कर्दम झट्कन दारातून तिच्याजवळ आला आणि तिला बखोट्याला धरून दरवाजातून आत खेचलं त्याने.

“आई गं!”

“ओरडू नको उगाच. अवदसा मेली! सगळं होत्याचं नव्हतं करून टाकलंस.”

“माझी काहीच चूक नव्हती. काय ते या हठीला बोल.” स्वर्णा एकदम एकेरीवरच आली. हठीची हटलीच मग. तावातावाने तो तिच्या दिशेने आला.

“मी मदत करण्याचा प्रयत्न करत होतो. तुझी लायकी नाही त्याला काय करणार?”

“माझी लायकी काढू नकोस. सगळ्यांना माहीत आहे, मी तुम्हाला सगळ्यांना पुरून उरणार आहे. म्हणूनच डोईजड वाटतेय मी तुम्हाला. पण मला समूहात ठेवून घेतलंत तर मी बरीच फायद्याची ठरेन हे लक्षात घ्या. तुमच्याकडे कौशल्य आहे, माझ्याकडे माहिती. दोन्हीचा मिलाफच खरं ज्ञान मिळवून देईल. राहता राहिला प्रश्न चरमचा. ते मला आवडतातच. मी कधीच नाकारलेलं नाही. पुराणापासून भैरव भैरवींचे विवाहही झालेली उदाहरणं आहेत. तुम्ही उगाच नाही त्या गोष्टींचा बाऊ करू नका.”

कर्दमने तिची मानच धरली. स्वर्णाचा श्वास अडकला. ती जीवाच्या आकांताने हातपाय झाडू लागली. पण कर्दमच्या पोलादी पकडीतून सुटता येईना. कर्दमचा आवेश पाहून हठीही हबकला.”अरे सोड, मरेल ती.”

“मरू दे!” तो गुरकावला.

हठीने मग स्वत:ची ताकद लावत त्याला कसंबसं बाजूला केलं. पकड ढिली होताच स्वर्णा हेलपाटत पार लांब भिंतीवर आपटली आणि तिथेच निपचित पडून राहिली बराच वेळ. पोटात अन्नाचा कण नव्हता काल रात्रीपासून. मग हळू हळू उठून बसली. हठीने पाणी दिलं, ती प्यायली. त्याला हात जोडून धन्यवाद दिले तिने. तो काही न बोलता निघून गेला. कर्दम कुठे दिसेना तिला तेव्हा हायसं वाटलं जरा.

हळू हळू उठून तिने आसपास नजर फिरवली. खाली चार खोल्या, मध्ये दिवाणखाना, स्वैपाकघर, दिवाणखान्यात वर जाणारा जीना आणि खाली जाणारा जीना दिसत होता. बंगल्याला तळघर असावं. तिने हळूच कानोसा घेतला. स्वैपाकघरात हठी होता. मग तिने त्यातल्या त्यात लहान दिसणाऱ्या खोलीत प्रवेश केला. ती रिकामी दिसत होती. एक कोपऱ्यात फक्त छोटा बेड आणि एक लहानसं कपाट. एक दार दिसलं, बाथरुम होती पलिकडे.

तिने हातपाय धुतले. मग येऊन बेडवर पालथी झोपली. पाठींवरच्या वळांमुळे पाठीवर झोपणं शक्यच नव्हतं. तशाही अवस्थेत तिला झोप लागली. जाग आली तेव्हा कोणीतरी तिच्या खोलीत असल्याचा भास झाला तिला. तिचे डोळे

खाडकन उघडले. ती दचकून उठून बसली बेडवर. काळोखात पाहू लागली. पण तेवढ्यात ती व्यक्ती बाहेर गेली असावी. तिने बाहेर येऊन पाहिले. दिव्याची बटनं कुठे आहेत? मग ती पटकन खोलीत आली. चाचपडत भिंतीवरून हात फिरवत शोधल्यावर एके ठिकाणी बटनं सापडली. एक दाबलं. काहीच नाही झालं. दुसरं दाबल्यावर दिवा लागला. तिने संपूर्ण खोलीत नजर फिरवली, कोणीही नव्हतं. मग तिने आधी दरवाजा आतून लावून घेतला. बाथरुमचं दार बंद केलं. मग ती बेडवर येऊन बसली. सकाळपासून पोटात काही नव्हतं. आता रिकाम्या पोटाने झोप येणं शक्यच नव्हतं. पण बाहेर जाण्याची हिम्मत नव्हती. मग तशीच बसून राहिली. कधीतरी बसल्या बसल्याच झोप लागली. सकाळी जाग आली तेव्हा उन्हं वर आलेली. ती कानोसा घेत राहिली. काही वेळाने बाहेर बऱ्याच जणांचे आवाज येऊ लागले तेव्हा दार उघडून बाहेर आली. चरम, प्रथम, फकिरा, सर्वांना पाहून तिला हायसं वाटलं.

तिने स्वैपाकघरात जाऊन पाहिलं. चहा केलेला दिसत होता. पावही उघडा पडला होता. तिने भराभर चहा पेल्यात ओतून घेतला आणि त्याबरोबर पाव खाल्ला. मग तिला जरा हुशारी वाटली.

बाहेर आली तेव्हा प्रचंड तावातावाने काही चर्चा सुरू होती. ही बाहेर आल्याबरोबर सगळे एकदम गप्प झाले. ती चरकली. आपल्याबद्दलच चर्चा सुरू असावी.”काय बोलत होता?” तिने चरमकडे पाहत विचारलं. दोन क्षण शांततेत गेले. कोणी काहीच बोलेना. मग चरम म्हणाला “भैरवी, आपल्या नियमांमध्ये एक नियम असाही होता की तंत्रविद्येसाठी आपल्या तनामनाचा प्रयोगांसाठी उपयोग करायला आपली कायम संमती असेल.”

“हो! माहीत आहे मला.”

“आपण गुंफेत असतो तर सावकाशीने हे प्रयोग करता आले असते. पण आता ते शक्य नाही. आता आपल्याला साधना तेज करावी लागणार.”

“हो.”

“एका प्रयोगाविषयी मी बरीच माहिती मिळवली आहे. त्याची साधनाही मी बरेच दिवस करत आहे. पण या मुख्य साधनेसाठी एका स्त्रीची आवश्यकता आहे. सध्या तुझ्याशिवाय समूहात दुसरी स्त्री नाही. पण या सर्वांना वाटतं तू खूपच नवखी आहेस. घात होऊ शकतो. पण तरीही एक प्रयोग म्हणून करायला

हवाच. कामवासनेवर विजय हा मृत्यूवरचा अर्धा विजय.'' अचानक प्रथम, चरमला अडवत तावातावाने बोलू लागला.

''मृत्यूवर शारिरीक विजय किंवा शरीराचं अमरत्व अशक्य आहे. तुम्ही सगळेच हे लक्षात ठेवा. मृत्यूवर विजय म्हणजे मृत्यूच्या भयापासून विजय! माझं हे म्हणणं माझ्या साथीदारांना पटत नाही. पण सत्य हेच आहे. स्वर्णा, चरम, निदान तुम्ही भ्रमात राहू नये. अध्यात्मिक उन्नत्ती हेच अंतीम ध्येय असायला हवं''

स्वर्णा प्रचंड गोंधळली. 'हेच तर त्या पुस्तकांमध्ये गुप्त आशयात मांडलं होतं. पण मग काय उपयोग? छेछे, चरम म्हणतो तेच खरं. मृत्यूवर विजय म्हणजेच अमरत्व, तरच सर्व मानवसृष्टीवर विजय!! पण हे करायचं तर या प्रयोगात सहभागी व्हायला पाहीजे. ' ती म्हणाली ''मी तयार आहे.''

भैरवी, तुला वाटतं तितकं ते सोपं नाही. भैरवीसाधना सर्वात कठीण. तुला आधी वाचावं लागेल. एकटीने करायची साधना करावी लागेल.''चरम समजावण्याच्या सुरात म्हणाला.''दोन दिवस तू पूर्ण विश्रांती घ्यावीस. पण जास्त वेळ घालवण्यात अर्थ नाही. मला वाटतं तत्पुर्वी तू तुझ्या घरच्यांशी

बोलून घ्यावंस. विनाकारण पोलीसांचा ससेमीरा मागे लावून घेण्यात अर्थ नाही.”

स्वर्णा म्हणाली “तो मार्ग आता कायमचा बंद झालाय माझ्यासाठी. आता भैरवी हीच माझी ओळख.”

“तसं असेल तर तुझी कागदपत्रं नव्याने बनवून घ्यावी लागतील जशी आमची सर्वांची आहेत. कायद्याला हे मान्य नाही. पण या विद्यांचा इतका चुकीचा अर्थ लोकांच्या मनात पक्का बसलेला आहे की उघडपणे आपण ही साधना करणं, आजच्या जमान्यात कोणालाच पटणारं नाही. म्हणून वेगळ्या नावाची ओळख, इतकंच नव्हे तर वेगळ्या चेहऱ्याची ओळखही काही प्रमाणात निर्माण करायला हवी.” स्वर्णाला हे प्रचंड एक्सायटींग वाटलं. ती म्हणाली “कागदपत्रांसाठी तुम्ही मदत करा. मी इथे कोणालाच ओळखत नाही. चेहऱ्याची ओळख मी पाहते कशी बदलायची.” मग तिच्या डोक्यात नवनव्या कल्पनांचा संचार होऊ लागला.

चारच दिवसात तिची नवी कागदपत्रं आणि नवा चेहरा दोन्ही तयार झाले. खरंतर तिने फक्त केसांचा भांग, रचना, रंग एवढंच बदललं. एक झीरो नंबरचा चष्मा लावला. साडी नेसली, जी अगदी शेवटच्या क्षणी तिने बॅगेत कोंबली होती. पण

तेवढ्यानेच तिच्यात कमालीचा बदल दिसू लागला. कोणीही पटकन तिला ओळखलीच नाही जेव्हा ती 'हा' नवा जामानिमा करून बाहेर आली. फक्त चष्मा तिने प्रथमकडून मागवला. केसांसाठी कर्दमचं भस्म आणि फकिराची मेंदी वापरली.

कोवळी चंचल विशीतील स्वर्णा तिशीतील गंभीर स्त्री दिसू लागली. याबाबतीत सर्वांनीच कौतुक केलं तिचं. सगळ्यांचा चांगला मूड पाहून ती म्हणाली, परवा तुम्ही भैरवी साधनेबद्दल बोललात, मी त्यावर बरच वाचन केलं मग. मला हा संदर्भ सगळ्यात जास्त विश्वासार्ह वाटला. असं म्हणून तिने तो उतारा आठवून सांगायला सुरवात केली.

भैरवी साधना : हेच पुस्तकाचं नाव. प्राथमिक तयारीसाठी बरीच साधना सांगितली आहे. त्यात आहार विहाराचे नियम आहेत प्रामुख्याने. मग ही साधना, पान क्रमांक ७३ वर दिलीय. या साधनेमध्ये साधक कामशक्तीला चॅनलाईज करतो. तिच्यावर संपूर्ण विजय मिळवतो. त्यानंतर जगातील कोणतंच प्रलोभन त्या साधकाला विचलीत करू शकत नाही.

साधना विधी :

आसमंत धुंद सुगंधी फुलांनी सजवावा. साधकाने विवस्त्र अवस्थेत विवस्त्र स्त्रीला मांडीवर घेऊन ध्यान करावे. अशा

अवस्थेत कामशक्ती जोर धरतेच. परंतु तिला आटोक्यात ठेवत तिचे वेगळया उर्जेमध्ये परिवर्तन करून जर तो साधक विचलीत न होता निराकार ध्यानात लीन झाला तर त्याने ही भैरवी साधना यशस्वी रित्या पार पाडली असे मानावे. मन विचलीत होऊ लागल्यास विनाविलंब साधना थांबवावी. स्त्री शरीरास मांडीवरून दूर करावे. स्वयं तिथून दूर निघून जावे. आपली अजून तयारी पूर्ण नाही असे समजावे. स्वर्णा न थांबता विनासंकोच मुखोद्गत विधी सांगत होती. सगळे अवाक होऊन ऐकत होते. काही क्षण कोणीच काही बोलले नाही.

मग चरम म्हणाला, “तू माहिती घेतलीस हे चांगलच आहे. कर्दम, हठी, तुमचा विरोध मी समजू शकतो. कट्टर ब्रह्मचारी तुम्ही. परंतु ब्रह्मचर्य पाळणं आणि कामशक्तीला उद्युक्त करून तिचे रुपांतर वेगळया उर्जेत करून उन्नत होणं हे दोन निरनिराळे मार्ग आहेत. सर्व मार्गांचं उद्दीष्ट केवळ एकच, परमोच्च भयकारी मृत्यू, त्याचा अर्थ समजावून घेणं आणि त्याच्यापासून मुक्त होणं!”

“त्याच्यापासून मुक्त होणं नव्हे, त्याच्या भयापासून मुक्त होणं. हा फरक समजावून घ्या. ! इतरही अनेक भयं आपणास भेडसावतात. जसं हठी आणि कर्दमला सतत कामवासना उद्दीप्त

होण्याचे भय वाटते, कोणा सामान्य आयुष्य जगणाऱ्याला धनसंपत्तीचा ऱ्हास होण्याचे भय, तर कोणाला आप्तेष्टांपासून दूर होण्याचं भय! पण सगळयात जास्त भय वाटते मृत्यूचे कारण मृत्यूनंतरचा प्रदेश अनाकलनीय, माहीत नसलेला आहे. त्याचे गुढ भिवविते. त्याचा, परमोच्च समाधीवस्थेत उलगडा झाला, तर मृत्यूचे भय उरणार नाही. आणि ज्याला मृत्यूचे भय नाही तो जेता, कारण त्याला नमविण्याचं अस्त्र अख्ख्या मानवजातीकडे उपलब्ध नाही.'' प्रथम, तळमळीने बोलत होता. या एकाच मुद्द्यावर त्याचे आणि चरमचे विचार पटत नव्हते.

चरमने प्रथमच्या बोलण्याकडे संपूर्ण दूर्लक्ष केले आणि तो म्हणाला ''मी एक सच्चा साधक आहे. कामवासनेवर विजय मिळवता आला तरी मी स्वत:ला खूप भाग्यवान समजेन. त्यासाठी मला या दिव्यातून जावेच लागेल. भैरवी, तू मला साह्यभूत होशील का या साधनेत? फकिरा, तुला काय वाटतं?''

''चरम, तुम तैयार हो भी सकते हो! मगर भैरवी? उसका क्या? वो भी तो जिंदा मानव है! और इससे पहले बेलगाम हो भी चुकी है!'' स्वर्णाचा चेहरा लाजेने आणि रागाने लालबुंद झाला.

''वह अफीम का असर था फकिरा! तुम्ही सर्व जाणताच. तरीही मला दोष देता?''

“छोरी, अफीम अंदरुनी बात उपर उठाती है! नयी चीज अंदर नही डालती.” स्वर्णा गोरीमोरी झाली. पण गप्प राहीली.

“तरीही मला ते करावच लागेल फकिरा! माझा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे. आणि हा विश्वास मला पडताळून पाहायचा आहे” चरम म्हणाला.

तिला चरमच्या मध्येच थंड, मध्येच उबदार वागणुकीचं गुपित उकलल्यासारखं वाटलं. मग प्राथमिक साधना भैरवीने एकटीने करावी. आणि एक दिवस ठरवून चरम आणि तिने भैरवी साधना करावी असं ठरलं.

प्रथम प्रचंड अस्वस्थ झाला. आता त्याला स्वर्णाची, चरमची आणि पर्यायाने समूहाची चिंता सतावू लागली.

स्वर्णा पुस्तकवाचनावर मदार ठेवून होती. तिने मिळतील ती सर्व पुस्तकं, वाचून काढली. त्यामध्ये दिलेल्या साधना करण्याची तिला अजिबात गरज वाटली नाही. वाचलं, समजलं, आपल्याला साधना जमलीच, असा समज तिने करून घेतला.

कुठेतरी मनामध्ये चरमविषयीचं प्रचंड आकर्षण तिला सादही घालत होतं.

प्रथमला हे अजिबात पटलं नव्हतं. त्याने स्वर्णाला एकटं गाठून समजावण्याचा प्रयत्न केला.”हे बघ, आज चरम आहे म्हणून तू या प्रयोगाला हो म्हणते आहेस. याविषयी स्वत:बरोबर प्रामाणिक राहून विचार कर. ह्या प्रयोगात तो यशस्वी झाला तर तुला, ती, तुझ्या स्त्रीत्वाची प्रचंड मोठी हार वाटणार आहे. कमालिची उदासीनता तुला ग्रासून टाकू शकते. समजा अगदी हा प्रयोग यशस्वी झाला, दोघांच्याही बाजूने, तर सगळयांनाच ही साधना कराविशी वाटेल, कारण कामवृत्तीवर जय हा सर्वात मोठा जय असं हे सर्व मानतात. मग तुला प्रत्येकाबरेबर या साधनेत सहभागी व्हावं लागेल. आहे तुझी तयारी?”

या वाक्याबरोबर ती आधी प्रचंड हादरली, मग चवताळून प्रथमच्या अंगावर धावून गेली.

“तुला माझ्यामुळे चरमच्या नजरेत तुझं स्थान डळमळीत झालेलं दिसतंय. माझ्याही बाबतीत तू कमालीचा पजेसीव्ह आहेस. दिसतंय मला सगळं. मी माझे निर्णय स्वत: घेईन. तुला लुडबुडायचं कारण नाही, प्रथम! मी जे करेन त्याची सर्व जबाबदारी माझी. तुला काळजी करण्याचं कारण नाही. कळलं? आता नीघ इथून.”

प्रथमचा चेहरा लाल बुंद झाला. पण काही न बोलताच तो निघून गेला. मग तो दिवस उगवला. चरम गेले आठ दिवस स्वत:ला खोलीत बंद करून घेऊन, मौन पाळून, फक्त एकदा फळं दूध असा आहार घेऊन साधना करत होता.

आठवडाभर चरमचं दर्शनही न झाल्याने स्वर्णा अस्वस्थ होती. प्रथम, त्या दिवशी जो गेला तो परत आलाच नव्हता. बाकी सर्वांनीच तिच्याशी जवळपास बोलणे टाकले होते. नाही म्हणायला तिला या साधनेपासून परावृत्त करायला फकिरा काही गाणी गात राही ज्यात स्त्री मुळे तांत्रिकाचा ऱ्हास कसा होतो हे वर्णन करून सांगितले जायचे. स्वर्णाला प्रचंड एकटं वाटायला लागलेलं. तिचं वाचनातही लक्ष राहिलं नव्हतं. कधी एकदा ती साधना करण्याचा दिवस उगवतो असं तिला झालेलं.

# ११

त्या दिवशी सकाळीच तळघरात फकिराने साधनेची सामग्री एकत्र करून ठेवली. सगळी मांडामांड झाल्यावर त्याने हठी आणि कर्दमला बाहेर जाण्यास सांगितले. चरम शुचिर्भूत होऊन साधनेच्या तयारीस लागला. फकिराने स्वर्णास बोलावून धोके समजाऊन सांगितले. तो म्हणाला “छोरी, अब ये करने की ठान ली ही है, तो, इसे अच्छेसे निभाना। किसीभी क्षण ये लगे की शरीर धोखा दे रहा है, मन विचलित हो रहा है, तो तुरंत एक दुसरेसे दूर हो जाना. क्षणभर की देरी, और चरम की आजतक की तपस्या भंग हो जायेगी! समझ रही हो?”

स्वर्णाने मान हलवली. फकिराला अशुभाचं सावट तिच्या चमकत्या डोळ्यात दिसलं. तो मनोमन हादरला. त्याने दोन्ही हात वर उंचावून प्रार्थना केली. खरंतर एखाद्या तज्ञ भैरवीने या साधनेचं संचालन करावं, साधकाने तिच्या हाती स्वत:स सोपवावे, आणि स्त्री शरीर कोणत्याही स्त्रीचे चालेल, ती तांत्रिक भैरवी असण्याची गरज नाही, किंबहुना ती एखादी वेश्या असेल तर अधिक बरं, जेणेकरून तिच्याकडून कोणताच पुढाकार, उत्तेजना दिली जाणार नाही असा त्यामागचा विचार असावा.

असा पुरातन उल्लेख. पण तज्ञ भैरवी तर नाही उपलब्ध, मग आहे त्यातच प्रयोग करणे गरजेचं असा विचार चरम आणि फकिराने केला. फकिराने विरोध केलाच, पण चरमला हा प्रयोग करून पाहण्याची आता घाई झालेली दिसत होती. कदाचित, स्वर्णाला शोधत पोलीस येतील आणि नंतर हा प्रयोग करून पाहण्याचा अवसर मिळणं जवळपास अशक्य असं काहीसं त्याला वाटत असावं. मग फकिराने चरमला विधी, मंत्र, जप करण्याची पद्धती सर्व समजावले परत एकदा. चरमचा चेहरा अत्यंत निर्विकार दिसत होता.

स्वर्णाला तो एकदम परका वाटला. तिची धडधड वाढली.

फकिरा निघून गेला. चरम मंत्रोच्चारणात मग्न झाला. काही वेळाने त्याने स्वर्णाला विचारले,

“भैरवी, या साधनेला तू संमती दिली आहेस. पण अजूनही वेळ गेलेली नाही. तुझा निर्णय तुला बदलायचा असेल तर तू तो बदलू शकतेस.”

यावर तिने “नाही” असे उत्तर दिले. मग चरमने तिला चौरंगी बसवले. स्त्री शक्ती, जी, आज त्याला परमोच्च असे कामवासनेवरचे वर्चस्व बहाल करणार होती, तिचे पुजन केले.

कुंकुम तिलक लावला, तिच्या पायांवर सुगंधी फुले अर्पिली. सुगंधी चंदनाचा लेप तिच्या चेहऱ्याला लावला. मग त्याने तांत्रिक पद्धतीने तिला नमस्कार केला. मग तो तिला म्हणाला, “यापुढील विधीमध्ये मला साह्यभुत व्हावेस भैरवी.”

स्वर्णा आतल्या खोलीत गेली. नियमाप्रमाणे वस्त्र उतरवून जेव्हा ती परत आली तेव्हा चरम विवस्त्र होऊन चौरंगावर पद्मासनात बसला होता. त्याने फक्त एकदा तिच्याकडे निर्विकारपणे पाहिले आणि त्याने डोळे मिटले. स्वर्णाचा चेहरा त्याला तसे पाहून लाल बुंद झाला. ती काही न बोलता त्याच्या मांडीवर जाऊन बसली.

तो स्थीर होता. स्वर्णाचे शरीर मात्र भट्टीत घातल्याप्रमाणे तापले होते. तिचा श्वासोच्छवासही जलद गतीने होऊ लागला. तिचे हात त्याच्या शरीरास स्पर्शण्यास आतुरले. काही काळ ती स्थीर राहिली. परंतु मन प्रचंड अस्थीर झालेलं. ते गप्प राहू देईना. तिच्याही नकळत तिचे शरीर अस्थीर झाले. ती आसक्त होऊन नकळत त्याला स्पर्श करू लागली.

काही क्षणातच चरमला जाणीव झाली आपण केवढी मोठी चूक केलीय ती. तो अधिकाधिक मन ध्यानात एकाग्र करू लागला, स्थीरता वाढवू लागला, तसा स्वर्णाचा पारा चढू

लागला. एखाद्या डिवचलेल्या सर्पिणीसारखी ती त्याला बिलगून नाना तऱ्हेने त्याला चाळवण्याचा प्रयत्न करू लागली, तसा चरम ताडकन उठला, त्याने तिला झटक्यात दूर लोटले, कपडे घालून तो क्षणात बाहेर पडला. जाताना त्याच्या डोळयात प्रचंड घृणा भरून आलेली तिला दिसली.

तिने कपडे चढवले. पण तिच्या ह्रदयातली आग तिला जाळत होती आतल्या आत. डिवचली गेलेली, झिडकारली गेलेली स्त्री, ही नागिणी पेक्षाही भयंकर असते असे म्हणतात.

तंत्रविद्या काय किंवा कोणतीच विद्या काय नुसती पुस्तके वाचून कधीच आत्मसात करता येत नाही याचे स्वर्णा हे जीवंत उदाहरण होते. त्यासाठीची पूर्वतयारी प्रचंड महत्वाची असते. योग्य अशी मानसिक बैठक, मनाचा कणखरपणा, करत असलेल्या गोष्टीत संपूर्ण विश्वास आणि ठरवल्या मार्गापासून न ढळण्याचा निश्चय हे चार मुख्य स्तंभ अत्यंत आवश्यक! सगळ्यात महत्वाचं म्हणजे संपूर्ण ज्ञान.

स्वर्णाकडे माहिती होती. त्या माहितीलाच ती ज्ञान समजून बसली. आणि संपूर्ण साधनेचा खेळखंडोबा झाला. ती चरमची वाट पाहत वर दिवाणखान्यात बसून राहिली. संध्याकाळी चरम परतला. तो आत आल्या आल्या ती

त्याच्याकडे झेपावली.''चरम, तुलाही माझ्याविषयी आकर्षण वाटते ना? सोड हे सगळं तंत्र वगैरे, माझा हो. ही सगळी मूर्ख माणसं. अडाणी. त्यांच्या नादी लागू नकोस. ये माझ्याजवळ. बघ अजूनही काहीच बिघडलेलं नाही. पुस्तकात दिलेलं सगळं बकवास आहे. मी ही सगळं वाचलं होतच की. काय झालं?''

चरम अतीव आश्चर्य आणि विषादाने तिच्याकडे पाहत राहिला. आयुष्यात पहिल्यांदाच त्याचा एखाद्या व्यक्तीविषयीचा अंदाज इतका चुकला होता.

त्याने विखारी शब्दांनी तिची निर्भत्सना केली.''भैरवी, छे तू या नावालाच काळीमा फासलास. सकाळी जे घडलं त्यासाठी कदाचित समूहाने तुला माफही केलं असतं. अननुभवातून घडलेली कृती समजून. पण आत्ता तू जे हे बोललीस ते निश्चितच तुझी कोती मनोवृत्ती, पोरकटपणा, समूह आणि त्याच्या उद्देशांविषयीची अनास्था, विद्येविषयीची अनास्था दर्शवणारं आहे. तू जे केलंस त्याविषयी यत्किंचितही पश्चात्ताप तुला वाटत नाही? मी तुला याक्षणी समूहातून काढून टाकत आहे.''

''का? तुम्हीही तुमच्या कामवासनेवर जय मिळवू शकला नाहीच ना? तुमचं ध्यानही भंग पावलंच ना?''

“हो, हे खरय. पण मी माझ्या उद्देशाशी प्रामाणिक राहीलो. ज्या क्षणी माझा तोल ढळतोय असं जाणवलं त्या क्षणी मी दूर गेलो. मलाही माझ्या त्रुटींची कल्पना आली. पण तू तेव्हाही सगळं जाणीवपूर्वक करत होतीस की काय असं तुझं आताचं बोलणं ऐकून वाटू लागलय मला. तुझा या समूहात येण्याचा नक्की हेतू काय होता याविषयीच मला शंका येतेय आता.”

पाठोपाठ आलेल्या कर्दमने या दोघांचे बोलणे ऐकले होते. कर्दम अचानक पुढे आला आणि त्याने स्वर्णाला फरफटत नेले त्याच्या खोलीत. कोणीही आत येऊ नये म्हणून दार आतून बंद केले.

स्वर्णाचा मगाचचा आवेश पूर्णपणे गळाला. भयाने तिचा चेहरा पांढरा फटक पडला. आता आपला मृत्यू टळत नाही या एकाच भयाने तिला संपूर्णपणे ग्रासले. कर्दमने हाताच्या एका झटक्याने तिला भिरकावले. मग त्याने भिंतीवर लटकवलेला आसूड काढला आणि तिच्या दिशेने तो तावातावाने चालत आला.

एक संपूर्ण शक्तीनिशी आसुडाचा फटका त्याने तिच्या पाठीवर ओढला. प्रचंड किंकाळी तिच्या तोंडून बाहेर पडली.

बाहेरून जोरजोरात दरवाजा वाजवला जाऊ लागला. एव्हाना सगळेच परतले होते. कर्दम तितक्याच संतापाने आसूड तिच्यावर ओढत चालला. आता बाहेरून दरवाजावर जोरजोरात धडका बसू लागल्या. एका आसुडाच्या फटकाऱ्याने ती दुसऱ्या कोपऱ्यात भिरकावली गेली आणि तिच्या हाताला कसला तरी स्पर्श जाणवला. कर्दम पुढच्या क्षणी पुढे सरसावला. त्याने तिच्या झींजा पकडल्या आणि तिला जोरात भिरकावण्याच्या उद्देशाने त्याने तिला जवळ ओढले, आता तो जोर लावून तिला भिरकावणार, भिंतीवर आपटून ती गतप्राण होणार तेवढ्यात मगाशी हातात आलेला सुरा तिने कर्दमच्या पोटात सर्वशक्तीनिशी घुसडला.

प्रचंड किंकाळी फोडत तो उलट्या दिशेने कोलमडला, पोटाकडे हात गेले, पकड सुटली, तिने परत सुरा उपसून परत खुपसला. जीवाच्या आकांताने ती वार करत राहिली. संपूर्ण रक्तात न्हाऊन निघाली. बाहेरच्या धडकांनी तिच्या शेवटच्या वाराबरोबर दरवाजा धाडकन उघडला.

डोळ्यांच्या गारगोट्या, केस पिंजारलेले, नखशिखांत रक्ताने माखलेली स्वर्णा. तिला तसे पाहून सर्वांची वाचाच बसली. फकिरा सर्वात आधी सावरला. कर्दम केव्हाच मृत

पावला होता. ‘पुढे काय?’ फार गहन प्रश्न होता. हे गोवा होतं. त्यांची गुंफा नव्हती. पोलिसांना बोलवायचं तर फारच मोठा धोका होता. न बोलवून चालणार नव्हतं. हठी वाचा गेल्यासारखा आपल्या मित्राच्या कलेवाराकडे हतबुद्ध होऊन पाहत होता.

फकिरा म्हणाला “प्रथम, चल मेरे साथ.” मग त्यांनी तंत्रविद्येचे सर्वसामान, पुस्तके, कर्दमचं सर्व सामान, आदी गोष्टी तळघरातल्या भिंतीतल्या चोरकप्प्यात भरून ठेवल्या. एक न् एक वस्तू आत गेली. सगळीकडचे हातांचे ठसे पुसून टाकण्यात आले. पोलिसांना फोन करून सर्वांनीच तिथून निघून जावं असं चरमने सांगितलं.

पण प्रथम तयार झाला नाही.”मी थांबेन पोलीस येईपर्यंत.” तो म्हणाला. स्वर्णा पुतळ्यासारखी बसून होती. पोलीस आले. पंचनामा झाला. प्रथमची जबानी घेतली. कर्दम बाहेरून चोरी करण्याच्या उद्देशाने आत घुसला असावा असा बनाव त्याने पोलिसांसमोर केला. जबान्या घेतल्या. पोस्टमार्टम साठी बॉडी पाठवली. स्वर्णाला पकडून घेऊन गेले. स्वर्णाच्या प्राथमिक तपासणीत तिच्या शरीरावरचे वळ, मानेवरच्या खुणा, यांमुळे तिच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याचे सिद्ध झाले. आठ दिवसांची पोलीस कस्टडी मिळाली तिला.

तिला गुन्हा कबूल नाकबूल करण्याचीही वेळ आली नाही. भैरवी याच नावाने पोलीस फाईल बनली. केस सॉल्व्ह झाली म्हटल्यावर पुढे फारसा तपास झाला नाही. स्वर्णाला तीन वर्षाची सक्तमजूरी लागू झाली. स्वत:चा बचाव करताना खून झाला पण खून इतका अमानूषपणे अनेक वार करून करण्यात आला होता की कोर्टाने तीन वर्षाची शिक्षा लागू केली. जेलमधले अनुभव स्वर्णाला माणसातून पूर्ण उठवून गेले.

# १२

पहिल्या काही रात्री त्या ढेकणांनी भरलेल्या जागेमध्ये तिने संपूर्ण जागून काढल्या. तिला झोप लागेल याचीच भीती वाटायची. कारण झोप म्हणजे ते एकच स्वप्न. ‘कर्दम तिला आसुडाने मारतोय. तिला उचलून हवेत गरगर फिरवून भिंतीवर आपटतोय. मृत्यूच्या भयाने तिची वाचा बसलीय. ती ओरडण्याचा प्रयत्न करतेय आणि ओरडूच शकत नाहीय. ’ दरदरून घामाने थबथबून तिने जागे व्हावे आणि मग रात्रभर बसून राहावे. मनात सतत एकच धास्ती ‘चुकून झोप लागली तर?’ प्रत्यक्षात तिने कर्दमला संपवले असले तरी तिला त्याच्यापासून सुटका मिळाली नव्हती. मिळण्याची शक्यता वाटत नव्हती. ज्या मृत्यूवर जय मिळवण्यासाठी हा अट्टाहास केला होता त्या मृत्यूचे भयच मनात थैमान घालत होते. असे विचार आले की तिला अचानक हसायलाच यायचे.

आसपासच्या बायका तिचं ते विकट विचित्र हास्य दचकून पाहायच्या. मग ती अचानक रडायला लागायची. पण पहिल्यांदा तुरुंगात येणाऱ्या बायकांना असे त्रास होतातच. त्या भिंतीनाही सवयच झाली होती. त्याचे विशेष काही कोणाला

वाटत नसे. बऱ्याच कैदी महिला दांडगट आणि गुंड प्रवृत्तीच्या होत्या. पण तरीही भैरवी बद्दल एक वेगळाच आदर कैद्यांमध्ये होता. शेवटी तीही खून करून आली होती. तोही एका भल्या दांडग्या माणसाचा. मोठी कामगिरी, उगाच छुटपुट चोरीमारी नव्हे. सगळ्या बातम्या यांना कशा बरोबर लागतात काही कळेना स्वर्णाला.

ती अजून पुरेशी माणसात आलीच नव्हती तशीही. मग एका बड्या कैदी महिलेने, स्वर्णाला बोलावून घेतलं. 'बेणगी' नाव तिचं. तिला म्हणाली, "तुझा बाडबिस्तारा घेऊन माझ्या बराकीत ये ऱ्हायला. तुला तैयार करून सोडते."

'काय करावं ? जावं की नको? पण नाही म्हटलेलं चालतं का?' मग तिची शेजारीण म्हणाली 'जा. जरा सुकात ऱ्हाशील. जरा सेवा कर तिची की जालं. '

'दिवसभराच्या कष्टातून सुटका मिळेल का? जरा बरं जेवण मिळेल का?' स्वर्णाला फिसकन हसायलाच आलं. 'काय करतोय आपण? स्वप्नात आहोत की हे सगळं खरंच घडतंय? खूनी आहोत आपण. तुरुंगात आहोत. आईला कळेल तेव्हा काय वाटेल तिला? चरम काय विचार करत असेल आपल्याविषयी? विचार तरी करत असेल का आपला? त्याला

खरंच काही वाटत होतं आपल्याविषयी ? प्रथम? काय झालं त्याचं पुढे? का केला आपण कर्दमचा खून?'

"भैरवी! भेटायला आलय बग तुला कोनी."

जेलरने पाठवलेली बाई तिला बोलवत होती. काही क्षण 'भैरवी' या हाकेने तिला कळलंच नाही. मग जरा गडबडून बघू लागली."मला भेटायला? कोण? आई? हे भगवान!"

तिने विचारलं "कोण आलय?"

"या बाय, यडी का खुळी? कोनतरी आलय भेटाया ते नशीब समज. हित वर्ष वर्ष कोन फिरकत नाय. हिला भेटाया आलय तर म्हनं कोन आलय. जा लवकर."

स्वर्णा सावकाश चालत आली. पाहिलं तर 'प्रथम'. तिच्या डोळ्यात आसवं जमा झाली. त्यांना मागे हटवत ती जाळीजवळ आली. कसनुसं हसली. त्याने जाळीतून जमेल तेवढं थोपटलं हातावर. मग थोडे पैसे दिले हातात. काय बोलावं दोघांनाही कळेना. मग ती म्हणाली "चरम?" प्रथमच्या डोळ्यात वेदना स्पष्ट तरळली.

“अमेरिकेला गेला. फकिरा त्याच्या मूळ गावी उत्तरप्रदेशात परतला. हठीला वेड लागल्यासारखं झालं. भाऊ घेऊन गेला गावी त्याला.”

“समूह.. तुटलाच म्हणजे.”

“हं!” प्रथम विषण्ण हसला.

“तू मला भेटायला का आलास?” प्रथम नुसता पाहत राहीला. म्हणाला “मी कारणीभूत आहे या सगळ्याला कुठेतरी. तू बाहेर येईपर्यंत मी येत राहीन. स्वत:ला तुटू देऊ नकोस. मी वाट पाहीन तुझी. शांत राहिलीस तर तीनच्या ऐवजी दोन वर्षातच सुटशील. मी येऊन जाऊन असेन.” त्याने परत थोपटलं तिच्या हातावर. वेळ संपल्याची बेल झाली. मग सगळ्यांना परत आत नेण्यात आलं.

प्रथम आपल्यात गुंतला होता हे माहीत होतं. ‘पण एवढा?’ तिला हसायलाच यायला लागलं. रडायलाही. ‘काय तुटायचं राहिलय आता?’ वेडी होती ती. बरंच तुटायचं होतं अजूनही.

एकजण जाताजाता कानात कुजबुजली “बेणगीकडे जाऊ नगस, लय वंगाळ.”दचकलीच एकदम. पाहू लागली

आसपास पण कोण बोललं काही कळेना. मग आली आपल्या बराकीत. सगळ्या विचारायला लागल्या “कोण आलं होतं? काय दिलं? खायाला काय दिलं का?” हजार प्रश्न.”कोन गं न्हवरा काय?”

काही न बोलता तिने बाड उचललं, बेणगीच्या बराकीत शिरली.

बेणगी, प्रस्थ होतं मोठं. एका मोठ्या दादाची बायको. तो मुंबईत. गोव्यातून काही माल यायचा होता, म्हणून ही आली डिलीव्हरी घ्यायला. पोलिसांना टीप मिळाली होती. पकडली गेली. कोर्टात दोन वर्षाची सक्तमजूरी झाली. दादानं पैसे चारले. ‘राज’ कर म्हणाला. बेणगी खरंच राज करू लागली. पावणे सहा फूट उंच, धिप्पाड शरीर. वेगळ्याच पद्धतीने साडी नेसण्याची पद्धत. भला मोठा आंबाडा. कप्पाळभर कुंकवाचा चांदोबा. हातभर बांगड्या. आवाज भरडा. तसे तर कित्येकांचे गळे चिरून टाकले होते तिने, पण त्याची खबर नव्हती कोणाला. गुन्हेगारी जगतातील सगळ्याच गोष्टी छुप्या. पण आता इथे असेपर्यंत तिला जमेल तेवढं रेकॉर्ड साफ ठेवायचं होतं.

तिने अमली पदार्थांच्या पोतडीचं तोंड उघडलं. जेलर पासून सगळे हिच्या खिशात आले. हिच्यावर जेल सोपवून जेलर

ऐश करू लागली. सगळे हिला वचकून राहू लागले. तिच्याविषयी तोंडातून ब्र काढायची कोणाचीच हिम्मत नव्हती.

स्वर्णा बाडबिस्तारा उचलून बेणगीच्या बराकीत पोचली. बेणगीच्या बराकीत काय नव्हतं? सगळ्या सुखसोयी होत्या. जेवायला खायला रेलचेल. कष्ट करायची गरज नव्हती. फक्त बेणगीची सेवा करायची की झालं. त्या बदल्यात लठ्ठ हप्ते पोहोचवले जात होते. बेणगीची खोली म्हणजे तर महालच.

'तिला या बदल्यात काय करावं लागणार होतं?' तिने सरळच बेणगीला विचारलं. आसपासच्या बायका खुसखुसल्या.

"ए गप बसा. अडाण्यानो!. माझी बाय, तू ऱ्हाव सुकान, जवा काय निगल काम तवा बगू, तवर खाव प्याव आरामात ऱ्हाव. स्वर्णा गप्प राहिली मग. काही दिवस गेले. जरा अंगावर मांस चढलं खाऊन पिऊन. झोपेचं मात्र शत्रुत्व कायम होतं. त्यामुळे डोळे कायम तारवटलेले. कमतरता होती ती मेंदूच्या खाद्याची. मग तिला एक कल्पना सुचली. बेणगीकडे जाऊन म्हणाली, "तुमच्या आयुष्याबद्दल सांगा काही. मी पुस्तक लिहेन तुमच्यावर."

बेणगी भलतीच खुश झाली. येईल जाईल त्याला सांगू लागली. मग म्हणाली "रातच्याला बसू. घेती का नाय? दीक्षा दिऊच मंग आज. काय गं?" सगळ्यांनी माना डोलावल्या.

रात्री बेणगीचा निरोप आला. गेली तिच्या खोलीत. बेणगी सोफ्यावर बसली होती. फारसं कोणी नव्हतं. फक्त तिच्या अगदी जवळच्या दोन मदतनीस होत्या. स्वर्णा समोर बसली. त्या बायकांनी दोन ग्लास आणून ठेवले समोर. पाठोपाठ बॉटल. मग एक संगमरवरी सहाणेसारखं पण चौकोनी, त्याच्या शेजारी एक डबी. दोन पातळ कागद. स्वर्णा कुतुहलाने पाहत होती. बेणगी त्या दोघींना म्हणाली "तो ड्राय फ्रुटवाला ट्रे ठेवा इथं नी जा नीजा जावा."

त्या गेल्या."काय भैरवी बाय? चाकलय का कदी?" तिने नकारार्थी मान हलवली. मग बेणगीने स्वत:च्या हाताने ग्लास भरून दिला."चियर्स का काय म्हंताव ते म्हना नी व्हा सुरू." भैरवी ने एक घोट घेतला. चरचरत घशातून पार पोटात पोहोचेपर्यंत जाळत गेलं. दोन तीन पटापट घोट आणि स्वर्णाला हलकं हलकं वाटू लागलं. डोळे चमकायला लागले. बेणगी समाधानाने हसली. मग तिने सहाण समोर ओढली. त्यावर

डबीतली पावडर पसरली. मग कागदाने त्याचा शीग पसरवत नाकाने खेचत गेली.

"हं, आता तुमची बारी भैरवी." भैरवी ने तिच्यासारखं करण्याचा चुकत माकत प्रयत्न केला. बरचसं जमलं. काही क्षणात आपण हलके हलके होतोय, उडतोय की तरंगतोय काही कळेना. मग बेणगीने परत ग्लास भरले. विमानं उडत राहिली. सगळ्याचा विसर पडला.

कित्येक दिवसांनी स्वर्णा मोकळी झाली मोठ्या ओझ्यातून, स्वच्छंद, कसलीही काळजी नसलेली, हलकी हलकी. काही वेळाने जेलर आली. बेणगी उठून गेली. जेलर बाईचा हात स्वर्णाच्या शरीरावरून फिरू लागला. तिच्या वस्त्रांच्या आतपर्यंत. पण स्वर्णा काही कळण्याच्या पलिकडे गेली होती. ती जेलरकडे पाहून खुदकन हसली."चरम... चरम..." एवढेच शब्द आर्ततेने हाकारत राहिली. जेलर सुख लुटत राहिली.

सकाळी बरीच उशीरा जाग आली तेव्हा स्वर्णा बेणगीच्याच बराकीत पण स्वत:च्या नेहमीच्या जागी झोपलेली होती. तिला अंधुकसं आठवत होतं. डोकं प्रचंड जड झालेलं होतं. डोळे उघडून परत परत मिटत होते. ती परत झोपून गेली.

कित्येक दिवसांची झोप ती भरून काढत होती. मग बऱ्याच उशीराने जाग आली. उठून तिने आंघोळ वगैरे केली. सगळ्या विचित्र नजरेने पाहत आहेत असं वाटलं तिला.

मग हळू हळू सगळं आठवलं अंधूक अंधूक. शिसारी आली. तिने परत परत दगडाने अंग घासून घासून तो कालचा ओंगळवाणा स्पर्श आपल्या अंगावरून खरवडून काढण्याचा प्रयत्न केला. अंग सोलवटून निघालं पण ती शिसारी जाईना. सगळं सोडून पळून जावसं वाटलं. पण जाणार कुठे? पळून पळून पळणार कुठे? सगळीकडे बेणगीचंच राज्य!

हे अधून मधून होऊ लागलं. आठवड्यात एक दोन वेळा, असं चारपाचदा झाल्यावर मध्ये आठवड्याचा गॅप गेला. बेणगीचं बोलावणं आलं नाही. स्वर्णा हवालदील झाली. तिला काही सूचेना. अमली पदार्थांशिवायची अस्वस्थता पराकोटीला गेल्यावर ती हळूच एक दिवस बेणगी कडे गेली. बेणगीचं काहीतरी बिनसलं होतं. तिने अर्वाच्च्य शब्द वापरून तिला हाकललं. पण गरज इतकी होती की ती परत काही वेळाने बेणगी कडे गेली. मग पाळीव प्राण्यासारखी तिथे नुसतीच बसून राहिली. बेणगीने तिला पाय चेपायला सांगितले. पान खाऊन थुंकलेलं पिंकदान साफ करायला सांगितलं. सांगेल ते काम बिनबोभाट

होत राहीलं. शेवटी बेणगीने एक पुडी फेकली तिच्याकडे.”जा तिकडे कोपऱ्यात. बोभाटा नगं. हिला घरकामाला घ्या. बाकी फार काय व्हायचं नाय हिच्याकडून.”

क्वचित बेणगी रात्री पण बोलावी. स्वर्णा, अमली पदार्थ आणि दारुच्या प्रचंड आहारी गेली. प्रथम येत राहीला. पैसे देत राहीला. ती साठवत राहिली.

बेणगीला दुसऱ्या कारागृहात हलवण्यात येणार असल्याची बातमी आली. स्वर्णाला आनंद मानावा की दु:ख कळेना. रात्रीचे किळसवाणे प्रकार चालूच राहाणार होते पण आता नशा बंद होणार होती. बेणगी म्हणाली “भाईर आली का सांग. हितं कोन ना कोन माल पुरवल. ती सोदल तुमाला. पन पैका लागल.”

पण प्रश्न तिथेच संपत नव्हते. बेणगी गेली. स्वर्णा वरचं छत्र गेलं. बेणगीची नंबर एक शत्रू कमला, तिसऱ्याच दिवशी येऊन बेणगीच्या बराकीवर हक्क सांगू लागली. सगळ्या गुपचुप बाजूला झाल्या. तरीही दोन कानाखाली प्रत्येकीला बसल्याच. केवळ बेणगीचे साथीदार म्हणून. स्वर्णाच्या नाकातून रक्त वाहू लागलं. बेणगीच्या गटातल्या एकीनं मग तिला औषधपाणी, पट्टी करून दिली.”सगळ्यांनी आपापलं सामान उचला नी जा

आपापल्या बराकीत. कमलानं फर्मान सोडलं. आणि माज्या गटातल्या बायांची कामं करायची. ऐष केली ना इतकं दिस?" नष्टचक्र सुरू झालं.

बेणगी म्हणाल्याप्रमाणे, एक दिवस एक अनोळखी बाई आसपास घुटमळू लागली. बेणगी जाताना तिने दिलेल्या पुड्या संपल्या होत्या."मसाला", तिने विचारलं. स्वर्णा थांबली. तिने सांगितलेले पैसे म्हणजे प्रथमने आत्तापर्यंत दिलेल्या पैशाच्या निम्मी किम्मत होती. ती म्हणाली "एवढे नाहीत."

"मग लोन घे."

लोन कोण देणार?"

"जेलर"

"आणि?"

"आणि काय? व्याज भराया जायाचं रातच्याला."

स्वर्णाला गरगरलंच. ती गप्प राहिली."लवकर बोलायचं. निस्तं डोकं फोडून आले. लगीच भाईर. सरकारला परवडत न्हाय लई दीस ठिऊन घ्यायला."

"सांगते."

प्रथमच्या लक्षात आली होती स्वर्णाची अवस्था. त्याने समजवायचा प्रयत्नही केला होता. पण ती अधिकाधिक व्यसनाधीन होतेय हे लक्षात येत होतं. अलिकडे तिचं लक्षच नसे. आला तरी आनंद नाही. नाही आला तरी काही बोलायची नाही.

बेणगी गेल्यावर जेव्हा तो भेटायला आला, तेव्हा तिची अवस्था पाहून मात्र त्याला गलबलून आलं. केस अस्त्यावस्त, कपडे मलीन, डोळे तारवटलेले, गालफडं आत गेलेली. तीने रडत रडत जमेल तसं सांगितलं. प्रथम हबकलाच. काही बोलला नाही. पैसे जास्त देऊन गेला. बाहेर जाऊन त्याने तिच्या चांगल्या वागणुकीबद्दल लवकर सुटका व्हावी असा वकिलामार्फत प्रयत्न सुरू केला. शेवटी दोन वर्षांनी तिची सुटका झाली.

पण तेवढे दिवस जेलरकडून लोन घ्यावंच लागलं. व्याजही चुकवावंच लागलं. ड्रग्ज तिचे कायमचे साथीदार बनले. दारूही. पण ड्रग्ज शिवाय जगणं अशक्य झालं. बाहेर आली तेव्हा शरीराने निम्मी झालेली आणि मनाने दगडी.

प्रथमने मात्र शेवटपर्यंत साथ सोडली नव्हती. तो आता गोव्यातच एक खोली भाड्याने घेऊन राहत होता. अजूनही त्याने या विद्यांचा अभ्यास सोडला नव्हता. पोटापाण्यासाठी अनेक उद्योग तो करत होता. टीव्ही, लॅपटॉप, वगैरे दुरूस्त करण्याचं

मुख्य काम. पण इतरही अनेक कामं तो करी. काही म्हाताऱ्या लोकांना लॅपटॉप कसा वापरायचा, सेलफोन कसा वापरायचा ते शिकवण्याचं काम तो करी. काही मुलांना गणित शिकवे. एका हॉस्पिटलमध्ये वॉर्डबॉय म्हणून पण बदलीवर काम करे.

चार दिवस त्याच्याबरोबर राहिल्यावर तिला एक एक गोष्ट कळू लागली. केवळ आपल्याला पैसे पुरवता यावेत म्हणून तो हे सगळं करत होता हे पाहून भरून आलं. काहीसं अपराधीही वाटलं. दोन डोसमध्ये तिने ते पैसे उडवले होते.

ती म्हणाली मला काम बघ. त्याने एका हॉस्पिटलमध्ये आयाची जागा खाली आहे असं चाचरतच सांगितलं. ती लगेच तयार झाली.

"तिथेच व्यसनमुक्ती केंद्र आहे. पण ड्रग ॲडिक्ट आहे, कळलं तर काम मिळणार नाही. पण आता यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न कर. दुसरं एखादं व्यसनमुक्ती केंद्र बघू आपण." ती नुसतीच पाहत राहीली.

# १३

हॉस्पिटलची नोकरी सुरू झाली. पहिले काही महिने ट्रेनी. रुमची साफसफाई वगैरे कामं. बेड लावणे, वगैरेही शिकली. नर्सला म्हणाली मला इंजक्शन वगैरे पण द्यायला शिकवा. मी शिकेन. बाकीचीही कामं करेन. स्वर्णा पटापट शिकली. व्यसनमुक्ती केंद्र म्हणजे पुरवणारेही येणार, तिला अंदाज होताच. आलेच. एका नजरेत हिला टिपली त्याने. मग शीफ्ट सुटताना गाठली.

तिला म्हणाला "काय? मसाला का?" तिने मान हलवली. त्याने तुरंत पुडी दिली. तिचे डोळे चमकले. इथे काय फुकट नसतं."मुक्तीतल्या लोकांना मुक्ती पुरवायची. जमणार का?"

"बघते. नोकरी गेली तर काहीच उपयोग नाही. हळू हळू कनेक्शन्स जुळवावी लागतील. पण जमेल."

"ठीक आहे. आता गिऱ्हाईकाबरोबर तुलाही मिळेल." तिने मान हलवली. मग दुसऱ्या दिवसापासून ती, वरच्या मजल्यावर व्यसनमुक्ती केंद्र होतं, तिथे चकरा मारायला लागली.

डबा खायच्या वेळी, सुटी झाल्यावर. आधीचे दोन वॉर्डबॉय होते पुरवणारे. पण नुकतेच पकडले गेले होते. आता सध्या माल मिळत नव्हता.

पेशंट, काही जे खरंच मनापासून यातून सुटण्याचा प्रयत्न करत होते आणि काही, ज्याना घरच्यांनी जबरदस्तीने आणले होते, त्यांच्यामध्ये फरक ओळखणं गरजेचं होतं.

तीन चार दिवस सतत तिथे चकरा मारल्यावर एक जण अपेक्षेने तिच्याकडे पाहातोय असं लक्षात आलं तिच्या. स्वर्णा लगेच गेली नाही. लांबून तीही पाहू लागली त्याच्याकडे. मग त्याने खुणेने बोलावले तेव्हा सावकाश अंदाज घेत गेली. त्याने गादीखालच्या नोटा दाखवल्या. तिने विचारले “मसाला?” त्याने नकारार्थी मान हलवली. मग सिरींज दाखवली टेबलवरची.”उद्या नाहीतर परवा.” एवढंच बोलून गेली.

परवाचा माणूस गेटमधून बाहेर पडल्याबरोबर दिसला. स्वर्णाने खूण केली आणि भराभर चालत पुढे गेली. एका गल्लीत शिरली. तो आलाच मागोमाग. ती म्हणाली “मसाला नकोय त्याला, सिरींजवालं..”

“उद्या सकाळी. कितीची ड्यूटी?”

“९ वाजता.”

“ साडेआठला भेट इथंच.”

ती आपल्या रस्त्याला लागली. आज तिला एकदम उत्साही वाटलं.

प्रथम तिच्याकडे पाहत होता. ती आल्या दिवसापासून जाम अस्वस्थ दिसायची. जागीच असायची. चीडचीड करायची. मग रडायची. पण चार दिवसांपुर्वी तो घरी आला तेव्हा ती झोपून गेली होती. मग सकाळीही तिचा मूड छान होता. जरा जास्तच छान होता. डोळ्यात एक चमक. तेव्हापासून ती उत्साहातच होती. त्याला बरं वाटलं पण काळजीही.

त्याने अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या लोकांविषयी बरंच वाचन केलं होतं काही दिवसांत. त्यानुसार तिला बराच त्रास होणार होता. तसा होतही होता. तो तिला योग्य आहार मिळावा म्हणून प्रयत्न करत होता. पण अचानक तिच्यात झालेला हा वरकरणी चांगला बदल त्याला कोड्यात टाकत होता. तिच्यावर लक्ष ठेवायला लागणार होतं. पण कसं?

दुसरे दिवशी सकाळी जेव्हा ती भराभर आवरून चांगली पाऊण तास आधी निघाली तेव्हा तो म्हणाला “चल आज मला तुझ्याच भागात जायचंय, मिळूनच जाऊ.”

‘अरे देवा! आता?’, “अं हो का? बरं, चल.” पण तिचा बदललेला चेहरा त्याच्या नजरेतून सुटला नाही. मग अर्ध्या रस्त्यात आल्यावर तो म्हणाला, “गडबड झाली. तो दुरुस्तीला आणलेला फोन घ्यायलाच विसरलो मी. तू जाशील का एकटी? मला परत जाऊन आणावा लागेल.”

“हो हो, जा ना, मी जातेच की रोज.” तिचा चेहरा एकदम रिलॅक्स झाला. मग प्रथम मागे वळला आणि कॉर्नरला वळून थांबला. मग परत येऊन स्वर्णाच्या मागे काही अंतर सोडून चालू लागला. तो गर्दीबरोबर चालत राहिला. तिने मागे वळून पाहिले असते तरी तिला तो दिसला नसता.

स्वर्णा चालत चालत हॉस्पिटलपर्यंत आली, पण हॉस्पिटलपर्यंत न जाता एका लहान गल्लीत शिरली. प्रथम गर्दीबरोबर त्या गल्लीच्या तोंडावरून पुढे गेला. ती एका झाडाखाली थांबलेलली दिसली. मग तो एका चहाच्या टपरीवर थांबला. दोन कामवाल्या बाया जोरजोराने गप्पा मारत गल्लीत शिरल्या. पण त्या बंगल्यांमध्ये शिरल्या. मग एकजण

सायकलवरून सामानाच्या पिशव्या लटकवून आला. डिलीव्हरी बॉय असावा. तोही स्वर्णा जिथे उभी होती, तिच्यापुढून गेला आणि पुढच्या बंगल्यात शिरला. मग एक माणूस गल्लीत शिरला. रमत गमत टोकापर्यंत जाऊन परत फिरला. त्याच्या हातात एक लहान पिशवी होती. तो स्वर्णाला क्रॉस करून पुढे येऊन रस्त्याच्या कडेला सावकाश बुटाची लेस बांधायला थांबला वाकून, त्याने ती पिशवी ठेवली आणि निघून गेला.

स्वर्णा काही क्षण थांबली, मग सावकाश चालत निघाली. त्या पिशवीजवळ चप्पल ठीक करण्याच्या बहाण्याने बसली आणि उठताना ती पिशवी बेमालूमपणे तिच्या पदराआड गेली.

प्रथम लक्ष ठेवून नसता तर कळणं शक्यच नव्हतं. ती बाहेर पडतानाच तो तिला सरळ सामोरा आला.''काय गं? गेली नाहीस?'' अचानक त्याला समोर पाहून ती प्रचंड घाबरली.

“न, नाही, दुसऱ्या मुलीची वाट पाहत होते.”

“मग? कुठाय ती?”

“नाही आली. मला उशीर होईल थांबले तर म्हणून निघाले.”

स्वर्णा धादांत खोटं बोलत होती. ‘पण हिला पैसे कुठून मिळाले?’ प्रथम तिच्याकडे पाहत राहीला.

ती भराभर चालत हॉस्पिटलच्या गेटमधून आत आली. सरळ बायोमेट्री करून व्यसनमुक्तीच्या मजल्यावर पोहोचली. त्या पेशंटकडे गेली. बोटांनी खूण केली. त्याने पैसे दिले. तिने पिशवी. मागे वळूनही न पाहता ती तडक आपल्या वॉर्डात आली. कमरेला खोचलेल्या पिशवीत आता पैसेही होते नी पुडीही. मोठी उब होती त्यात. नुसतं आहे जवळ ही भावनाही छान होती.

हा सिलसिला मग काही महीने चालला. प्रथमने सुरवातीला प्रचंड आकांडतांडव केला. तिला घरातून हाकलण्याची धमकी दिली. मग तिने रितसर माफी वगैरे मागितली. परत नाही घेणार म्हणाली. मग तिने वेगळीच जागा शोधली या देवाणघेवाणीसाठी. हॉस्पिटलच्या आवारात पोस्टमॉर्टेम रुमच्या मागे. तिने बरीच गिऱ्हाईकं मिळवून दिली.

तिच्या एकटीने सांभाळणं मुष्किल झालं तेव्हा तिथल्याच एका वॉर्डबॉयला हाताशी धरलं. मग तर फारच सोपं झालं. हिने फक्त गिऱ्हाईकं शोधायची, पुढची देवाण घेवाण तो बॉय करणार, हिचा मसाला आणि कमिशन तोच आणून देणार.

काहीच महिन्यात प्रथमच्या तिप्पट कमवायला लागली ती. तिचा डोस ती प्रथम येण्यापुर्वी घेऊन झोपून जायची. तिला कधी कधी आश्चर्य वाटायचं. ‘याला आपण आवडतो. पण कधी हा जवळही येत नाही, तसा काही प्रयत्नही करत नाही. तो, त्याचं काम, वाचन, यातच गुंतून राहतो. पण आपली काळजी घेतो. कधी डबल शिफ्ट असली की रात्री उशीरा न सांगता न्यायला येतो.

आपण मात्र सुरवातीच्या काळात गिऱ्हाईक नाही मिळालं की त्याच्या पाकिटातून पैसेही चोरलेत. लक्षात आलं असेल का त्याच्या?या नशेने माझ्यातलं सगळंच मारून टाकलय बहुतेक. मी तरी का जगतेय? काय व्हायचं बाकी राहीलय आता?’ कधी कधी या अशा विचारांनी काहूर उठायचं मनात. मग ती एक डोस घ्यायची आणि सगळं विसरून हवेत तरंगायला लागायची.

एकदा प्रथम प्रचंड चिडून म्हणाला, “तुझ्यात गुंतून वाट लावली मी स्वत:ची. आण ते विष मला पण दे. निदान रोजचं मरण तरी वाचेल माझं, तुला हे असं तीळ तीळ मरताना पाहायचं.”

तिला अशा वेळी फार वाईट वाटायचं. पण ते क्षणिक असायचं. एक दिवस नेहमीप्रमाणे हॉस्पिटलमध्ये गेली. देवाण घेवाणीचा वार होता. थोड्या वेळाने बॉय आला, काहीसा भांबावलेला दिसला.''का रे काय झालं?'' त्याने जोरजोरात मान हलवली काही नाही असं. हिचं कमिशन आणि पुडी दिली. हिने सगळं हातात घेतलं, कमरेच्या पिशवित ठेवलं नि क्षणात हॉस्पिटलचे मॅनेजर आले. हिने सरळ पुडी पाण्यात टाकली.

यावेळेस वर्षाची लागली सक्तमजूरी. स्वर्णा साठवलेले सगळे पैसे घेऊन गेली. जेव्हा प्रथमला कळलं हिने मुक्तीकेंद्रातल्या ॲडिक्ट्सना ड्रग्ज पुरवली, तो पोलीस स्टेशनला भेटायला म्हणून आला आणि चार सणसणीत कानाखाली वाजवल्या.''इतकी हीन पातळीवर पोहोचली असशील असं वाटलं नव्हतं. परत तोंड दाखवू नकोस मला.'' ती धाय मोकलून रडली त्या दिवशी. स्वत:साठी, प्रथमसाठी, आईसाठी.

मग परत तुरुंग नावाच्या नरकात रवानगी झाली. यावेळेस पैसे चारून हिने आधीच सेटींग लावून ठेवली. मसाला मिळवायला जेलरचं लोन आणि व्याज होतंच. फक्त तिने अट घातली, मसाला घेतलेला नसेल तर ती येणार नाही. जागेपणी तिला ते सगळं सहन होणारं नव्हतं. जेलरनेही शब्द पाळला.

यावेळी तब्येत पुरती ढासळलेली. कष्ट होईनात. मग तिला स्वैपाकाची ड्यूटी मिळाली. हाडाचा सापळाच झाली होती, ती, या ड्यूटीने जरा सुधारली. पोटात चार घास मनासारखे मिळून जरा मांस चढलं अंगावर. तुरुंगात वर्ष काढल्यावर सुटका झाली. कुठे जायचं प्रश्न होता.

प्रथम राहत होता तिथे आली. तो घरीच होता. हिला पाहून उठलाच. पाहवेना त्याला. बस म्हणाला. हिला भडभडून आलं. एवढं होऊनही हाकलून लावलं नाही त्याने. यापुढे याला त्रास नाही होऊ द्यायचा. तिचं हे असं काही ठरवणं क्षणिक असायचं. खायला दिलं, चहा दिला.

दोन दिवस राहू दे, मी जागा पाहते माझ्यासाठी म्हणाली. तो नुसता पाहत राहिला. मग तिने काम शोधायला सुरवात केली. कामाच्या आधी ड्रग्ज पुरवणारे माग काढत आले. आता गोवा सोडायलाच हवं. पण जायचं कुठे? मुंबई? बेणगी आठवली तिला.

'तिने घात केला आपला. पण तिचा राग येत नाही आपल्याला. असं का?' मग तिने दोन चार महिने, एका मॉलमध्ये सेल्सगर्लचं काम केलं. त्याआड राहून ड्रग्जचे पण दोन पाच

व्यवहार जुळवले. तिलाही आता आपले जातभाई ओळखू येऊ लागले होते. पैसे साठले.

प्रथम जा म्हणाला नव्हता त्यामुळे तिथेच राहिली होती. त्या रात्री ती म्हणाली, “आता इथे राहावसं वाटत नाही. मुंबईला जाणार एकदोन दिवसात. काही पैसे साठलेत. तिथे नव्याने सुरवात करेन. इथे माझ्याआधी ड्रगवाले हजर असतात जाईन तिथे. तुझे खूप उपकार आहेत माझ्यावर. कधी काही काम असलं माझ्यायोग्य तर सांग.”

तो काहीच बोलला नाही. बराच वेळ तसाच बसला. मग म्हणाला “तू ठरवलं आहेस म्हणजे जाणारच. पण मुंबई गोव्याइतकं सुरक्षीत नाही. जपून राहा.” तिने मान हलवली. रात्री मुंबई गाडीत बसली.

# १४

सकाळी महानगरीत पाऊल टाकल्याबरोबर तिने मोकळा श्वास घेतला. एका लहानशा हॉटेलमध्ये बसून शिस्तीत चहा नाश्ता केला. मग, बेणगीचा नंबर लिहून ठेवला होता, तो काढून तिला फोन लावला.”भैरवी.. , कशा हाय बाय माजी?” चिरपरिचित हेल काढून बोलणारा आवाज ऐकून एकदम बरं वाटलं तिला.

“बरी आहे!”

“कारनामे ऐकिले तुमचे! कुटून बोलते? गोव्यातूनच काय?”

“नाही. मुंबईहून. आत्ता सकाळी आले. पहिला फोन तुम्हालाच केला. काम पाहिजे. मला ठेवलं तर फायद्यात राहाल.”

“अगं बाये, ते जेलरवालं काम हितं नाय गं.”

“ते करायचंही नाही मला.”

“मंग?” बेणगी सावरून बसलेली दिसली तिला कल्पनेत. हसली मग मनाशीच.

“तुम्ही भेटला की सांगते.”

“आसं म्हनती? बर, ये मंग. कुटं हाईस म्हनायची?”

“सेन्ट्रलला.”

“सानपाडा ठेसनला ये. तितं ईष्टला म्हमद्या ईलेक्ट्रॉनिकवाल्याला भेट, तो सोडल आनून माझ्याकडं.”

“येते.”

दोन तासांनी ती बेणगीच्या किल्ल्यात होती. किल्लाच तो. कडेकोट. पाखरू पंख हलवू शकलं नसतं बेणगीच्या परवानगी शिवाय. बेणगीने चहा दिला. मग म्हणाली “बोल बाये.”

मग तिने मागच्या दोन अडीच वर्षात घडलेल्या सर्व घटना सांगितल्या.”आता इथं देवाणघेवाणीचं काम करायचंय. पकडली नाही जाणार या वेळेस.”

“आसं म्हनती?”

“एक मौका देऊन पाहा.”

“दिला. राहती कुटं?”

“जागा शोधणार आता.”

“परळला खोली हाये आपली. दुसरी मिळपरंत राही तिथं. मी फोन करेल एक दोन दिसात.”

पत्ता घेऊन निघाली. चाळीचा अरुंद जिना चढून वर आली आणि गटारीच्या उग्र वास नाकात शिरला. चाळीची प्रत्येक मजल्यावरची कचराकुंडी ओसंडून वाहात होती आणि कॉमन संडास विष्ठेने भरले होते. ‘वेलकम टू मुंबई स्वर्णा !’ नाकाला रुमाल लावत ती मनात म्हणाली. किल्ली समोरच्या बिऱ्हाडाकडे होती. गुजराती गोरटेली भाभी चौकसपणे पाहात होती. पण बेणगीबेनने पाठवलंय म्हटल्यावर तिने पटकन किल्ली दिली.

खोली म्हणजे खरंच खोली. दुसरं काही नाही. नाही म्हणायला दोन बाय दोनची छोटी न्हाणी, अर्ध्या भिंतीची. भाभीची एक कॉट होती तिथे. ती वापरत असावी खोली. स्वच्छ ठेवली होती झाडून पुसून.

मुंबईत डोक्यावर छप्पर मिळालं हेच मोठं. मग तिने पूर्वतयारीला सुरवात केली. विग्जच्या दुकानात गेली. निरनिराळे विग्ज ट्राय करून त्यातले तीन निवडले. सध्या तेवढेच परवडणार होते. मग खरेदी केली निरनिराळ्या शेडसच्या हेअरकलरची. मेकअपचं सामान. निरनिराळ्या फ्रेमचे चष्मे. मग कपडे.

निरनिराळ्या साईजचे, काही पुरुषांचे, काही स्त्रियांचे. असं बरंच सामान फूटपाथवरच्या स्वस्तात मस्त मालातून निवडून, खरेदी करून, तिथेच स्वस्तातल्या बॅगा खरेदी करून त्यात ते भरून टॅक्सी करून खोलीवर आली.

जेवण झालंच होतं. पुडी काढून डोस लावणार तेवढ्यात दार वाजलं. सगळं पटापट एका कोपऱ्यात ढकलून तिनं दार किलकिलं करून पाहिलं. समोरची भाभी.”ताई काय पायजेल काय पाहाला आली.”

“नाही काही नकोय.” तिनं तुसडं उत्तर दिलं.

“लागेल काय तर सांगा.”

“हो.” तिनं दारच लावलं.

“नकचढी छोरी छे!” भाभी नवऱ्याला म्हणाली, तेही हिला बंद दारातून स्पष्ट ऐकू आलं.”बेनगी बेनंनी सांगाला पायजेल.”

“तू चूप रावनी.” नवरा ओरडला मग.

दुसऱ्या दिवशी सकाळीच स्वर्णाने संपूर्ण वेशभुषा बदलली. केस शॉर्ट बॉयकट, डोळ्यांवर मोठा गॉगल, जीन्स, टी शर्ट, मेकअपने किंचित गाल फुगीर केलेले, ओठ मोठे, डोळे

बारीक. पटकन पाहताना कालच्या गबाळया कपड्यातली, पातळ केस कसेतरी मागे बांधलेली मुलगी हीच असा विचारही नसता आला कोणाच्या मनात. मग तिने हाय हील्स घातले कालच घेतलेले. जरा दाराबाहेर वाकून पाहिलं. चाळ आपापल्या खोल्यांत मग्न होती अजून. तिने दार ओढून घेतले. लॅच लागला. मग हळूच सटकली.

थोड्या वेळाने परत येऊन दार वाजवू लागली. “भैरवी, ओ भैरवी, दरवाजा खोल तो. कहां हो तुम यार, कबसे बेल बजा रही हूँ!” किनऱ्या, चिरक्या, अख्ख्या चाळीला ऐकू जाईल, एवढ्या आवाजात बोलू लागली. माणसं बायका डोकावू लागल्या. समोरची भाभी आली.”कौन मंगता?” एकदा भाभीकडे वरपासून खालपर्यंत नजर टाकून म्हणाली, “भैरवी!”

“गयी होगी कहीं बाहर. तुम मेरे घरमें बैठो”

“कहां गयी?”

“मेरेको क्या मालूम?”

“कब आयेगी?”

भाभीने माहीत नाही अशा अर्थाने खांदे उडवले.

“ठीक है, मैं बाद में आऊंगी.”

मग ती तशीच बेणगीकडे गेली. दरवान आत जाऊ देईना. खूप कडकड केल्यावर त्याने फोन लावला घाबरत घाबरत.

“कोन गं भवाने तू?” बेणगी डरकाळली

“भवानी नाही भैरवी.”

“तुला का सोडंना हा!”

“एहxxxxxxxx, मारली काय सकाळी सकाळी? कालच आलती ना? सोड तिला.”

“त्या न्हाईत”

“हाणू का आता? सोड लवकर”

“होय जी”

मग ती बेणगी समोर उभी राहिली.

बेणगी जागची धडपडत उठली.

“ए, कोण गं तू?”

मग तिने गॉगल काढला. बेणगी अर्धं मिनिट निरखत राहिली तेव्हा ओळख पटली.

आणि मग ड्रग्जची ने आण, रोज एक नवा चेहरा, नवी मुलगी, नवी म्हातारी, नवा टकला, करू लागले. पोलिसांना

निरनिराळे क्लू गोंधळवून टाकू लागले. जवळपास दहा अकरा महिने हे बिनबोभाट सुरू राहिलं. कधी मॉलमध्ये जाऊन ही तयार होई, कधी हॉटेल लॉबीच्या वॉशरुममध्ये.

गोव्यात मॉलमध्ये मेकअप सेक्शनला काम करताना एक चरसी भेटला होता. होता मेकअप आर्टीस्ट. पण ड्रग्जमुळे कामं मिळत नव्हती. हिने त्याला ड्रग्ज पुरवली. त्याने विद्या दिली. यावेळेस स्वर्णाने ती विद्या स्वहस्ते शिकली. वाचून नाही.

पैसा भरपूर मिळू लागला. बऱ्याचदा उंची हॉटेल्समध्ये राहून ऐश करू लागली. पण मूळ मुक्काम चाळीतच ठेवला तिने. ती चाळीतली खोली लकी आहे असा विश्वास होता तिला.

निरनिराळ्या गेटअपचे निरनिराळे आयडेंटिटी पेपर्स बनवले. अजून एक कल्पना सुचली तिला. बेणगीकडे बोलून दाखवलं. तिने पुढचं सगळं आपल्या माणसांकडून पार पाडून घेतलं.

एके रात्री स्वर्णाच्या आईला पोलीसस्टेशनमधून फोन आला.''तुमची मुलगी हरवली होती काही वर्षांपूर्वी?''

“हो.”

“एक बॉडी आलीय. ट्रेन ॲक्सीडेंट. आयडेन्टीफाय करायला या. आईचा ठोकाच चुकला. ती गेली पाहायला. चेहरा पूर्ण जखमांनी भरलेला. कसं ओळखणार?”

“तुम्हाला का वाटतंय ही माझी मुलगी असेल?”

“तिच्या बॅगेत हे पत्र होतं.”

पत्रं स्वर्णाच्या हस्ताक्षरात होतं. आईच्या नावाने. ‘माझ्या हातून खूप चुका झाल्यात मला माफ कर. ’ शंकेला काही जागाच नव्हती या वेळी. तिने डेड बॉडी ताब्यात घेण्याच्या कागदपत्रांवर सही केलीही, आणि अचानक काही तरी आठवलं.”थांबा, परत बॉडी पाहायचीय मला.”

“आता काय झालं मॅडम?” हवालदार वैतागलाच. इन्स्पेक्टरने खूण केल्यावर गप्प बसला. परत नेलं आईला तिथे. आईने थरथरत उजव्या बाजूच्या मानेवर पाहिलं कानाच्या पाळीखाली. जन्मखूण नव्हती. ही माझी मुलगी नव्हे. आई ठामपणे म्हणाली. इन्स्पेक्टरने विचारलं “कशावरून?”

आईने सांगितलं. जन्मखूण, तिची जागा, आकार, रंग, सगळंच! जगाला फसवणं शक्य होतं. आईला नाही.

“पण मग ते पत्रं?”

“ते माझ्या मुलीचंच हस्ताक्षर.”

“आम्हाला नमुना द्या”

‘हे काय नवं कोडं?’ इन्स्पेक्टर अस्वस्थ झाला. त्याला केस गुंतण्याचं दु:ख नव्हतं. त्याला उलट आवडायच्या अशा केसेस सोडवायला. पण कोणीतरी आपल्याला येड्यात काढू पाहातंय या विचाराने तो पेटून उठला. आता मुंबईला जावंच लागणार होतं.

# १५

त्याने स्वर्णा केसची फाईल परत काढली. पाणी मुरतंय इथं काहीतरी. बारीक सारीक धागेदोरे तपासायला सुरवात केली. त्यात स्वर्णाच्या आईने प्रथम नावाच्या मुलाचा उल्लेख केला होता.

इन्स्पेक्टरने तिथूनच सुरवात करायचं ठरवलं. पत्ता शोधत तो रंजनाच्या घरी पोहोचला. स्वर्णा नाहिशी झाली त्याच सुमारास प्रथमने शहर सोडल्याचं सांगण्यात आलं. ‘परंतु अधून मधून त्याचे फोन येतात. स्वर्णा हरवल्याचं त्याला माहित होतं. पण तिच्याबद्दल त्याला काही माहित नव्हतं’ असं रंजनाच्या आईने सांगितलं. रंजना लग्न करून अमेरिकेला गेली होती.”प्रथमचा काही नंबर?” रंजनाच्या आईने नंबर दिला. लावून पाहिला तेव्हा ‘आऊट ऑफ कव्हरेज एरिया’ असा संदेश वाजला.

तो स्वर्णाच्या आईला भेटला. तिला म्हणाला “असं काय घडलं होतं की ज्यामुळे तुमची मुलगी निघून गेली? फाईलमध्ये घरगुती कलह असं लिहिलंय फक्त.” स्वर्णाच्या

आईने मग त्या पुस्तकांविषयी सांगितलं.''त्यावरून मी खूप मारलं तिला त्या दिवशी. दुसरे दिवशी ती पळून गेली.''

“हं!”

“आई, तुम्हाला अंधारात ठेवण्यात अर्थ नाही, तुमची मुलगी गुन्हेगारीत अडकल्यासारखं चित्र तरी दिसतंय. तिच्या हस्ताक्षरातील पत्र दुसऱ्याच बॉडी बरोबर सापडणं हे चांगलं लक्षण नाही. कधी तिचा फोन आला, किंवा ती स्वतः आली, तर कृपया आम्हाला कळवा. तुमच्या जीवालाही धोका होऊ शकतो.” आई सुन्न होऊन ऐकत राहिली.

इन्स्पेक्टरने तंत्रविद्या विषयावर अभ्यास करणाऱ्या व्यक्तींची काही लिस्ट मिळते का ते पाहण्याचं काम डिपीर्टमेंटला सांगितलं. मग त्याने स्वर्णा नाहिशी झाल्यापासून गूढ रितीने मरण पावलेले, खून झालेले, नाहीसे झालेले, अशा संपूर्ण भारतभरातल्या केसेस ढुंढाळायला सुरवात केली. आसाम भागात याविषयीचे बरेच संदर्भ सापडले.

वाचता वाचता साधारण स्वर्णाच्या नाहीसे होण्याच्या आसपासच गोव्यात एका व्यक्तीचा खून एका तरूणीने केला आणि तो माणूस जारण मारण विद्येत पारंगत होता असा बातमीचा मजकूर वाचायला मिळाला. हजारो बातम्या, केसेस

तो ढुंढाळत होता. ही पण त्यातलीच एक होती. तो पुढे इतर बातम्या, केसेस वाचू लागला. रात्रंदिवस वेड लागल्यासारखा तो वाचत होता. जरा जरी संदर्भ असेल तरी ती सेव्ह करत होता. मेंदुत सगळंच सेव्ह होत होतं.

या विषयातले अभ्यासक, नारायण शास्त्री यांचं नाव कोणीतरी सुचवलं. त्याने भेट मागितली. एका पोलीसाला आपल्याकडे काय काम निघावं हे त्यांना कळेना. जेव्हा भेट झाली तेव्हा साधारण पाच वर्षांपुर्वी एका पळून गेलेल्या मुलीचा आपण शोध घेत आहोत असं सांगून त्याने संपूर्ण हकिकत त्याना सांगितली. शास्त्रीजी विचारात पडले.''’प्रथम’ हे नाव घेतलंत ना तुम्ही?''

“हो.”

“हं!” शास्त्रीजी विचारात पडले.

“याविषयात रुची असणारा प्रथम नावाचा युवक यायचा पुर्वी शंका वगैरे विचारायला. चांगला अभ्यास होता त्याचा. गेल्या काही वर्षात फिरकला नाही. पण बोलता बोलता एकदा आमचा असा एक समूह आहे. निरनिराळ्या विद्यांमध्ये काम करणारे लोक त्यात आहेत. एका स्त्रीला यात समाविष्ट करून घ्यायचा विचार चाललाय, हे शास्त्रांच्या दृष्टीने योग्य की अयोग्य

असा प्रश्न घेऊन आला होता एकदा! पण मी त्या समुहाबद्दल जास्त प्रश्न विचारू लागल्यावर त्याने काढता पाय घेतला. त्यानंतर फिरकला नाही.”

“हं! या विद्येत स्त्रिया सहभागी होतात?”

“हो हो. अनेक विद्वान स्त्रियांनी याचा अभ्यास केल्याची नोंद पुराणात आहे. त्यांना तांत्रिक भैरवी म्हणत.”

“भैरवी?”

“हो!”

त्याच्या मेंदूत एक पुसटसं कनेक्शन झालं आणि गेलं. मग तो उठला.”धन्यवाद शास्त्रीजी. पुन्हा काही मदत लागली तर येईन त्रास द्यायला तुम्हाला. नमस्कार!”

तो सरळ चौकीत आला. ‘भैरवी... , कुठे वाचलं हे नाव आपण?’ त्याने पीसी ऑन केला. सेव्ह केलेल्या फाईल चाळताना गोव्याची बातमी समोर आली. भैरवी नावाच्या तरुणीने खून केला होता. त्याने डेटाबेसच्या माणसाला फोन करून गोव्याच्या केसेस मिळतील का विचारलं.”परमिशन लागेल. दुसरं राज्य.”

“ठीकाय!”

त्याने ताबडतोप लेटर टाईप करून परमिशन साठी मेल केलं. केस सरधोपट होती. कोणी बडा इनव्हॉल्व्हड नव्हता. परमिशन मिळाली दोन दिवसात. फाईल आल्यावर त्याने ती बारकाईने वाचायला सुरवात केली. काही क्षणातच “येस्स!” असा उद्गार काढून त्याने टेबलवर हात आपटला. जबानीत प्रथम हे नाव होतं. गोवा! गोव्याला जावं लागेल आता. प्रथमचा फोन त्यानंतर जेवढ्या वेळा त्याने लावला तेव्हा तो ‘आऊट ऑफ कव्हरेज एरियाच’ आला होता. सायबरच्या लोकांना त्याने तो ट्रेस करायला दिला होता. त्याने तिथे फोन लावला.”एक नंबर दिला होता ट्रेस करायला. अजून नाही का काही कळलं?”

“आहो काय येवढं एकच काम आहे का? बघतो. होल्ड करा. हां, दोन तासांपुर्वी झालाय ट्रेस. नंबर गोव्यात आहे. दोन तासापूर्वी मुंबईच्या एका नंबरवरून फोन आला होता या नंबरवर.”

“ओह! मुंबईचं लोकेशन पण काढा. गोव्याचं पण. लगेच. अर्जंट.”

“ बर! तुम्हाला सगळंच अर्जंट!”

लोकेशन मिळाल्याबरोबर त्याने गोव्याला फोन लावला. डिटेल्स दिले. रंजनाच्या आईने दिलेला प्रथमचा फोटो स्कॅन करून पाठवला.”मी प्रोसीजर करतो. पण तुम्ही याला ताब्यात घ्या.

महत्वाचा दुवा आहे. एका चार वर्षांपूर्वीच्या खुनात जबानी दिलीय. नंतर आरोपी बरोबर सतत संपर्कात होता. खुनाची शिक्षा भोगून बाहेर आल्यावर आरोपी परत ड्रग्ज डीलींगमध्ये सापडली. याचा काही संबंध होता की नाही हे तेव्हा तपासलं गेलं नाही. आता घ्या ताब्यात. मी येतोय गोव्याला. लेखी परमिशन येईल येवढ्यात."

"बर! या! घेतो ताब्यात!"

मग असाच फोन परळ पोलीस स्टेशनला गेला. प्राथमिक तपासात मुंबईहून आलेला फोन स्त्रीचा आहे हे कळलं. स्वर्णाचा स्कॅन केलेला फोटो पाठवण्यात आला. पोलीस चाळीत आले. त्यांनी एक स्केच एका माणसाला दाखवले. त्याने ते नीट निरखून पाहिलं आणि, होकारार्थी मान हलवली. पोलीस सबइंन्स्पेक्टर, लेडी कॉन्स्टेबल, आणि अजून एक हवालदार यांना घेऊन तो माणूस स्वर्णाच्या खोलीच्या दिशेने निघाला. जीना चढून सगळे वर आले. रुमसमोर पोझिशनमध्ये सर्वजण उभे राहिले आणि त्या माणसाने दरवाजावर थाप मारली. स्वर्णाने दार उघडलं. भाभी असणार नेहमीप्रमाणे. दार उघडल्याबरोबर लेडी कॉन्स्टेबल झेपावली. तिने स्वर्णाला घट्ट पकडलं. खोलीच्या तलाशीत ड्रग्ज, वेशांतराचं सामान सगळंच मिळालं. तिथून तिची वरात

चाळकऱ्यांच्या देखत पोलीस स्टेशनला आली. रात्रभर तिला तिथेच ठेवलं. लेडी कॉन्स्टेबललाही थांबावं लागलं. ती शिव्या घालून चार लाफे लगाऊन गेली.

प्रथमला रात्रीत मुंबईत आणण्यात आलं. स्वर्णाला तिथे पाहून त्याचं अवसान गळलं. पण ती मुंबईत आल्यापासून त्याला काही माहित नव्हतं. पुण्यातून तपास करणारा सबइन्स्पेक्टर तोपर्यंत मुंबईत पोहोचला होता. त्याने सगळा पाढा वाचला त्या इन्स्पेक्टरसमोर. तो खोटं बोलत नव्हता हे एका नजरेत ओळखलं त्याने. त्याच्या हातून मोठा असा काही गुन्हाही नव्हता झालेला. स्वर्णा घरातून निघून गेली तेव्हा ती सज्ञान होती. स्वत:हून गेली होती. गुन्हा म्हणायचा तर त्याने तिची खरी ओळख लपवून ठेवली पोलीसांपासून.

स्वर्णाला बोलावले त्याने मग.’’बऱ्या बोलाने सांगायचं सगळं. तिथे आई रोज डोळे गाळत फेऱ्या मारते पोलीस स्टेशनच्या. तुला मजा मारायची म्हणून कोणाला मारून टाकून पत्रं घातलं तिच्या बॅगेत? चल, पोपटासारखं, नाही, मैनेसारखं बोलायचं पटापट. आजवर मार खाल्ला असशील तर तो सगळा विसरेल माझा एक हात पडला तर. सटकलीय आपली. डेड बॉडी

पाठवून पोलिसांना येड्यात काढते का? आई आहे ती. ओळखलं तिने. माझी पोर नाही म्हणाली.”

स्वर्णाने अगदी कसनुसं तोंड करत वेड पांघरायचा पवित्रा घेतला तेव्हा सबइन्स्पेक्टरची सटकली. एक झापड बसली आणि तिच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. त्याने एक झापड लगावली आणि कंबरेचा पट्टा काढला. सपकन तो तिच्या पाठीवर आसुडासारखा बसला. स्वर्णाचं ड्रग्जनी कमकुवत झालेलं शरीर निपचित पडलं. लेडी कॉन्स्टेबल मध्ये आली. म्हणाली, “साहेब तुमच्या स्टेशनला न्या, मग काय करायचं ते करा. इथे उगा मेली तर आमच्यावर यायचं.” सबइन्स्पेक्टरचा नाईलाज झाला.

पण त्याने दबाव कायम ठेवला. तिला सोडून तो प्रथमला बडवायला लागला. प्रथम गुरासारखा ओरडायला लागला. स्वर्णा प्रचंड अस्वस्थ होत चालली. शेवटी म्हणाली सांगते, सोडा त्याला.

मग तिने सगळी हकीकत बनवून सांगितली. ‘प्रथमने तिला प्रेमाच्या जाळ्यात कसं फसवलं, तंत्रविद्येचं आमिष कसं दाखवलं, तिला घरातून पळून जायला फूस लावली, कशी ड्रग्स आणि दारूची सवय लावली, त्यातच गोव्यात एका माणसाचा हिच्या हातून खून झाला, त्यानंतर तुरुंगातून सुटल्यावर कशी

प्रथमने तिच्याकडून ड्रग्जची देवाणघेवाण करवली, गोव्यात पोलीस मागे लागल्यावर हिला मुंबईला कसं पाठवलं, असा सगळा प्रथमविरुद्ध रंगवून, खोटा बनाव रचता रचता बेसावध क्षणी बेणगीचं नाव तोंडातून गेलं, आणि स्वर्णा एकदम गप्पं झाली. आता आपल्याला कोणी वाचवू शकत नाही याची खात्री पटली.

मृत्यू निश्चित झाला. ती नखशिखांत थरथरली. तेव्हाच कर्दमने मारून टाकली असती तर सुखाचं झालं असतं असं वाटण्यासारखा मृत्यू बेणगी आपल्याला देईल याची खात्री होती तिला. तिने गेल्या काही महिन्यात बरंच पाहिलं होतं. पण तेव्हा ती बेणगीची खासंखास होती. आता शत्रुपक्षात गेली.

‘मृत्युवर विजय म्हणजे मृत्यूच्या भयापासून मुक्तता. त्या भयावर विजय!’ अचानक प्रथमचे शब्द तिच्या कानात घुमू लागले. तिला प्रचंड हसू फुटलं. ती विकट हसायला लागली. जोरजोरात. खाडकन त्या इन्स्पेक्टरने थोबाडीत ठेवून दिली तिच्या आणि भानावर आली ती.

प्रथम थरथर कापत होता. तिचं धादांत खोटं बोलणं ऐकून तो सटपटलाच. अट्टल गुन्हेगार झाली होती स्वर्णा आता. ‘आपण या सगळ्याला खरंच जबाबदार आहोत? पहिल्यांदाच त्याला हा प्रश्न पडला. दोघांनाही दुसरे दिवशी पुण्याला हलवण्याचं ठरलं.

# १६

सकाळी त्यांची व्हॅन निघाली. त्यात ती, प्रथम, लेडी कॉन्स्टेबल, दोन हवालदार, असे सगळे होते. सबइन्स्पेक्टर मागून जीपने येत होता व्हॅन एका ठिकाणी वळली आणि स्वर्णिमाचा तोल जाऊन ती पडली आणि अचानक बेशुद्ध झाली. तोंडातून फेस येऊ लागला. लेडी कॉन्स्टेबल घाबरली.”ये, आगं, उठ, काय झालं?”

तिने पाणी मारलं तिच्या तोंडावर. जरा हुशारली स्वर्णा.”माझ औषध आहे बागेत ते द्या प्लीज म्हणाली.” कॉन्स्टेबलने बॅग उघडली.

“हं, घे,” स्वर्णा धडपडू लागली हातकडयांमुळे, “हवालदार, काडू काय जरा वेळ हिच्या हातकड्या?”

“हं काडा”. मग तिने हातकड्या काढल्या. स्वर्णाने एक कसलीशी गोळी तोंडात टाकली. जरा वेळाने हुशारली.

लेडी कॉन्स्टेबलची उत्सुकता चाळवली. तिने बॅग उघडून एक विग उचलला. तो नेमका टकलाचा होता.”याचं काय करायची बाई तू?” तिने विचारलं. लावायचा डोक्याला, स्वर्णा

शांतपणे म्हणाली.''हा कसा लावणार? दाखव बरं लावून.'' मग स्वर्णाने आपले कसब दाखवत तो आपल्या डोक्यावर नीट बसवला.''हलत, पडत नाही का?'' स्वर्णाने स्पिरीट गमची बॉटल काढून तो विग व्यवस्थित डोक्यावर चिकटवला.

“अगं बाईची बाप्या झालीस की.''

स्वर्णा हसली.''तुम्हाला लावून देऊ हा? सोनेरी केसवाला? छान दिसेल.''

“हां हां लाव बरं.''

तिने तो लेडी कॉन्स्टेबलच्या डोक्यावर फिट केला. मग आरसा दाखवला तिला. ती जामच खुश झाली लांब सोनेरी केस पाहून. हे करताना अर्थातच तिने एक सिरींज आणि हाताला लागतील त्या पुड्या कपड्यात लपवल्या. हवालदार म्हणाला, “हां पुरे झालं. घाला हातकड्या.'' “काय हवालदार साहेब, चालत्या गाडीतून उडून जाणाराय काय आम्ही. बसू द्या की निवांत. मग उद्यापासून आहेच कोठडी.''

हवालदार अस्वस्थ झाला. पण थांबला. नाही घातल्या कड्या. हायवेला लागता लागता मागून येणाऱ्या ट्रकने व्हॅन ठोकली. ती वेडीवाकडी होत डिव्हायडरवर आदळली. जोरात

स्फोट झाला. सगळीकडे धूर झाला. व्हॅनचा मागचा दरवाजा एकदम उघडला. स्वर्णाला जोरदार मुका मार लागला होता. तिने तशातही प्रथमचा हात धरून बाहेर उडी मारली. पळत पळत ती रस्ता सोडून शेजारच्या डोंगराळ भागात शिरली. जीवाच्या आकांताने दोघे पळत सुटले. इकडे बेणगीची माणसं व्हॅनमध्ये शिरली तेव्हा लेडी कॉन्स्टेबल, हवालदार, ॲक्सीडेंटमध्ये जखमी झालेले दिसले. सोनेरी केसांच्या कॉन्स्टेबलला भैरवी समजून उचलली. मागचा पुढचा फारसा विचार न करता त्यांनी गोळ्या घातल्या बाकीच्यांना. ड्रायव्हर गेलाच होता. मग बेणगीची माणसं लेडी कॉन्स्टेबलला पोत्यात कोंबून निघालीही. तोपर्यंत ही दोघं बरीच आत शेतात घुसली होती. इंन्स्पेक्टरला हे कळल्यावर तो संतापाने वेडाच व्हायचा राहिला. सगळा प्रकार पाहिल्यावर त्याने कयास केला की दोघं परत मुंबईकडे पळाली असणार. त्या माणसांच्या समुद्रात हरवून जाणं सोपं होतं. इथेच त्याची चूक झाली.

मुंबईत बेणगी नावाची मगर आ वासून बसली होती. स्वर्णाला पोलिसांच्या ताब्यात जाणं जास्त सुरक्षीत वाटत होतं. मग अख्खा दिवस असाच शेतात घालवल्यावर अंधारल्यावर दोघं हायवेला आली. तिथल्या रस्त्याच्या कामासाठी बांधलेल्या

पत्र्याच्या शेडमध्ये घुसली. कोणीच नव्हतं. मग लागलेला मार, पळून पळून झालेली दमणूक याने झोप आली. प्रथम गाढ झोपला तसं स्वर्णाने सिरींज काढून त्याला अर्धी टोचली. स्वत: पुडीतलं सूंघलं पण जरासंच. प्रथम बरोबर जाणं धोक्याचं होतं. तिने त्याचे कपडे काढून स्वत: चढवले. स्वत:चे गोळा करून मागच्या खड्ड्यात फेकले. या वेशात तिला एकटीला कोणीच नसतं ओळखलं. पहाट होता होता बाहेर पडली. दबा धरून बसली. छोटी कार लांबवरून येताना दिसली तशी आडवी गेली. शर्वरी आणि निमिषने हॉस्पिटलमध्ये पोहोचवली.

शर्वरी निमिषच्या घरून निघालेला इन्स्पेक्टर करवादतच आला. स्वर्णाची केस हाताळणाऱ्या इंन्स्पेक्टरने विचारलं “का रे काय झालं?” त्याने सगळा प्रकार सांगितला की कसं आधी हायवे वरचा प्रकार सांगितलाच नाही. याचे कान टवकारले. मला नीट सांग. मग त्याने सविस्तर सांगितलं. जन्मखुणेचंही. हा उठलाच खुर्चीतून. हीच ती, हीच ती. पुण्यात आली. मी मुंबईत शोधत बसलो. वेड्यात काढलं मला.

स्वर्णाने दुसऱ्या जरा महाग हॉटेलमध्ये रुम घेतली. आज शेवटचा डोस घ्यायचा. तरंगायचं. उद्या आईकडे जायचं. मग जे होईल ते. तिने दार नीट बंद केलं. वरचा बोल्टही लावला. पडदे

ओढले. मग हिल्स काढून टाकल्या. शांतपणे बेडवर बसली. तिला हा नशा पुरेपुर एन्जॉय करायचा होता. तिने पॅकेट बाहेर काढलं. पाहते तर आत सिरींज. 'अरे वेडाय का? असं काय?' जाम वैतागली. मग परत सिरींजकडे पाहू लागली. 'काय हरकत आहे? आज हे ट्राय करू. करून पाहायचं होतंच मनात. ' परत मन म्हणालं, 'नको गं, आजपर्यंत याची साथ नव्हती म्हणून जिवंत आहेस. आता हे नको शेवटी. हे हातात येणं हा संकेत आहे का?'

'स्वर्णा, जागी हो गं, काय करते आहेस आयुष्याचं? कोणाचा बदला घेते आहेस? आईचा? की स्वतःचाच? काय करायला बाहेर पडली होतीस? काय करून बसलीस? चरम बरोबर म्हणालेला, माझी लायकीच नाही. माझा हेतू निराळाच होता या सगळ्यात पडण्याचा. मला चरम हवा होता, मला वर्चस्व हवं होतं, मला ते सगळं हवं होतं जे कनिष्ट मध्यम आयुष्याने मला नाकारलं होतं. तो सर्वसामान्यपणा मला अंगावर फुटलेल्या कोडासारखा किळस आणायचा. तो धुवून काढण्याचा आणि आम वरून खास बनण्याचा हा एकच मार्ग मला दिसला आणि मी पोहता येत नसताना पुरात फुगलेल्या पाण्यात उडी

मारणाऱ्या वेड्यासारखी यात उडी मारली. सर्वनाश केला, स्वतःचा, आईचा. '

'स्वर्णा, आणि परवा हायवेवर तर तू शेवटी त्याही माणसाचा घात केलास ज्याने सतत, सतत, तुझी साथ दिली. कसं तोंड दाखवशील त्याला? डोळ्याला डोळा भिडवू शकशील त्याच्या? धिक्कार आहे तुझा. धिक्कार आहे. '

'बस, बस, गप्प!,' तिने तोंडावर बोट ठेवून स्वतःलाच गप्प केलं. 'काय भंकस आहे? शेवटचा नशा ना एन्जॉय करायचाय? मग? उगाच डोक्याला शॉट नकोय हां. '

मग तिने स्वत:ला टोचून घेतलं. हळू हळू द्राव आत भिनू लागला. सगळीकडे सप्तरंग, एकाच वेळी थंड आणि उबदार, जगावेगळी भावना, आहाहा.. आता कसलीच भिती नाही मला. कसलीच. आईच्या कुशीत आत आत जणू तिच्या गर्भात परत निवांत जाऊन बसल्यासारखं! हळू हळू तिची शुद्ध हरपत गेली. सगळंच कसं शांत झालं.

स्वर्णाचा शोध घेणारा इन्स्पेक्टर चवताळून उठला. त्याने शहरभर पोलीस पाठवले. स्कॅन केलेले फोटो घेऊन. बेणगी पिसाटून उठली. तिने आपली माणसं सगळीकडे पिटाळली.

प्रथम तिचा पाठलाग करत तिने जिथे रुम घेतली त्या हॉटेलपर्यंत आलाच होता. तो दिवसभर तिथेच घुटमळला. एकदा का हॉटेलमधून कन्फर्म झालं की तो आपण होऊनच पोलिसांकडे जाणार होता स्वत:ला त्यांच्या हवाली करायला. एका पोलिसाने त्याला घुटमळताना पाहिला. हटकल्यावर तो नुसता हसला. वेडसर समजून त्याने फार लक्ष दिलं नाही.

सायंकाळी त्याने फोन करून स्वर्णा इथे सापडेल असं त्या इनस्पेक्टरला निरोप द्या असा चौकीत फोन केला. अर्ध्या तासात पोलिसांचा ताफा पोहोचला. पोझीशन घेऊन दारावर थाप पडली. पडत राहिली. त्या दारावरच्या थापेने दचकायला अथवा दार उघडायला स्वर्णा शिल्लक उरलीच नव्हती. त्या जालीम विषात ती विरघळत गेली होती. बेडवर उरलं होतं ते केवळ मृत शरीर! सर्व भयांच्या पलिकडे गेलेलं.

दरवाजा तोडून जेव्हा सगळे आत गेले तेव्हा इन्स्पेक्टरला न लढताच हरल्याची भावना आली. आता हे कोडं कधीच सुटणार नव्हतं त्याला. एक एक तुकडा जोडत आणला होता त्याने. पण हा शेवटचा तुकडा कायमचा निखळला. आता चित्र पूर्ण नाही होणार. या तुकड्याकडे जी माहिती होती, ती कोणाकडेच नसणार.

प्रथमने बातमी ऐकल्यावर हॉटेलच्च्या फुटपाथवर तो लहान मुलासारखा हमसून हमसून रडला. आता तो ड्रग डीलर झाला, खुनी झाला होता, तो ही त्याच्या स्वर्णाचा.

आई विचार करत बसली होती. 'नक्की कुठे काय चुकलं? माझं, स्वर्णाचं ? खरंच इतकी वाईट आहे का माझी पोर? संस्कार कमी पडले? नेहमी करू नको म्हटलेलं करण्याची वृत्ती नडली का तिला? कुठे असेल? काय करत असेल? चोऱ्या? इन्स्पेक्टर म्हणतो खून? खरंच?

नारायण शास्त्री शिष्याना म्हणाले, "कळलं आता, का ही विद्या इतकी बदनाम आहे? कारण त्याचा खरा उद्देश लक्षातच घेतला जात नाही. प्रत्येकाला झटपट विद्या हवी. साधना नको. आयुष्यच्या आयुष्यं वेचल्यावर जरा कुठे समजू लागणारी विद्या ही. शहाण्याने वाटेल जाऊ नये हेच शिकलो मी जन्मभर अभ्यास करून. पण या तरुण लोकांना कोण सांगणार? मग अशी सोन्यासारखी आयुष्य वाया जातात. पण याला इलाज काय? सर्व नष्टच करून टाकावं का हे ज्ञान? असाही येतो विचार मनात कधी कधी."


सर्व सोपस्कार झाल्यावर इनस्पेक्टरने आईला फोन लावला, "मॅडम, एक डेड बॉडी आहे आयडेंटीफिकेशनला यावं

लागेल. आई देवाला हात न जोडता निघाली.''ही स्वर्णाच असू देत!'' मनोमन म्हणाली.

---------------------------समाप्त-------------------------


**सौ. मधू शिरगांवकर यांची ई साहित्यवरील इतर 6 पुस्तके**


कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील













## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.

## सौ. मधू शिरगांवकर यांचे ईसाहित्यवर हे सातवे पुस्तक

सौ. मधू शिरगांवकर एक नामवंत लेखिका आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांच्या कथा व इतर साहित्य प्रकाशित होत असते. सहसा त्यांची लिखाणाची शैली प्रासादिक असते. चित्रपटाप्रमाणे त्यांच्या कथा उलगडत जातात. एक थेट आणि ठळक असा सामाजिक संदेश त्यांच्या कथांतून दिला जातो. महिला सक्षमीकरण हे त्यांच्या साहित्यातील एक अधोरेखित मूल्य आहे. या पुस्तकातही उच्चभ्रू कुटुंबांतून नष्ट होत चाललेल्या संस्कार मूल्यांचा उहापोह आहे.

सौ. मधू शिरगांवकर यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तरदिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३१), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य

गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(२) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजाफडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें । दृष्टादृष्ट विजयें ।

होआवे जी ।